# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



जून १९८७

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

## श्री. रा. द. बन्ने

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

—: कार्यकारी संपादक :—

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

---

**वर्ष ६६ वे]** **किंमत २ रुपये** **[ अंक ३ रा**
**दूरध्वनी : ४१२ २५ ६१**

---

— कार्यालय —

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबाच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री
# साईनाथ भजनमाला

१४

सांईनाथ गुरुरत्न मिळालें।
जन्मजन्मिंचे सार्थक झालें ॥ धृ० ॥
होतें ज्यांचे पुण्यचि पदरीं।
म्हणुन तयांना चरण लाभले ॥
चिदानंद अद्वतरूप जे।
अंतरिं प्रगटुनि मन वळवीलें ॥
निज भक्तांचे सर्व मनोरथ।
पूर्ण कराया गुरू अवतरले ॥ । सांई० ॥

१५

मशिदींत चाले नेहमी आनंद।
श्रीगुरु गोविंद वास करी ॥
येती जाती भक्त प्रेम लुटताती।
उरी पूरी शांती मिळे तेथें ॥
दुर्बुद्धि-विचार होती तेथें मंद ।
ऐसा साईछंद हितकारी ॥
आठवुनी घाली दास लोटांगण।
चरणीं शरण येत असे ॥

१६

अरे मन क्षणहि नको विसरूं ॥ धृ० ॥
जो जगदात्मा त्रिभुवन - चालक ॥
त्या श्रीहरिचें स्मरण करीं तूं ॥ अरे मन० ॥
प्रपंच रहाटीं वर्तत असतां ॥
तारक पालक हाचि स्वयंभू ॥ अरे मन० ॥
क्षणभंगूर ही माया ममता ॥
शाश्वत ब्रह्म समज धरीं तूं ॥ अरे मन० ॥
दासी येई शरण गुरु तुला ॥
वसुनि हृदयिं मन स्थीर करी तूं ॥ अरे मन० ॥

१७

गुरुनामस्वाद जयासी लाभला।
शाश्वत सुखाला पावला तो ॥
अनेक मिष्टान्नें ठेविली सामोरीं।
नामरस तारी एकला त्या ॥
कुक्कुटासी काय रत्न गारगोटी।
पारख त्या पोटीं जोंधळ्याची ॥
दास म्हणे घ्यावी ओळख करून।
संतांपायीं लीन होऊनियां ॥


या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील
मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# श्री साईलीला — जून १९८७

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ४ |
| २ | साईनाथ पाहिले गोदातीरी | — श्री. अशोक सातव | ७ |
| ३ | साईनाथांचा शरणार्थी | — श्री. वि. बा. खेर | ६ |
| ४ | तुमचा मी भार... | — श्री. सखाराम बांद्रे | १२ |
| ५ | सिरदार तव सरदार | — श्री. वि. म. हटवार | १३ |
| ६ | जय श्री साई | — श्री. सूर्यकांत आंगणे | १४ |
| ७ | साई माझी माऊली | — सौ. सुनिता य. विचारे | १५ |
| ८ | श्रीसाईचे सत्यचरित्र | — श्री. मु. ब. निंबाळकर | १६ |
| ९ | साईसत्चरित् — एक महासागर | — सौ. भावना जेऊरकर | २२ |
| १० | श्रीसाईबाबांचा जीवन परिचय | — श्री. वसंत प्रधान | २४ |
| ११ | प्रेमरुप भगवान श्री साईनाथ | — श्री. पुरुषोत्तम अवारे | २६ |
| १२ | सद्गुरु श्री साईबाबांचे सद्गुरु | — श्री. प्रभाकर कोळमकर | २७ |
| १३ | आणि मुग्धा बोलू लागली | — सौ. मृणालिनी भुर्के | ४३ |
| १४ | सर्वधर्मसमभाव व बाबा | — श्री. रमेश चव्हाण | ४४ |
| १५ | श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | — साईनंद | ४८ |
| १६ | साई नमस्कार | — कु. आरती कालेवार | ४९ |
| १७ | राष्ट्रीय एकात्मता व शिर्डी | — श्री. भास्कर जोशी | ५० |
| १८ | साई उदीचा चमत्कार | — सौ. कमल रेखी | ५१ |
| १९ | बाबांची किमया | — श्री. गुरुनाथ पन्हाळकर | ५२ |
| २० | माया | — श्री. शाम जुवळे | ५२ |
| २१ | माणूस हाच खरा धर्म | — श्री. प्रशांत संन्याशिव | ५५ |
| २२ | धुनिमाई आणि प्रदूषण | — सौ. उषा मुळे | ५६ |
| २३ | श्रद्धा आणि सबुरी | — श्री. शिवाजी घोलप | ५८ |
| २४ | साईबाबा | — सौ. सुधाताई चैतन्य | ५९ |
| २५ | संत महिमा | — श्री. रामचंद्र घोडखांदे | ६१ |
| २६ | साई दरबारातील नवरत्ने — ९ | — | ६३ |

# श्रीसाईनामाचा महिमा



## संपादकीय

दीड कोटी जप केल्यास ब्रह्महत्येपासून मुक्त होता येते असे एक स्मृती वचन आहे. हरिनामाने महापातकांपासून माणसाची मुक्तता होऊ शकते असे ब्रह्मसंहितेत सांगितलेले आहे. साधुसंतांनी देखील या नाम जपाचे महत्त्व पुरेपूर ओळखलेले आहे.

कविवर्य मोरोपंत पराडकर उर्फ कवी मोरोपंत यांनी आपल्या केकावलीच्या एका चरणात असे स्पष्टपणे सांगितलेले आहे की कली जरी अत्यंत दुष्ट व दुर्जय असा आहे तरी भगवंताच्या नामास तो भितो!

भगवान नारदाच्या मते "कलियुगात हरिनामाशिवाय भगवंताच्या प्राप्तीचे दुसरे सुलभ असे साधनच नाही."

मर्यादापुरुष प्रभू रामचंद्राच्या उलट्या "मरा" नामजपाने वाल्या नावाच्या कोळ्याचा श्रीवाल्मिकी ऋषी बनला. ज्ञानियांचा राजा जो ज्ञानेश्वर यांनीही असेच म्हटले आहे की, "जर तुम्ही वाचेने विठ्ठलाचे नाव उच्चाराल तर प्रत्यक्ष कलिकाळही गप्प बसेल."

केवळ अखंड नामस्मरणाने ज्याने आपले नाम देव बनविले, त्या नामदेवांनी देखील पांडुरंगाच्या नावाचे गायन केले. त्याच नावाचे सतत ध्यान केले.

अनाथांचे नाथ संत श्री एकनाथ यांनी देखील हेच सांगितलेले आहे की, "ज्या ठिकाणी श्री रामकृष्ण या नामस्मरणाचे अखंड संकीर्तन चालू असते, त्या ठिकाणी प्रत्यक्ष वेद अर्थासह तिष्ठत उभे राहतात.

भक्तीमार्ग दीपक तुकाराम महाराजांनी विठोबाचे नाव अट्टाहासाने उच्चारणे हेच धर्माचे वर्म आहे असा निर्वाळा देऊन ठेवला आहे.

कल्याणाचे कल्याण जर कोणते असेल तर ते रघुरामाचे गुणगान होय असा समर्थ रामदास स्वामींनी कंठरव केलेला आहे. केवळ नामाचा जप केला, म्हणून पंढरीच्या पांडुरंगाने अनेक पातकी तारले आहेत.

संकटात सापडलेल्या गजेंद्राने श्री पांडुरंगाच्या नावाचा धावा केला म्हणून त्वरेने धावत येऊन गजेंद्र व मगर या दोघांनाही त्याने तारले. अजामिळ व शबरी ही महापातकी माणसे केवळ नाम जपामुळे तरून गेली. बाळ ध्रुवाने श्री प्रभु नारायणाचा "ओम नमो भगवते वासुदेवाय" या नावाने, जपाने धावा केला म्हणून त्याला कडयावरून हिरण्यकश्यपूने लोटून दिले, उकळत्या तेलात टाकले, तरी भगवंताने वाचविले व शेवटी तारांगणात अढळपद त्यास प्राप्त करून दिले. म्हणूनच की काय नामस्मरण किंवा नाम संकीर्तन याला साधनराज व भक्ती राजमार्ग अशी नावे संतानी दिलेली आहेत.

संत मीराबाईनेही भगवानाचे नाम स्मरण करत करत विष प्राशन केले व त्यामुळेच की काय श्री कृष्णाने तिला वाचविले. विषाचा जरासुद्धा परिणाम तिच्यावर अजिबात झाला नाही.

संत चूडामणी भगवान श्री साईनाथांनीही आपला नाम महिमा सांगताना हाच निर्वाळा दिला आहे की, तुम्ही नुसते 'साई साई' असे नित्य स्मराल, तरी या मायेच्या सातासमुद्रापलिकडे मी तुम्हाला घेऊन जाईन. माझी भक्ती करा, म्हणजे तुम्हाला कळिकालाचेही भय कदापिही राहणार नाही आणि सुख तुमच्या पायाशी लोटांगण घालत येईल.''

श्रीसाईबाबांच्या वेळी हिंदु व मुसलमान या दोन जमातीत दुही पडली होती. परंतु बाबांनी आपल्या उपदेशाने ती नष्ट केली. ''राम व रहिम'' आणि ''कृष्ण व करीम'' यांच्यात मुळीच फरक नाही. तो एकच परमेश्वर आहे आणि आपण हिंदू-मुसलमान आदी सर्व धर्माचे लोक त्यांचीच लेकरे आहोत, म्हणून आपण सर्वजण भाई-भाई आहोत. तेव्हा आपआपसात भांडणे करणे खरोखर चांगले नाही. सर्वांनी बंधुभावाने एकजुटीने राहिले पाहिंजे, म्हणजे परकीयांना आमच्यामधे स्वार्थासाठी भेदभाव करण्यास मुळीच जागा राहणार नाही व आपली भारतमाता समृद्ध, बलवान, शक्तीशाली होईल, हे पूर्ण लक्षात ठेऊन वागा म्हणजे तुमचे कल्याण होईल असे सांगून सर्वानाच श्री साईनाथांनी सारखाच भक्तिमार्ग सांगितलेला आहे. श्रींच्या गाठी पूर्व पुण्याईचे बळ नसते तर शिरडीला एक पळभरही कुणी भक्त ठरला नसता व ठरणार नाही. म्हणून श्रीसाई भक्तांनो, श्री साईंनी भक्तिमार्गाचा जो उपदेश केला आहे, सतत नामस्मरणाचा जो संदेश दिला आहे तो चोखाळा तुमचे त्यामध्ये हितच हित आहे यात शंकाच नाही.

# साईनाथ पाहिले गोदातीरी

साईनाथ पाहिले गोदाऽतीरी, शतदीप उजळले
भक्तांच्या उरी।। धृ.।।

साईनाथांची शुभद शुभ्र पाऊले।
सेवाया, सर्व भक्तजण आले।
माझ्या नयना मधुनी झरती; प्रेमाश्रूंच्या सरी।। १।।

चरण छाळिते भक्ता माउली।
छत्र तरूचीऽऽ, शितलऽ राई।
गोड आरती भक्तगण गाती।
भुलली शिरडी पुरी।। २।।

यतिवेषे मला साईमूर्ति शोभली।
अपार करुणा हृदयी, माझ्या भरली।
सुर्य चंद्रमा नयनी वदनी,
शांति सुमे साजिरी।। ३।।

**— श्री. अशोक सातव**
भिलाई नगर, जि. दुर्ग.

# श्री साईनाथांचा शरणार्थी — (२४)

लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवाद : वि. बा. खेर

**(श्री साईनाथांच्या महासमाधिपासून १९३४ पर्यंतचे लेखकाचे पारमार्थिक अनुभव या व पुढील एका लेखात देण्यात येतील.)**

सन १९१८ मध्ये दिवाळीच्या रजेत मी विलेपार्ल्याला गेलो. परंतु तेथे पोचल्यावर लगेच दुसऱ्या दिवशी मला इन्फ्लुएन्झा झाला. त्या दरम्यान बाबांच्या गंभीर आजारासंबंधी ऐकले व नंतर लगेच एकदोन दिवसात त्यांनी देह सोडल्याचे वृत्त आले. शिरडीला जायला मला जमले नाही. परंतु माझ्या मनात अशी भावना राहिली की बाबांच्या परीक्षेत मी अनुत्तीर्ण झालो आणि म्हणून वारंवार विचारून सुद्धा त्यांनी १९१६ नंतर सर्वत्याग न करावा व सॉलिसिटरच्या परीक्षेस बसावे असे सांगितले. त्यांची आज्ञा पाळणे माझे कर्तव्यच होते, तरीही माझ्या मनाला लागून राहिले की माझे वैराग्य कमी, म्हणूनच बाबांनी अशी आज्ञा केली.

१९१९ मध्ये श्रृंगेरी मठाच्या शंकराचार्यांची ख्याति ऐकून त्यांना मी पत्र लिहून विचारले की, ते मला संन्यासाची दीक्षा देतील का? त्यांच्या चिटणीसांचे उत्तर आले. त्यात काय होते ते आता (ता: ११-८-१९५९) नक्की आठवत नाही. परंतु त्यांनी नकार दिला असावा व संसारात राहून कर्मानुचरणाने चित्तशुद्धी प्राप्त करण्यास सांगितले असावे असे वाटते. नंतर सुटीत मी मुंबईमार्गे टेरीकेरी स्टेशनवरून श्रृंगेरीला गेलो. तेथली भाषा मला अवगत नव्हती म्हणून बहुसंख्य माझ्याशी संस्कृतमधेच बोलत. माझ्यासह धर्मशाळेत उतरलेली मंडळीसुद्धा साधारणतः माझ्याशी संस्कृतमधेच वार्तालाप करत. संस्कृत ही जिवंत भाषा असल्याची जाणीव तेथे मला झाली. त्यांचे संस्कृत मला समजे परंतु मी संस्कृतमध्ये संभाषण करू शकत नसल्यामुळे तेथे इंग्रजी जाणणाऱ्या एका गृहस्थांच्या बरोबर व त्यांच्या मार्फत मी बोले. शंकराचार्यांना भेटलो तेव्हा माझ्या पत्रासंबंधी ते म्हणाले, "मुलाला यज्ञोपवित द्या व मुलीचे अकराव्या वर्षी लग्न करा. या दोन्ही एकाच वेळी पार पाडल्यानंतर तुमच्या संन्यासाविषयी विचार करू."

शंकराचार्य फार प्रेमळ होते. ते 'ब्रह्मसूत्र'चा वर्ग चालवत, त्यात बसण्याची खास परवानगी माझ्या तेथील वास्तव्यात मला देण्यात आली. मठात जेवताना प्रथम मला दूर बसवण्यात येई पण नंतर आचार्यांच्या सूचनेवरून किंवा मी ब्राह्मण आहे हे समजल्यानंतर त्यांच्या पंगतीत मला बसवत. शंकराचार्य गुजराथमधील खाण्याचे रीतिरिवाज जाणत असल्यामुळे त्यांनी एकदा फक्त मलाच पुरी वगैरे वाढण्यास सांगितले. तेथील ब्राह्मणांना ते दोन्ही वेळा लाल तांदुळाचा भात देत, ज्याला ते लोक 'अन्न' असे म्हणत. दहा दिवस तेथे राहून मुंबईला परतलो व सुटी संपताच अहमदाबादला माघारी आलो.

शाळा बंद होती त्या दरम्यान मी नडीयादला काकांच्या येथे राहिलो. नंतर ठरलेल्या दिवशी शाळा उघडताच मी अहमदाबादला आलो. पण प्लेगचा जोर बराच असल्यामुळे

ती उघडून लगेच पंधरवडा किंवा एका महिन्यासाठी बंद करावी लागली. म्हणून मी मुंबईला गेलो व ज्या दिवशी शाळा उघडणार त्याच्या आदल्या दिवशी विलेपार्ल्याहून निघून अहमदाबादला येण्याचे नक्की केले. तेव्हा बाबांनी कानात सांगितले, "अजून प्लेग चालू आहे, शाळा पुनः बंद होणार आहे." परंतु मी शाळा उघडण्याच्या दिवशी अहमदाबादला पोचलो. गाडी उशीरा चालत होती म्हणून अहमदाबादला पोचण्यास वेळेपेक्षा आठ तास उशीर झाला. नंतर शाळेत गेल्यावर रामशंकर वगैरे तेथे होते, ते म्हणाले, "गावात प्लेगचा पुष्कळ जोर आहे. लोक शहर सोडून गेले आहेत म्हणून सुटी वाढवली आहे." त्याने बाबांचे शब्द खरे होते याची प्रतीति आली व मी परत मुंबईला गेलो व दिवाळीच्या सुटीत तेथेच राहिलो.

साईमहाराजांनी महासमाधि घेतल्यानंतर रामनवमी, गुरुपौर्णिमा, कृष्णजयंती या निमित्ताने मी आठ दिवस फराळ करून राही व गुरुचरित्राचे एकदोन वेळा पारायण. श्री साईसच्चरिताचे पारायण तसेच पद्यात्मक भागवतातील दशम स्कंधाचे पारायण करी. भागवतात गोपींनी भगवानाच्या प्राप्तीसाठी कात्यायनी व्रत केले होते हे वाचून एक महिना म्हणजे कार्तिक वद्य १ पासून मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेपर्यंत मीठ-सैंधवाशिवाय फिके (मोळु) अन्न खाऊन व अखंड दिवा ठेवून ते व्रत मी पाळले.

काकासाहेब दीक्षितांच्या इच्छेवरून या काळात त्यांना एक लेख लिहून दिला, त्याच्यात गुरुस्तुतीत 'तत्त्वमस्यापि लक्षं' याचा अर्थ मी तत्त्वमसि आदि वाक्यानी लक्षात येतो तो गुरु असा केला. काकासाहेबांनी त्यात सुधारणा करून मला समजावले की, ज्याचा अर्थ तत्त्वमसि वाक्याने समजतो तो गुरु असा नव्हे; परंतु जो गुरु तत्त्वमसि आदि महावाक्यांचे लक्ष आहे तो. म्हणजे तत्त्वमसि या वाक्याने तो ओळखला जात नाही, उलट तत्त्वमसि वाक्याच्या ज्ञानाने जे प्राप्त होते तेच हा गुरु आहे.

१९१९ सालच्या ऑक्टोबरच्या सुटीत शिरडीला गेलो. काकासाहेब दीक्षित, बुटीसाहेब तेथे होते. त्यावेळी दसरा असावा. बाबांच्या पुण्यतिथीच्या दिवशी ब्राह्मणांना बोलावून विधीपूर्वक पूजाअर्चा काकासाहेब आदींनी केली. नंतर ब्राह्मणांना भोजनाला बसविले. जेवण सुरू करण्यापूर्वी ब्राह्मण म्हणाले की, गीतेच्या पंधराव्या अध्यायाचे पठन करा. काकासाहेब म्हणाले, "मला तो पाठ नाही." 'मला येतो' असे म्हणून मी त्याचे पठन केले. पठन संपताच ब्राह्मण म्हणाले, "तुमच्या पठनात पंचवीस चुका झाल्या." हे ऐकून काकासाहेब थोडेसे घाबरले. त्यांना धास्ती वाटली की मी ब्राह्मणांना खोडून काढीन, म्हणून त्यांनी माझ्याकडे बघितले. मी समजलो व काकासाहेबांच्या इच्छेला मान देऊन, टीकेला उत्तर न देता ती मी मूक वृत्तीने सहन केली.

मी एकदम संन्यास घ्यावा असा राधाकृष्णआईचा आग्रह होता असे मी समजत होतो. उलट बाबांना अनेकदा पुसता त्यांनी मी सॉलिसिटरच्या परीक्षेस बसावे व कामधंदा करावा असे दोनतीन वेळा सांगितले म्हणून मी घोटाळ्यात पडलो होतो. राधाकृष्णआईचे साईबाबांशी तादात्म्य होते आणि त्याची प्रतीतिसुद्धा बाबांनी दिली होती हे आपण पाहिले. यामुळे मला असे वाटे की बाबांनी विवेकाखातरच सॉलिसिटरच्या परीक्षेस

बसण्यास व कामधंदा करण्यास मला सांगितले असावे. श्री. उपासनीत मला साईबाबाच दिसतात असे बापूसाहेब जोगांनी मला सांगितल्यामुळे श्री. उपासनींचा सुद्धा अभिप्राय घ्यावा असा विचार माझ्या मनात आला व साकोरीत कायम वास्तव्य करून असलेल्या श्री. गोविंद कमळाकर दीक्षित यांना मी लिहिले. दीक्षितांचे उत्तर आले, त्यात म्हटले होते — "मी तुमचे पत्र श्री. उपासनी महाराजांना वाचून दाखविले. त्यांनी असे कळविण्यास सांगितले आहे की, अमुक दिवशी उज्जैनला असेन. तेथे मला भेटावे म्हणजे खुलासा करीन." परंतु त्या पत्रात उज्जैनला कोठे भेटावे त्यासंबंधी काहीच माहिती नव्हती. त्यातून माझी श्री. उपासनींची ओळख नवी. शिवाय आपल्या शंकाकुशंका आपल्या गुरुशिवाय दुसऱ्याकडून कशा सोडवून घ्यावयाच्या? तसं केल्यास ती गुरुभक्तीची उणीव होईल. असं वाटण्याचे विशेष कारण हे होते की १९१६ साली पारमार्थिक बाबतीत पेचप्रसंग उद्‌भवला तेव्हा राधाकृष्णआईला विचारल्याबद्दल बाबांनी 'तिला कशाला विचारलस' या शब्दांनी माझी कानउघडणी केली. त्यावरून गुंतागुंतीचा उकल दुसऱ्याकडून न करवून घेण्याच्या निश्चयाने मी उज्जैनला गेलो नाही.

१९२२ च्या दसऱ्यानंतर श्री. उपासनींचा अधिक परिचय झाला. साईमहाराजांनी केवळ कृपेने माझे जीव-शिव ऐक्य करून दिले, परमात्म्याशी तादात्म्य करून दिले. प्रसन्न होऊन एकदम ज्ञानावस्था, सहजावस्था मला प्राप्त करून दिली. त्यासाठी लागणाऱ्या साधनेची त्यांनी मला कल्पना दिली हे निश्चित परंतु माझ्याकडून पद्धतशीर श्रवण, मनन, निदिध्यासन, समाधि आदि कठीण साधना करून घेतली नाही. त्यामुळे साईबाबांनी मला दिलेल्या ज्ञानरत्नाची पारख, खरी किंमत, महत्ता श्री. उपासनींच्या समागमानेच समजली. तसे न होते तर जसे माकड किंवा अडाणी माणूस हातातले रत्न दगड आहे असे समजून फेकून देतो तसे कदाचित माझ्याबाबतीत झाले असते!

मी काकासाहेब दीक्षितांना एकदा विचारले, "श्री. उपासनींच्या चरित्रात असे लिहिले आहे की ते तुमच्या वाड्यात जेवत असत. नंतर तुम्ही माधवरावांना पोस्टकार्ड पाठवून त्यांच्यामार्फत आपल्या वाड्यात जेवायला येऊ नये असे कळविले. म्हणून वरील निरोप मिळताच त्याच दिवशी उपासनी रागावून असे म्हणून निघून गेले की, 'उद्यापासून जेवायचे बंद करावयाचे असेल तर आजपासून सुरुवात का नको?' हे कितपत खरं आहे? काकासाहेबांनी उत्तर दिले, "वामनराव, हे तुम्हाला खरं वाटतं?" मी म्हणालो, "ही गोष्ट मला तुमच्या स्वभावाविरुद्ध वाटते. म्हणून पुस्तकातील लिखाणात कितपत सत्यांश आहे याची खात्री करून घेण्यासाठी मी तुम्हाला विचारले." त्यावर ते उद्‌गारले, "त्यांची (उपासनींची) तपश्चर्या आहे आणि त्यांच्या काही गोष्टी चांगल्या आहेत. पण मी तुम्ही म्हणता ते पुस्तक पाहिले आहे आणि त्याच्यात आपल्या मनाचे काल्पनिक असं काही त्यांनी घातलं आहे. मला याचे आश्चर्य वाटते की तुमचा त्यांच्याशी मेळ कसा बसतो? तुमचे त्यांच्याशी पटते तरी कसे?"

आज म्हणजे ता. १९-८-५९ या दिवशी गुरुभक्ति एकपत्नीव्रताप्रमाणे आचरण्याच्या नीतिविषयी स्मरण करता अंतरिक्षद्वारा ऐकलेल्या आवाजाला किती महत्त्व द्यावयाचे

त्यासंबंधी विचार येतो. १९१६ मधे शिरडीत एका सकाळी मला आवाज ऐकू आला, 'बघ मला येथे टांगून ठेवले आहे.' हा आवाज हुबेहूब बाबांच्या आवाजासारखाच होता. ज्या दिशेकडून हा आवाज आला तिकडे बघता क्षणी असे दिसले की मुक्तारामांनी त्यांना बाबांनी दिलेली कफनी धुवून सुकायला टांगली होती. या वरून निर्जीव वस्तूंमधून — बाबांच्या सारख्याच कफनीतून बाबांची वाणी निघू शकते आणि ऐकू येते याची प्रतीति येते. परंतु त्यावर विचार करायचा नसतो. मग ऐकलेले काय खरं मानायचं? बाबांनी प्रत्यक्ष सांगितले असेल तेवढेच, अधिक नाही. आवाजाद्वारा सर्वच शुभ सूचना असतील असे मानू नये. स्वतःच्या दुष्ट वासना, शंका, कुशंका, भय आदी मलिन वृत्तींचे सूक्ष्म विचार या वाणीरूप व्यक्त होतात. म्हणून अशा रीतीच्या ज्या ज्या सूचना शास्त्र-आचार किंवा रूढीविरुद्ध असतील त्यांवर लक्ष्य दिल्यास, त्यांत रंगून गेल्यास व त्याप्रमाणे भूलचुकीने आचरण केल्यास लाभ होणार नाही, उलट कित्येक वेळा हानीच होण्याचा संभव आहे. म्हणून अशा आवाजाला दैवीवाणी मानण्याची चूक करू नये. एवढेच नव्हे तर असे आवाज ऐकण्याची व त्यावर विचार करण्याची काहीच जरूर नाही. शक्यतो नामस्मरणाने किंवा वाचनाने ऐकूच येणार नाही, अशी युक्ती करावी.

१९१६ साली बाबा एकदा म्हणाले होते, "वामनचे सर्व भाव येथेच राहिले आहेत म्हणून त्याच्या मेंदूची ही नाजूक स्थिती झाली आहे." त्यावरून विचार स्फुरतो की जी कफनी बाबा वापरत ती कफनीसुद्धा चैयन्यमय आहे अशी भावना माझ्या चित्तात खोलवर रूजली होती. म्हणूनच मुक्तारामांच्या सुकत घातलेल्या कफनीतून 'बघ मला येथे टांगून ठेवले आहे' असा आवाज आला तो बाबांचा होता असे मी समजलो. त्यायोगे बाबांना मला काय बोध करायचा होता? असा की 'हे बघ वामन, माझा देह, माझे डोळे, कान, नाक, कपाळ, डोके, तोंड, पोट, छाती वगैरे अवयव व त्या सर्व अवयवांचे व्यवहार व माझी कफनी डोक्याला लपेटलेले फडके वगैरे मी नव्हेच. माझ्या देहाकडून होणारे सर्व व्यवहार — खाणे, पिणे, बोलणे, हिंडणे, फिरणे वगैरे यांत्रिक आहेत असे समज. माझे खरे स्वरूप त्याच्या पलीकडे आहे. या माझ्या मायिक व्यवहाराद्वारे तुला जेवढे उपयोगी व जरूरीचे असेल तेवढेच सांगेन, तेवढेच दाखवेन व तेवढेच तू पहाशील. म्हणूनच तुझे सर्व भाव येथे राहिले आहेत ते मायिक समजून सोडून दे. तुला संसारात राह्यचे असल्यामुळे त्या दृष्टीनेच सर्व व्यवहार कर. तुझ्या मेंदूच्या नाजूक स्थितीचे कारण तू माझे खरे स्वरूप ओळखले नाहीस व माझे मायिक शरीर व त्याचे सर्व व्यवहार हे खरे मानलेस. आता हा भ्रम सोडून सर्व व्यवहारांपलिकडे, मन, बुद्धी व वाणी यांना अगोचर असलेला, सर्वव्यापी, सर्वज्ञ, अंतर्यामी, विश्वाचा कर्ता-हर्ता मी आहे; त्याचा ध्यास धर व हे ध्यानात ठेवून सर्व काम कर.'

जे सर्व आवाज ऐकू येतात ते सर्व खरे आहेत किंवा खोटे आहेत ते मी सांगू शकत नाही.

१९१७-१९२१ या कालावधीत माझ्या धाकट्या बहिणीला कफ, ताप, अरुचि वगैरेने पछाडले. औषध चालू होते पण गुण येत नव्हता. एकदा सकाळी मी तिच्या जवळ बसून चहा पीत होतो. तेव्हा एकदम आवाज आला, 'तुझ्या धाकट्या बहिणीला काही

विशेष दुखणे नाही. फक्त कर्मीचा जोर आहे.' त्याप्रमाणे 'काचकाची कॉफी' (एका वनस्पतीचा काढा) घेण्याने ती बरी झाली. याच दरम्यान ब्रह्मदातण तसेच धोतीचे माझे प्रयोग सफल झाले.

मार्च १९१७ ते जानेवारी १९२१ पर्यंत मी अहमदाबाद मॉडेल हायस्कूलचा प्रिन्सिपॉल होतो. त्या दरम्यान पूर्वपरिचित श्री. रामशंकर त्रिपाठींचे वडील हरजीवनदास त्रिभुवनदास यांनी संन्यास घेतला. त्याचा विधी सरखेज येथे झाला. त्याला मी हजर होतो. संन्यासाची दीक्षा देणाऱ्या संन्याशाने हरजीवनदासांकडून कबूल करून घेतले होते की, 'मी तुम्हाला संन्यास एकाच शर्तीवर देईन व ती म्हणजे तुमचा मुलगा मी जिवंत असेपर्यंत माझी सेवा करेल.'' त्यांनी अशी मान्यता दिल्यामुळे हरजीवनदास संन्यास घेऊ शकले. माझ्या मते त्यांना संन्यासी होण्यासाठी फार भारी, वाजवी पेक्षा अधिक दक्षिणा द्यावी लागली (किंमत मोजावी लागली.)

हरजीवनदासांचे संस्कृतचे ज्ञान नगण्य असल्यामुळे त्यांनी आपल्याजवळचे 'संन्यास पद्धति' हे पुस्तक मला देऊन त्याचा गुजराथी अनुवाद करून देण्यास सांगितले. म्हणून हे पुस्तक पाहण्याची व त्यावर विचार करण्याची संधी मला आपोआप प्राप्त झाली. मी हे पुस्तक स्वतःसाठी मागवले व ते वाचले. त्यातले जेवढे मला समजले ते हरजीवनदासांना सांगितले. या वाचनाने संन्यास घेण्याचा माझा विचार दृढ होत गेला.

या सुमारास एकदा दोनतीन दिवसांची सलग रजा आली. राणीच्या बागेत फिरून घराकडे परत जाताना हे दिवस कसे जातील अशा चिंतेत असता म्युनिसिपल कचेरीसमोर मला एक फकीर भेटला व मला पाहून मी काही न विचारता स्वतःहून मला म्हणाला, ''जगात सर्व असंच आहे, सुख आनंद कोठे आहे? ईश्वर ठेवेल तसेच रहावे.'' असे बोलून तो फकीर निघून गेला. न त्याने माझ्याकडे पैशाची मागणी केली व न पुनः कधी तो मला दिसला. या त्याच्या शब्दांनी माझ्या तीन दिवसांच्या रजेचा कंटाळा व अशांति नाहीशी झाली व मला धीर आला की चिंता, कंटाळा, अशांति टाळणारी, माझ्यासोबत किंवा पाठीशी कोणी महान विभूति — श्री साई — आहेच आहे. तसेच एका सकाळी नऊ दहा वाजता एक संन्यासी आला. त्याने स्वतःचा हात मला दाखवून त्यात काहीच नाही याची खात्री करून दिली व नंतर हातातून दुधाची धार काढली. त्याने मागितल्याप्रमाणे दोनतीन रुपये त्याला दिले. तो म्हणाला, ''तुम्हाला जरूर फायदा होईल.'' त्यावेळी मला काहीच समजले नाही, परंतु नंतर टाटा बँकेचे शेअर घेतले होते त्यात सातशे रुपयांचा फायदा झाला. हे बघून या निर्णयावर आलो की हरएक संन्यासी धूर्त किंवा अविश्वसनीय नसतो. म्हणून त्याचा कधी अपमान करू नये व विवेकी व्यवहार करावा.

माझ्या चार वर्षांच्या अहमदाबाद येथील वास्तव्यात बाबांचे मान्यवर भक्त माधवराव (श्यामा) एकदा तेथे आले. आपले नित्यकर्म उरकून बाबांच्या आज्ञेनुसार विष्णुसहस्त्रनामाचे ते पठन करीत. पठन करता करता ते सद्गद होऊन त्यांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहत. त्यावेळी बाबांची खूप आठवण त्यांना होई असे वाटले. स्वतः स्वयंपाक करून ते खात.

ते आले त्या दिवशी माझे नित्यनियमित ध्यान अत्युत्तम झाले. त्यामुळे माधवरावांनी माझ्या नित्यकर्माची प्रशंसा केली. दुसऱ्या दिवशी ध्यानात काही व्यत्यय आल्यासारखे मला वाटले. नंतर मी ध्यानाच्या खोलीतून बाहेर आल्यावर माधवराव म्हणाले, "ध्यानाचे असेच आहे. भक्ति-स्मरणच सोपे आहे."

सन १९२१ मधील सत्याग्रह चळवळीत श्री. रामशंकर यांनी सर्वांच्या प्रथम आपली शाळा राष्ट्रीय विद्यापीठाला जोडली. तेव्हा जाहिरात पाहून मी मेसर्स कांगा सयानी या सॉलिसिटर पेढीकडे अर्ज केला व मासिक रु. १७५ पगारावर नोकरी धरली. नंतर श्री. मनु सुभेदार यांच्या पायोनियर रबर कंपनीत एखादे वर्ष काढले व सॉलिसिटरच्या परीक्षेची तयारी करून, १९२३ च्या नोव्हेंबरच्या परीक्षेत यशस्वी होऊन सॉलिसिटर झालो. साईमहाराज मला जेव्हा जेव्हा जरूर पडे तेव्हा मदत करत, अमूल्य सूचना करत. परीक्षेच्या वेळी मला ते म्हणाले, "तू प्रश्नांची उत्तरे लांबलचक लिहितोस, थोडक्यात पण मुद्देसूद लिही." पायोनियर कंपनी सोडल्यावर लवकरच चि. त्रिवेणीचे लग्न व मेघश्यामचे मौजीबंधन श्रृंगेरी मठाच्या शंकराचार्यांच्या सल्ल्यानुसार करून टाकले. सन १९२४ च्या जानेवारीपासून एक सव्वा वर्ष नानावटी अँड कंपनी ही सॉलिसिटरची पेढी मॅनेजिंग क्लार्क श्री. त्रिभुवनदास यांच्या मदतीने चालवली. नंतर काही महिने चोकसी अँड कंपनीत असिस्टंट सॉलिसिटर म्हणून काम केले व जुलै १९२५ ते १५-९-२६ पर्यंत श्री. परळकर यांच्या भागीदारीत 'परळकर अँड पटेल' नावाने सॉलिसिटरची पेढी चालवली.

## श्री. बाप्पाजी रत्नपारखी साईचरणी विलीन

श्री साईबाबांना अनेकदा पाहिलेले, त्यांच्या सहवासात रमलेले, शिरडी सोडून फारसे कुठेही न गेलेले साईभक्त व शिरडीच्या श्री विठ्ठल मंदिराचे सर्वस्व श्री. बाप्पाजी रत्नपारखी यांचे १५ मे १९८७ रोजी देहावसान झाले. श्री साईचरणी विलीन होण्यापूर्वी त्यांनी आपल्या चारही सूनांना व कन्येला उत्तमपैकी साड्या घेऊन दिल्या होत्या. श्री. बाप्पाजी यांचे जवळ श्रींनी दिलेली काही नाणीही संग्रहात होती. श्री साई काळातील अनेक घटना बाप्पाजींनी स्वतः पाहिल्या होत्या व त्यांची वर्णने ते भेटीत सांगत असत. श्री मार्तंड महाराजांच्या देहावसानंतर श्री. बाप्पाजींच्या निधनाने श्री साई काळातील एक जुना जाणता दुवा कायमचा दृष्टीआड झाला आहे.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती देवोत.

# तुमचा मी भार वाहीन सर्वथा।
# नव्हे हे अन्यथा वचन माझे ।।

— श्री. सखाराम महादेव बांद्रे

७/६, सिताराम केणी चाळ, मुंबई-४०० ०१२.

विश्वाचा सारा कारभार ज्या सूत्राने चालतो ते परब्रह्मतत्व, ज्यावेळी धर्माला ग्लानी येते त्यावेळी धर्मसंस्थापन करण्याकरिता साकार होऊन अवतार धारण करते. आपल्या भाविक भक्तजनांचे रक्षण करून त्यांच्या मनोकामना पूर्ण करीत असते. शिर्डीपती साईबाबा हे मुक्त असेच अवतारी पुरुष होते. जगत्कल्याणासाठी हा अवतार धारण केलेले ते एक परमात्मा होते. हे मी माझ्या स्वानुभवावरून सांगतो.

साईसेवकहो, परमेश्वर काय आहे, कसा आहे व कोणत्या स्वरुपात आहे याचा थांगपत्ता अद्याप कुणाला लागला नाही. ते शोधण्यासाठी खूप ऋषी, मुनी, साधु, संत, महंत यांनी प्रयत्न केले. परंतु व्यर्थ. एक गोष्ट मात्र खरी की, सद्गुरुंची ज्याच्यावर पूर्ण कृपा झाली त्यांनीच हे अनुभवलं व त्यातच ते विलीन झाले.

सद्गुरूवाचूनी सापडेना सोय। धरावे ते पाय आधी आधी।। सद्गुरुपदी नतमस्तक झाल्याखेरीज मनाचे उन्मीलन होत नाही. आणि मनाचे उन्मीलन झाल्याखेरीज जीवनाचे सार्थक नाही. म्हणून साक्षात् श्री साईनाथांनाच सद्गुरुठायी मानून श्री. गणेश भाऊनाथ जाधव (नाथ गोसावी) यांच्यापाशी दिक्षा घेतली.

बाबांनी मला आपल्या चरणाशी ठाव कसा दिला किंवा मी साईभक्त कसा झालो याबद्दल एक स्वानुभव येथे वर्णन करावासा वाटतो.

मी व माझे चौघे मित्र १९८४ च्या गुरुपौर्णिमेला नाथांच्या शिरडीला गेलो. नाथांच्या दर्शनार्थ भक्तांचा पूर आला होता. तेथील एकंदर दृष्य पाहून माझ्या अंतःकरणातील भक्तिचा सुगंध बहरू लागला. माझे तन-मन साईपदी एक झाले. संसाराच्या साऱ्या चिंता मी श्रींच्या चरणी अर्पण केल्या. मनोभावाने बाबांना हात जोडून मी गाऱ्हाणे घातले की, माझी मातोश्री आज ७ ते ८ वर्षे खोकल्याच्या आजाराने जीवनत्रस्त झाली आहे. वृद्धत्वामुळे तिला हे सहन होत नाही. तरी तिला आराम पडू दे. आजपासून दर गुरुवारी मी उपवास करीन व रामनवमीला मुंबई ते शिरडी चालत येऊन त्या उपवासाचे पारणे फेडीन. सारे मनसोक्त झाल्यानंतर आजन्म तुझे नाव विसरणार नाही. मी शिर्डीवरून परत आलो. बाबांची उदी आईला प्राशन करण्यास दिली. बाबांच्या कृपादृष्टीमुळे माझी आई ठणठणीत बरी झाली. मी बाबांना त्रिवार वंदन केले. तिथपासून साईनामाची मला अवीट गोडी वाटू लागली.

साईसेवकहो, साईपदी दृढभाव ठेवा व आपल्या संसारात निश्चिंत असा. प्रत्येक साईभक्ताच्या जीवनात मधुरता आणून जीवन चैतन्यमय करणारी साईमाऊली साईभक्तांच्या हाकेला असेल त्या परिस्थितीत धाऊन येते. सर्वधर्मसमभाव तत्त्वाने विश्वकल्याणाचं व्रत ज्यांनी पार पाडलं त्या सद्‌गुरु सच्चिदानंद परब्रह्म साईनाथ महाराजांना माझे कोटी कोटी प्रणाम!

# सिरदार तब सरदार

— श्री. वि. म. हटवार
१४९, रेशीमबाग,
नागपूर-९.

माझ्या साईभक्त मित्रांनो, कधीही दुसऱ्यांवर शासन करू नका. सेवा, श्रद्धा, सबुरी हा श्री साईरामाचा सर्वांना संदेश आहे. आपसात सहानुभूती, सद्‌भावना व सहकार वृद्धिंगत होईल असा प्रयत्न होत असेल तर ध्येयाची एकता स्थापित होईल.

दुसऱ्यांचे नियंत्रण व दुसऱ्यावर शासन याला इंग्रजीत बॉसिंग म्हणतात. ते करण्याऐवजी सर्वांचे सेवक बनणे श्रेष्ठ आहे. जो सर्वांची सेवा करायला सदैव तत्पर असतो तोच शासन करायला योग्य होय. आज्ञाधारकपणा असेल तर आज्ञा करण्याचा अधिकार प्राप्त होईल. सर्व क्षेत्रांत आज्ञाधारकपणा हीच कार्यसिद्धीची गुरुकिल्ली आहे. वेळप्रसंगी आपल्या जिवाची माया सोडून आज्ञेचे पालन करण्यास तत्पर असणाऱ्यांचा श्रीराम पाठीराखा असतो हे रामायणाने शिकविले आहे.

श्री साईनाथांच्या सेवकांपैकी किंवा सेवकांच्या सेवकांपैकी कोणीही वाईट नाही. वाईट असणाऱ्यांना संस्थानच्या कार्यात प्रवेश मिळत नाही. दुसऱ्याला वाईट म्हणण्यापूर्वी मी कोणात वाईट का पहावे असाच विचार केला पाहिजे. विशाल व उदार भावसंपन्न पुरुषाचा आदर्श निर्माण करणे हे आपले उद्दिष्ट आहे.

समर्थ साईबाबांनी सांगितले आहे की, हे साई संस्थान हाच त्यांचा प्रत्यक्ष देह आहे आणि ते या भूमिवर कोणत्याही रुपाने सदैव विद्यमान आहेत. साईभक्तांचे परस्पर प्रेम, सहनशीलता व सर्वांगीण पवित्रता बंधुभाव निर्माण करून एकत्व कायम ठेवते

आपण समाजात पाहतो की, मनुष्यस्वभावात दृढता असली तरी नावलौकिकाची इच्छा प्रत्येकजण बाळगत असतो. या आकांक्षेवर मात करणे फार कठीण असते. मोठी माणसे सुद्धा वेळोवेळी नाव लौकिकाच्या मोहात पडून कर्तव्यापासून ढळताना दिसून येतात.

माणसाच्या शासन व अधिकार गाजविण्याच्या प्रवृत्तीने त्याग व तपश्चर्या यांच्या अभावी भोगविलास व चैन माजून ती सेवाकार्यास ग्रासून टाकते. उथळ विचारांच्या विस्ताराबरोबर सेवाकार्याची गंभीरता व उत्कटता ऱ्हास पावते. याउलट जेथे सेवा, श्रद्धा व सबुरी असेल तेथे विलक्षण उदारता आणि कार्याची प्रबल उत्कटता एकत्र नांदून समाजही तसा घडविला जाऊ शकतो. स्वतः पवित्र राहून दुसऱ्यांना पवित्र राहण्यास शिकविणे हाच साईकार्याचा प्रमुख उद्देश आहे. हेच साई आज्ञेचे पालन करणे होय. ह्या गोष्टीची जर सदोदित आठवण ठेवली तर आपले पाऊल कधी घसरणार किंवा चुकणार नाही. ज्याला एकदा ठेच लागली असेल तो जागा होईल. श्री साईचरित्राचा व साईलीलेचा प्रभाव पडला तर भविष्यकाळी त्याला नवजीवन प्राप्त होईल.

साईभक्ताचे आचरण ज्ञान, भक्ती, योग व कर्म या चार प्रमुख साधनांवर लक्ष ठेवून असले पाहिजे. त्याग आणि सेवा, उपासना आणि कर्म ही एकत्र राहू शकत नाही हा

भ्रम आहे. आध्यात्मिक ज्ञानाने तो दूर होतो. एकाच्या उत्कर्षाने दुसऱ्याच्या विकासात विघ्न निर्माण होणार नाही. सांसारिक कटकटी वाटणारी कामेही अवश्य केली पाहिजेत. त्यातूनही काही शिकण्यासारखे तर असतेच पण इतरांनाही काही शिकविता येते. नरनारायणाची सेवा व उपासना हाच आमचा धर्म आहे. मनुष्य हाच तर ह्या सृष्टीतील सर्वश्रेष्ठ जीव आहे. त्याचे दुःख दूर करण्याकरिता श्री साईबाबां सारखे अवतार प्रगट होतात.

## जय श्री साई

जय देव जय देव जय श्रीसाई चिंतामणि
अमृत गंगा वाहे तुझीया चरणी ॥ धृ० ॥

स्वप्नी मी पाहिले दिव्य तुझे रूप
मना सदा भासते तूची मायबाप
तुझ्या नामस्मरणे धन्य झाले जीवन
हर्षभरे मोहरले माझे अंतःकरण .. ॥ १ ॥जय देव जय देव...

शिर्डी येऊनी विभुती घेतली हाती
दिव्यत्वाची आली हृदयी प्रचिती
भक्ती भावनेची तेवते इथेच ज्योती
दर्शनाने लाभली माझ्या मनी शांती .. ॥ २ ॥जय देव जय देव...

अनंत भक्त घेती धाव शिर्डी मंदिरी
उत्साहीत होती जाती सुखे अंतरी
पाहूनी मूर्ति नतमस्तक होती चरणावरी
शिर्डी देवा साईनाथा धाव सत्वरी .. ॥ ३ ॥ जय देव जय देव...

जन्मोजन्मी लाभो दर्शन ही एक आस
सदैव धावूनी यावे माझ्या हाकेस
तयाचाच करीन मी नित्य उपवास
सूर्यकांताच्या जीवनी हा एक ध्यास .. ॥ ४ ॥जय देव जय देव...

— **श्री. सूर्यकांत शंकर आंगणे**
ताडदेव बने कंपाऊंड,
मुंबई-४०० ०३४.

# साई माझी माऊली

— सौ. सुनिता यशवंत विचारे
दयानंद सोसायटी,
गोपाळनगर,
डोंबिवली (पूर्व).

स + ई = साआई = साई, आई दोन्ही शब्द किती एकरुप आहेत नाही! आई ज्याप्रमाणे मुलांवर रागावते पण तेवढीच माया करते. त्यांचे अपराध पोटात घालते. तशीच ही सर्वांची साईमाऊली भक्तांचे अपराध पोटात घालून माया करते, आशीर्वादाचा हात सदैव दाखवते व संकट समयी धाऊन येते.

अशीच मे महिन्याची सुट्टी होती. मी डोंबिवलीहून चेंबुरला आजीकडे जाण्यास निघाले होते. माझ्या सोबत माझा छोटा भाचा अमरीश होता. गाडी फास्ट होती. पण पुढे मुलुंड व भांडुपच्या मध्येच थांबली. प्रथम वाटले सिग्नल नसेल म्हणून. पण १, २ तास झाले तरी गाडी हलेना तेव्हा कळले की आमची गाडी ज्या लाईनवर उभी आहे त्या लाईनची पॉवरच गेली. गाडीतील सव बायका उतरू लागल्या. मला खूप भिती वाटत होती मी मनातून बाबांचा सारखा धावा करत होते. कारण मला उडी मारून उतरता येणार की नाही ही भीती व सोबत ८ वर्षाचा अमरीश व बॅग. अमरीश सुद्धा घाबरला. मावशी आपण कसं जायचं? हळुहळू सर्व डबा खाली झाला व नाईलाजाने मला सुद्धा उडी मारायला लागली. अमरीशला एका माणसाने खाली घेतले.

मी उडी मारताना दांडीला धरलेला उजवा हात मागेच सोडला. त्यामुळे तो गाडीच्या लोखंडावर आपटला आणि काय सांगू अशी कळ गेली की नको प्राण झाले. दोन मिनिटं काही सुचेना. अमरीश पण मावशी काय झाले ग, बोल, ना, आणि डोळे उघडते तो समोरच्या रुळावरून मेल जोराने धावत येत होती, जणू काही यमदूत. कसे बसे अमरीशला पोटाशी धरून तिथेच खाली बसले. तो चिमुकला जीव सुद्धा एकदम बिलगला. आणि डोळे मिटून बाबा, साई माऊली वाचव आणि मेल गेल्यावर आम्ही रूळ क्रॉस करून पलिकडे आलो. व मुलुंडला मेहुल टॉकीज समोर माझे चुलत सासरे श्री. अनंत विचारे राहतात. तेथे रिक्षा करून गेले. घरी जाईपर्यंत हात चांगलाच सुजला होता. काही सुचत नव्हते. मी रिक्षातच बाबांची उदी लावली होती. सासुबाईंनी हळद व पटकी गरम करून लावली. पण हात फारच दुखत होता. शेवटी दिराला घेऊन चेंबुरला आले. तिथे माझी आई होती. (डॉ. सौ. सुमती खानविलकर) ती तर प्रथम घाबरली व बाबांचा अंगारा संपूर्ण हाताला चोळून तिने हात ताबडतोब बांधून ठेवला. आम्हा सर्वांना वाटले, हात मोडला, हाताला फ्रॅक्चर झाले असावे, प्लॅस्टर करावे लागणार व तोपण उजवा हात. काहीच सुचेना. दुसऱ्या दिवशी रविवार होता. तरी पण माझ्या मामाने दुसऱ्या दिवशी त्याच्या ओळखीच्या डॉक्टर मित्राला बोलावले. मी तर सारखी बाबांचा धावा करत होते की बाबा हाड मोडले म्हणून सांगू नका प्लास्टर झाले तर

लेक परस्वाधीन होईल.

डॉक्टरांनी तपासल्यावर सांगितले, एक्सरे काढावा लागेल. दुसऱ्या दिवशी एक्सरे काढायला गेलो, बाबांचे नाव घेऊनच एक्सरे काढला. तो मिळेपर्यंत जीवात जीव नव्हता. मामा माझी सारखी समजूत घालत होता. एकदाचा एक्सरे रिपोर्ट मिळाला नी काय सांगू माझ्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. त्या रिपोर्टमध्ये सर्व ठिक होते. फक्त पाठीच्या हाडाला मार लागला होता. लगेच डॉक्टरांना दाखवून औषध वगैरे घेऊन आलो व येताना माझ्या माऊलीसाठी मोठा हार घेऊन आलो. तो घालताना अक्षरशः डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. माझी आई माझ्या पाठीवरून हात फिरवत होती. जणुकाही बाबाच माझे सांत्वन करतात.

खरंच मी उगाचच घाबरले होते. पण संकटाशिवाय भक्तीची कसोटी नाही. साई तारी त्याला कोण मारी. म्हणूनच म्हणते साई माझी आई.

# श्री साईंचे सत्य चरित्र — अध्याय ३९ वा

**गद्य अनुवाद : — श्री. मु.ब. निंबाळकर**

१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स,

बंड गार्डन रोड, पुणे-४११ ००१.

गीताश्लोकार्थ निवेदन

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरुमहाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्गुरु साईनाथांना नमस्कार असो.

धन्य धन्य शिरडी स्थान, धन्य द्वारकामाई भुवन (राहण्याचे ठिकाण) जेथे पुण्यवान व पवित्र श्री साई निर्वाणापर्यंत (देह त्यागापर्यंत) वावरले (फिरले). धन्य धन्य शिरडीचे मुळे अति पवित्र झाला आणि त्यांच्याच मुळे त्याला तीर्थाचे स्वरूप प्राप्त झाले. त्या शिरडीच्या शिरडी गाव आधी लहान परंतु साईबाबांच्या सहवासाने (नंतर) महान झाला. त्यांच्याच मुळे अति पवित्र झाला आणि त्यांच्याच मुळे तीर्थाचे स्वरूप प्राप्त झाले. त्या शिरडीच्या बायादेखील धन्य व धन्य त्यांची अनन्य श्रद्धा. आंघोळ करताना, दळताना व धान्य कांडतानादेखील त्या असामान्य अशा साईबाबांची गीते गात असत. धन्य धन्य त्यांचे प्रेम. त्यांची गीते अत्यंत उत्कृष्ठ असत व त्यांतील काही खास गीते ऐकल्यावर मनाला शांती लाभत असे. म्हणून श्रोत्यांसाठी त्यांची जिज्ञासा तृप्त करण्याकरिता (मनाला) विश्रांती देणारी ती गीते योग्य काळी व कथेच्या अनुषंगाने मी देईन. (ओ. १-६)

श्री साईबाबा (पूर्वीच्या) निजाम संस्थानात (औरंगाबादेजवळील) रस्त्यालगत एका आंब्याच्या झाडाखाली प्रकट झाले व धूपखेड्याच्या (लग्नाच्या) वऱ्हाडासह शिरडीला अचानक आले. या खेड्यातील पुण्यवान चांद पाटील नावाच्या गृहस्थाला हा खजिना आधी सापडला व त्याच्यामुळेच त्याचे इतरांना दर्शन घडले. त्या पाटलाची घोडी कशी हरवली, साईबाबांची व त्याची गाठ कशी पडली, त्यांनी त्याला चिलीम कशी पाजली आणि त्याची घोडी कशी मिळवून दिली, तसेच चांदभाईच्या बायकोचा भाचा लग्नाचा होता, त्याला शिरडीच्या नवरीचा योग येऊन लग्नाचे वऱ्हाड नवरीच्या गावी (शिरडीस) कसे आले, याविषयीची संपूर्ण कथा श्रोत्यांसाठी आधीच (अध्याय ५ मध्ये) सांगितली आहे. ती प्रसंगानुसार आठवली तरीपण पुन्हा नको सांगायला! चांद पाटील केवळ निमित्त. बाबांना भक्तांच्या उद्धाराची अत्यंत काळजी म्हणून त्यांनी अवतार घेतला व ते शिरडीत आले. या साईबाबांशिवाय जड (बुद्धिमंद), मूढ (मूर्ख), हीन (हलके, क्षूद्र), दीन (गरीब), व्रत, तप आणि संस्काराशिवायचे साधे भोळे असे लोक त्यांचा उद्धार कोणी केला असता? अठरा वर्षांचे वय होते तेव्हापासून त्यांना एकांताची सवय होती. रात्री कुठेही न भीता ते झोपत असत. सर्वच ठिकाणे त्यांच्या मते ईश्वराने व्यापलेली होती ना? जेथे पूर्वी खड्डा होता व जो साऱ्या गावचा उकिरडा होता त्या जागी दिवसा चहूकडे फिरून रात्री ते झोपत असत. अशी बरीच वर्षे गेली आणि खड्ड्यांचा उदयकाळ आला. त्याच्याभोवती या दीनदयाळ साईबाबांचा भव्य वाडा उठला. शेवटी त्याच खड्ड्याचा गाभारा (मधला भाग) साईबाबांच्या देहाचा विसावा झाला. तेथे त्यांना कायमचे राहण्याचे ठिकाण सापडले आणि ही समाधी बांधली गेली. (ओ. ७-१७)

नम्रपणे नमस्कार करणाऱ्यांवर प्रेम करणाऱ्या त्याच श्रीसाईसमर्थांनी, पार करण्यास अवघड असा संसारसागर पार करण्यासाठी, ही स्वतःची चरित्ररूपी नौका भक्तजनांच्या कल्याणासाठी निर्माण केली आहे. ही संसाररूपी नदी पार करण्यास फार कठीण आणि आपला भक्तपरिवार तर आंधळा आणि पांगळा. त्यांचेकडून तो कसा पार करवेल? अशी बाबांना त्यांचेविषयी कळकळ वाटत होती. ज्या सर्वांना संसार सागर पर करून जायचे असेल त्यांनी आपले अंतःकरण शुद्ध केले पाहिजे. चित्तशुद्धी हेच (मोक्षाचे) मुख्य साधन आहे. आणि त्यासाठी ईश्वराची भक्ती हाच पाया होय. (हरिगुरूकथा) श्रवणा (ऐकण्या) सारखी दुसरी भक्ती नाही. श्रवणाने गुरुंच्या चरणांची सहज ओढ लागते, बुद्धि निर्मळ व शुद्ध होते आणि तेथून पुढे परमार्थ साध्य होतो. (ओ. १८-२१)

साईबाबांच्या या कथा असंख्य आहेत. सर्वच गाईल्या तर मोठा ग्रंथच होईल. थोडक्यात सांगू म्हटले तरी विस्तार आवरला जात नाही. श्रोत्यांची जसजशी ऐकण्याची उत्सुकता वाढते तसतशी (वक्त्याची) वर्णन करण्याची आवड वाढते. आपण एकमेकांची हौस पुरवून घेऊ या आणि आपले कल्याण साधू या. येथे साईबाबाच कर्णधार (सुकाणू धरणारे) आहेत व अत्यंत लक्षपूर्वक ऐकणे हेच वाहून नेण्याचे साधन आहे. कथा-श्रवणी श्रद्धा व आदर असले की पलिकडे पोहोचायला वेळ लागत नाही. (ओ. २२-२४)

गेल्या अध्यायात हंडीचे संक्षिप्तपणे वर्णन झाले आणि एका भक्ताची (बिनीवाल्यांची-

नानासाहेब चांदोरकरांच्या शाडूंची) दत्ताची भक्ती पक्की करणे व भक्तांना नैवेद्य खाऊ घालून संतुष्ट करणे याचेही निरूपण झाले. प्रत्येक अध्याय संपविताना पुढील अध्यायाच्या विषयाची सूचना द्यावयाची अशी पद्धत आतापर्यंत होत गेली हे सर्वांना ठाऊक आहे. परंतु मागचा अध्याय संपताना पुढच्या कथेची आठवण नव्हती. साईबाबा जो विषय आठवून देतील त्याचेच वर्णन केले जाईल असे मी स्पष्ट म्हटले होते. त्याप्रमाणे साईबाबांच्या कृपेने जे आठवले तेच आता श्रोत्यांसाठी याठिकाणी मी सादर करतो. तरी श्रोत्यांना विनंती की विघ्नांना दूर सारून शांत चित्ताने इकडे लक्ष द्या. मनाला आनंद होईल. (ओ. २५-२९)

एकदा सद्भक्त नानासाहेब चांदोरकर मशिदीत बसून बाबांचे पाय दाबीत होते व तोंडाने गीतेचे श्लोक गुणगुणत (हळू आवाजाने म्हणत) होते. भगवद्गीतेच्या चवथ्या अध्यायाचा चाळा जिभेला लावून दिला होता आणि हाताने बाबांचे पाय चेपीत होते. तेव्हा काय नवल घडले ते पहा! साईसमर्थ बाबांना भूत, भविष्य आणि वर्तमान या सर्व काळांचे ज्ञान होते. त्यांचे मनात आले की, नानांना गीतेचा अर्थ समजावून द्यावा. "ज्ञान-कर्म-संन्यास व ब्रह्मार्पण योग" या भगवद्गीतेतील ४ थ्या अध्यायाचे पठण आणि त्याची नानांनी केलेली अस्पष्ट गुणगुण बाबांनी आपल्या प्रश्नाला कारणीभूत केली. "कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते" (हे अर्जुना! सर्व प्रकारच्या सर्व कर्मांचे पर्यवसान ज्ञानात होत असते.) हा तेहतिसावा श्लोक संपल्यावर "तद्विद्धि प्रणिपातेन" हा (चौतिसावा) श्लोक चालला. हा जो चौतिसावा श्लोक, तेथेच नानाच्या पठणास विश्रांती मिळाली. तेव्हाच बाबांच्या मनात प्रश्न विचारावेसे आणि आपला उपदेश करावेसे वाटले. बाबा म्हणाले, "नाना! काय रे गुणगुणतोस? जे हळू म्हणतोस ते स्पष्ट म्हणना. जे गालात पुटपुटतोस ते मला ऐकू येऊ दे की." म्हण म्हणता नानांनी आज्ञा प्रमाण मानून तो श्लोक चारी चरणांसह (पुन्हा) म्हटला. बाबांनी मग त्याचा अर्थ स्पष्ट करून सांगण्यास सांगितले. त्यावर नानांनी अत्यंत नम्रपणे हात जोडून आनंदित मनाने व मधुर शब्दांनी उत्तर दिले व भगवंताचे (श्रीकृष्णाचे) मनोगत स्पष्ट केले. (ओ. ३०-३८)

आता हा श्रीसाईबाबा व कै. नानासाहेब चांदोरकर यांचा संवाद सर्वांना स्पष्ट होण्यासाठी भगवद्गीतेतील मूळ श्लोकाचा पदापदाने उतारा घेऊ या. प्रश्नाचे वर्म कळण्यासाठी तसेच संतांच्या मनाचा कल समजण्यासाठी वाटते की, असा उपाय करावा की, ज्यामुळे निःसंशय अर्थ हाती येईल. आधीच गीर्वाण (संस्कृत) भाषा दुर्गम्म (समजण्यास अवघड). ती साईबाबांना सुगम (सोपी) कशी झाली? शिवाय प्रश्नपण खुबीदार! लोक आश्चर्य करू लागले, (आणि म्हणू लागले) "खरोखर संतांच्या ज्ञानाची मर्यादाच कळत नाही. साईबाबांनी संस्कृत भाषेचा अभ्यास कधी केला आणि गीता कधी वाचली की ज्यामुळे ते गीतेच्या अर्थाचे मर्म जाणणाऱ्यांप्रमाणे प्रश्न विचारतात?" श्रोत्यांच्या समाधानासाठी व त्यांना मूळ श्लोकाची कल्पना यावी म्हणून व चर्चेला मदतरूप होईल म्हणून भगवंताचे (श्रीकृष्णाचे) वचन मी अक्षरशः देतो :—

तद्विद्धि प्रणिपातेन, परिप्रश्नेन सेवया।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं, ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन. ॥अ. ४ श्लो. ३४ ॥

हा तो गीतेचा मूळ श्लोक. टीकाकार पुष्कळ झाले व त्यांच्या भाष्यांप्रमाणे या श्लोकाचा अर्थ पाहिला तर सर्वांचे एकच मत पडते. नानादेखील मोठे बहुश्रुत (विद्वान) व गीताभाष्याचा दीर्घ अभ्यास केलेला. ते (विविध भाष्यांत दिलेला) श्लोकाचा अर्थ सांगू लागले. विनयपूर्वक, नम्रपणे, रसपूर्वक, मधुर शब्दांनी श्लोकाचा अन्वयासह अर्थ ध्यानात आणून ते तो सांगण्यासाठी तयार झाले. ते म्हणाले "गुरुचरणी जो दंडवत घालून नमस्कार करतो (काया वाचा मनाने शरण जातो), जो गुरुसेवेकरिता आपला जीवही (प्राणही) विकायला तयार होतो व जो गुरुला आदरपूर्वक (ज्ञान स्पष्टपणे संपादन करण्यासाठी) प्रश्न करतो, त्याला (तत्त्ववेत्ते) ज्ञानीजन ज्ञानाचा अर्थासह उपदेश करतात. सारांश, कृपामूर्ती श्रीकृष्ण प्रेमाने अर्जुनाला जे म्हणाले ते हेच. "अर्जुना! गुरुसेवा व गुरुवंदन हेच ज्ञान प्राप्त करून देणारे आहेत. तू या मार्गाने गेला तर तत्त्व जाणणारे (व आत्मदर्शन झालेले) ज्ञानीजन तुला ज्ञानाचा रस्ता दाखवितील." बाबा! तोच अर्थ मी जाणतो. शंकराचार्य, आनंदगिरी, शंकरानंद, श्रीधर, मधुसूदन आणि नीलकंठ या सर्वांनी आपल्या भाष्यात भगवंताचा उपदेश असाच सांगितला आहे." (ओ. ३९-५१)

पहिल्या दोन चरणांचा अर्थ साईसमर्थांनी मान्य केला. परंतु दुसऱ्या अर्ध्या श्लोकाच्या (राहिलेल्या दोन चरणांच्या) विवरणासाठी ते जे म्हणाले ते ऐका. (त्यावेळी) चकोररूपी इतर भक्तगणही साईमुखरूपी चंद्राकडे लक्ष लावून अमृतकणाचे सेवन करायला आ वासून बसले होते. बाबा म्हणाले, "नाना! श्लोकाचा तिसरा चरण पुन्हा पूर्णपणे लक्षात घे. ज्ञान शब्दामागे अवग्रह ('अ' चा लोप दाखविणारे 'ऽ' असे चिन्ह) लाव व मग त्या चरणाचा अर्थ कर. मी काय असे उलटे म्हणतो, अर्थाचा अनर्थ करतो, पूर्वीचा भाष्यांचा अर्थ खोटा की काय असेही उगाच म्हणू नकोस. ज्ञानी व तत्त्व जाणणारे 'ज्ञानाचा उपदेश करतील' असे जेथे म्हणतोस तेथे 'अज्ञानाचा उपदेश करतील' असे शब्द घाल म्हणजे खरा अर्थ तुला कळेल. ज्ञान हा बोलण्याचाच विषय नाही (फक्त अनुभवण्याचाच आहे) तर त्याचा उपदेश कसा करता येईल? म्हणून ज्ञान शब्दाचा विरोधी शब्द (विपर्यय) घे आणि मग त्याचा अनुभव पहा. तुझ्या 'ज्ञान' या शब्दाचा (पदाचा) अर्थ ऐकला. त्याजागी 'अज्ञान' या शब्दाचा अर्थ घेतला तर काय बिघडते? 'अज्ञान' हे वाणीचा विषय होऊ शकते पण स्वतः 'ज्ञान' शब्दांच्यां पलिकडले आहे. ज्याप्रमाणे वार गर्भाला वेटोळे घालून असते व मळ (घाण) आरशाला किंवा राख अग्नीला झाकून असते त्याप्रमाणेच अज्ञान ज्ञानाला झाकून असते. ज्ञान अज्ञानाने घेरलेले आहे असे श्रीकृष्णांनी गीतेत म्हटले आहे. (अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ॥ अ.५ श्लो. १५ ॥). म्हणून अज्ञान बाजूला सारले गेले की, ज्ञान स्वभावतःच प्रकाशित होते. ज्ञान हे स्वयंप्रकाशित परंतु शेवाळ्याने आच्छादलेल्या शुद्ध पाण्यासारखे आहे. हे शेवाळ जो शहाणा माणूस बाजूला सारेल त्यालाच ते शुद्ध पाणी लाभेल. जसे चंद्रसूर्यांचे ग्रहणांचेवेळी चंद्र व सूर्य तर सर्वदा प्रकाशमानच असतात परंतु राहू व केतू आड

येऊन आमची दृष्टी रोखतात, चंद्र व सूर्य यांना काहीच धक्का बसत नाही तर आमच्याच दृष्टीला आडकाठी होते, तसे ज्ञान हे स्वस्थानी स्वयंसिद्ध व सुरक्षित असते. डोळे जे पाहतात त्यांची पाहण्याची शक्ती ते ज्ञान व त्यावरचे पडळ (पडदा) ते अज्ञान, जे अवश्य दूर केले पाहिजे. ते पडळ हाताच्या कौशल्याने दूर सारा व अज्ञानरूपी अंधःकार झाडून काढून पाहण्याची शक्ती प्रकट करा. (ओ. ५२-६५)

"दृष्टीस दिसणारे हे सर्व मायेचा अवर्णनीय खेळ (विजृंभित) आहे. हीच अनादी (उगम किंवा प्रारंभ नसलेली), अव्यक्त (प्रकट न झालेली) अविद्या; व अज्ञानाचे चमकणे ते हेच. ज्ञान ही वस्तू जाणण्याची आहे. ती उपदेशाचा विषय होऊ शकत नाही. प्रणिपात (नमस्कार करणे), परिप्रश्न (प्रश्न विचारणे) व सेवा ही गुरूची कृपा मिळविण्याची साधने आहेत. हे विश्व (जगत) खरे भासणे हाच मोठा भ्रम आहे आणि हेच ज्ञानावरचे अंधाररूपी आवरण (आच्छादन) प्रथम दूर झाले पाहिजे; म्हणजेच प्रज्ञानरूपी ब्रह्म प्रकट होईल. अज्ञानच संसाराचे बीज आहे. गुरुकृपेचे काजळ डोळ्यात पडले की, मायेचे आवरण उडून जाते व स्वाभाविक ज्ञान शिल्लक उरते. ज्ञान हे संपादन करायचे नसते. ते तर आधीच स्वतःच स्पष्ट असते. अज्ञानाचाच ज्ञानाला विरोध असतो हे शास्त्रात प्रसिद्धच आहे. देव व भक्त यांना वेगळे मानणे हेच विलक्षण अज्ञान होय. त्याचे निरसन होताच पूर्ण ज्ञान शिल्लक राहते. दोराच्या ठिकाणी साप भासणे हेच ते शुद्ध (खऱ्या) स्वरूपाचे अज्ञान. (खऱ्या) स्वरूपाच्या उपदेशाने अज्ञान दूर होते आणि दोराचे ज्ञान उरते. सोने आत असते व गंज (काट) वर असतो. गंजाच्या खालच्या सोन्याचा लखलखाट प्रकट व्हावयाला अग्नीच (हव्यवाटच) लागतो. (ओ. ६६-७३)

"देहाच्या उत्पत्तिचे मूळ माया असते व देहाचे चलनवलन नशीबाच्या (अदृष्टाच्या) आधीन असते. सर्व द्वंदे (सुखदुःख, जयपराजय, लाभहानी) देखील नशीबाच्या आधीन असतात आणि देहाभिमान हेच अज्ञान असते. म्हणून ज्यांना देहाभिमान नसतो त्यांना सुखदुःखाचे भान नसते. अहंकाराचे स्फुरण विरले की अज्ञानाचा नाश होतो. स्वस्वरूपाच्या अज्ञानामुळे मायेचा जन्म होतो आणि गुरुकृपेने मायेचे निरसन झाले की स्वस्वरूपाचे ज्ञान स्वाभाविकपणे होते. एका भगवद्भक्ती शिवाय इतर साधनांचा शीण कशाला? ब्रह्मदेवदेखील मायेच्या आधीन असतो व त्याचीदेखील भक्तीमुळेच मायेपासून सुटका होते. ब्रह्मलोकाची प्राप्ती झाली तरी भक्तीशिवाय मुक्ती नाही. तेथेही ईश्वरभक्ती चुकली (न झाली) तर माणूस पुनर्जन्माच्या चक्रात पडतो. म्हणून मायेचे निरसन व्हावयाला ईश्वराचे भजन हाच एक उपाय आहे. ईश्वराच्या भक्ताला (स्वर्गातून) पतन (खाली पृथ्वीवर येणे) नसते व (पुन्हा) संसारीचे बंधनही नसते. लोक म्हणतात माया लटकी आहे (खरी नाही), महान चेटकी (जादुटोणा करणारी) पण आहे आणि ज्ञानीजनांना क्षणोक्षणी फसविते. परंतु भक्त तिला चुटकीच्या तालावर (सहज) नाचवितात. जेथे मोठे मोठे विद्वान फसतात तेथे (अशिक्षित) भाविक जन टिकतात, कारण ते सदा हरिचरणी शरण गेलेले (प्रसन्न झालेले) असतात, पण विद्वानांना आपल्या ज्ञानसंपत्तीचा

अभिमान असतो. म्हणून माया पार करून जाण्याला सद्गुरुचे पाय धरावे आणि त्यांना अनन्यपणे शरण जावे म्हणजे या संसाराची भीती तात्काळ नाहीशी होईल. अवश्य येणारे मरण येवो परंतु हरीचे विस्मरण न घडो. आपल्या इंद्रियांनी (५ ज्ञानेंद्रियांनी व ५ कर्मेंद्रियांनी) आपल्या आश्रमाप्रमाणे (ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास) आणि आपल्या वर्णाप्रमाणे (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र) आपले आचरण करीत असावे व मनाने ईश्वराचे ध्यान करीत असावे. (ओ. ७४-८३)

''जसे रथाला घोडे जुंपलेले असतात तसे शरीराला इंद्रिये जुंपलेली असतात. त्यांना मनाच्या पक्क्या लगामाने बुद्धी स्वतःच्या हातांनी ताब्यात ठेवते. संकल्पविकल्पांनी भरलेले व स्वतःच्या इच्छेप्रमाणे भटकणारे मन मनसोक्त धावू पहाते परंतु बुद्धी त्याला आपल्या निश्चयाने थांबविते व लगामाने आवरून आपली सत्ता प्रस्थापित करते. बुद्धीसारखा कुशल नेता रथाचा सारथी असताना रथस्वामीला कसली चिंता? त्याने स्वस्थचित्ताने बसावे. देहाची सर्व कार्ये करून घेणे हे (निश्चय करणाऱ्या), बुद्धीचे कर्तव्य असते (वाटेल तसे भटकणाऱ्या मनाचे नव्हे) अशी मनाला संवय लावली म्हणजे सर्व व्यवसाय हितकारक होतात. (ओ.८४-८७)

''शब्द, स्पर्श, रूप वगैरे विषयांच्या मागे इंद्रिये लागली की व्यर्थ शक्ती खर्च होते आणि पदोपदी अधोगतीची भीती असते. शब्द, स्पर्श, रूप इत्यादि पाच विषयांचे जे सुख असते ते सर्व शेवटी दुःखच (असुखच) असते. खरोखरीच अज्ञानासारखे दुसरे दुःख नाही. शब्द विषयाला हरीण भुलतो आणि आपला प्राण गमावून बसतो. स्पर्श विषयाचा हत्ती उपभोग घेतो आणि मग त्याला अंकुशाचे टोचणे सहन करावे लागते. रूपविषयाला पतंग भुलतो आणि आपले शरीर जाळून घेतो. मासा ,रस विषयाच्या सुखाचा उपभोग घेतो आणि तात्काळ प्राणास मुकतो. भृंगा गंध विषयात गुंग होतो आणि कमळ फुलांत बंद होऊन पडतो. एकेक विषयापायी इतका प्रसंग येतो तर पाचही विषय एकत्र झाले म्हणजे किती भयंकर प्रसंग येत असेल? हे तर पशू, पक्षी आणि पाण्यात राहणारे प्राणी. यांची अशी वाईट परिस्थिती पाहून देखील (जाणता) मनुष्यप्राणी विषयांकडे वळतो, मग अज्ञान आणखी ते कोणते? या अज्ञानाचा नाश होऊन विषयांपासून दूर झाले की अस्वस्थ मनाला आनंद होईल, जीव, ज्ञान व स्वस्वरूप याकडे वळेल आणि आत्यंतिक सुखाचा लाभ होईल. अंतःकरणात हरी व गुरु यांचे चिंतन करा, कानाने त्यांचे चरित्र ऐका, मनाने सतत त्यांचे ध्यान करा आणि जीभेने त्यांचे नामस्मरण करा. पायांनी हरी व गुरु यांच्या गावी जा, नाकाने त्यांच्या निर्माल्यांचा (पूजा करतांना देवाला चढविलेली फुले वाळल्यावर उतरवितात त्यांचा) वास घ्या, हातांनी त्यांच्या पायांना नमस्कार करा आणि डोळ्यांनी त्यांचे दर्शन घ्या. अशा या सर्व इंद्रियांच्या वृत्ती हरी व गुरु यांच्याकारणी प्रेमाने लावणाऱ्या भक्तांची स्थिती धन्य होय. याहून दुसरी भगवद्भक्ती ती कोणती? सारांश, अज्ञान मूळासकट उपटून काढा व उरेल तेच स्वयंसिद्ध ज्ञान आहे. या श्लोकाचा गर्भितार्थ श्रीकृष्णाने अर्जुनाला नमस्कार करून अत्यंत श्रद्धेने प्रार्थना करते झाले. ''बाबा! माझे अज्ञान घालवा. मला योग्य शासन

करून माझा हट्टी अभिमान घालवून द्या. वरवर सात्विकतेची हौस परंतु मनात सदा संशय दाटलेला आणि एक क्षणभरही अपमान सहन करता येत नाही, तर अज्ञान ते दुसरे कोणते? पोटात प्रतिष्ठेला आश्रय, वर ध्यान करण्याचा देखावा करायचा आणि आत तर काम व क्रोध धुमसत असायचे, मग अज्ञान ते दुसरे कोणते? आतून सर्व कर्मे नासलेली, आचाराचा ठिकाणा नाही व विचाराचे तर दिवाळे वाजलेले पण बाहेर ब्रह्मनिष्ठ (ब्रह्मज्ञान प्रात झालेले) म्हणून मिरवायचे. याहून अज्ञान ते दुसरे कोणते? बाबा! आपण कृपेचे मेघ (ढग) आहात. कृपारुपी पाण्याचा वर्षाव करून माझा अज्ञानरूपी वडवानळ (अग्नी) शांत करा. इतक्यानेच मी धन्य होईल. मला ज्ञानाच्या गोष्टी नकोत. माझे गाढ अज्ञान दूर करा. माझ्यावर कृपादृष्टी ठेवा. हीच माझ्या सुखाची तृप्ती." (ओ. ९१-१०५)

# साईसत्चरित् — एक महासागर

**— सौ. भावना जेऊरकर**
साईधाम, विष्णूनगर, डोंबिवली.

"भगवद्गीता" प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली गीता. ही गीता सांगताना श्रीकृष्ण अर्जुनाचा गुरु, जिवलग मित्र, थोर तत्त्वचिंतक, जीवाभावाचा सखा, एक मार्गदर्शक बनला. श्रीकृष्णानें अनेक भूमिका वठवून अर्जुनाचे अस्थीर मन शांत केले व त्याला त्याचा योग्य मार्ग दाखविला. तद्वत् "साईसत्चरित" हा महान प्रासादिक ग्रंथ आपणा सर्वांना एक दिपस्तंभ आहे. श्रीकृष्णाप्रमाणे समर्थ श्रीसाई आपणास अनेक भूमिकांतून, कथांतून त्यांच्या अमृततुल्य बोलांतून सर्व तऱ्हेचे मार्गदर्शन करत असतात.

हेमाडपंतांनी साईसत्चरितातील अध्याय क्र. २ ओव्या क्र. ३४ ते ४७ मध्ये साईसत्चरित म्हणजे काय याचा परामर्ष घेतला आहे. साईसत्चरिताचे वाचन केल्याने होणारे फायदे त्याच अध्यायात ओव्या क्र. ५४ ते ६२ मध्ये सांगितले आहेत.

साईचरित्र महासागर॥ अनंत अपार रत्नाकर॥
मी टिटवी तो रिता करणार॥ घडणार हे कैसेनी॥ ओवी ३४, अध्याय - २.

साईसत्चरित हा ग्रंथ अथांग महासागराप्रमाणे आहे. या सागराची खोली अपार आहे. याच्या तळाशी अगणित रत्ने विखुरलेली आहेत. फक्त आपणास ही रत्ने गोळा करण्याची दृष्टी आली पाहिजे. जसे महासागर म्हणजे तुडुंब जलाशयाचा साठाच, तरीही त्याच्या जवळ येणाऱ्या सरितेला किंवा ओहळाला तो नाकारत नाही. गंगेसारखे पवित्र जल असो अथवा गावचे सांडपाणी असो दोघांनाही आपल्यात सामावून घेतो. मेघगर्जना

करीत सरीवर सरी कोसळल्या तरी त्यांना जवळ करतो. तद्वत हे साईसत्चरित मुमुक्षू जनांना, आस्तिक, नास्तिकांना, राव असो रंक सर्वांना जवळ करते, मार्ग दाखवते.

साईसत्चरित हा ग्रंथ गहन आहे. ह्या ग्रंथातील समाविष्ट कथा आपले समाधान करतात. साईंच्या अभूतपूर्व कथा श्रवण केल्याने शांती मिळते. भवसागर पार करण्यास शक्ती मिळते. मन एकाग्र होऊन आनंदीत अवस्था निर्माण होते. या ग्रंथात सर्वसामान्य लोकांच्या व्यावहारिक कथा आलेल्या आहेत. काहींच्या अनुभव कथा आहेत तर सांसारिक कर्तव्य पार पाडत असताना अनेकांचे कडू-गोड अनुभव आलेले आहेत. बाबांनी आपल्या मधुर वाणीने कथन केलेल्या आख्यायिका आहेत.

यातील प्रत्येक कथा जर आपण सावधानपणे वाचल्या, ऐकल्या तर तहानभूक विसरून आपण समाधान पावतो. नश्वर सुख तृणासमान मानू लागतो. या ग्रंथाच्या वाचनाने ब्रह्मार्थी याचकाला ब्रह्माचे ज्ञान होते, योग प्राविण्य मिळवू इच्छिणाऱ्यांना मार्गदर्शन होते. तपश्चर्या करणाऱ्या भक्तालाही योग्य मार्ग दाखविला जातो. या ग्रंथाचे श्रवण जे जे करतात त्यांचे कर्मपाश तोडून टाकण्याचे सामर्थ्य सदर ग्रंथात आहे. सतत वाचनाने बुद्धिला एक नवी चालना मिळते व ज्ञानमार्ग स्पष्ट होतो. या ग्रंथातील थोडी अक्षरे जरी कानी पडली तरी श्रवणार्थींचे दुर्दिन ओसरतात. मग संपूर्ण ग्रंथाचे वाचन केले तर भवसागर आपण सहज पार करून जाऊ शकू.

जो भाग्यवान असेल त्याला साईसत्चरित वाचण्याची इच्छा होईलच. पूर्ण वाचनाने तो मनाच्या परमानंद अवस्थेत पोहचेल. या ग्रंथातील श्रीमुखींच्या कथा ऐकताना भक्त देहव्यथा विसरतील. ऐकलेल्या कथांचे मनन, चिंतन केल्याने आपोआप निर्भय वृत्ती बनेल. साईवाणी म्हणजे अमृतवाणी. साईंचे बोल म्हणजे साईंचा बोध. तो भक्तांच्या अणुरेणूत आपोआप उतरेल. या ग्रंथातील प्रत्येक शब्दाची मांडणी अलौकीक आहे. तो शब्द श्रवण केल्याने भक्त तल्लीन होईल.

असा हा मौलिक ग्रंथ ऐकण्यासाठी कान, शब्द माधुर्य शोधण्यासाठी डोळे व आन्तरिक भाव एकवटून जर आपण "साईसत्चरित" हा ग्रंथ वाचण्यास सुरुवात केली तर या ग्रंथरुपी रत्नाकरातील विखुरलेली रत्ने सापडण्यास कठिण जाईल काय? कारण —

साईकृपेचिया कारणे। साईचरित्र श्रवण करणे।
तेणेची दुस्तर भवभय तरणे। कलिमल हरणे निर्मूलन॥
ओवी १९८ - अध्याय -२.

## शुद्धिपत्र

★ मे १९८७ च्या 'श्री साईलीला' अंकात प्रसिद्ध झालेल्या 'श्री साईबाबांचे बोल व त्यांची सूत्रे' या लेखाचे संकलन श्री. वि.बा. खेर यांनी केलेले आहे.

उपरोक्त उल्लेखित चुकीबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

# श्री साईबाबांचा जीवनपरिचय

— श्री. वसंत वामन प्रधान
श्री गणाधीराज को.ऑ. हाऊसिंग सोसायटी लि.,
बि. नं. २, ब्लॉक नं. ९२, मिठागर रोड,
मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१.

श्री साईबाबांचा जीवन परिचय फार विस्तृत आहे. ते कार्य श्री साई सत् चरित्राद्वारे झाले आहे. त्याचाच हा त्रोटक परिचय आहे. सध्याच्या विज्ञान युगात ईश्वरी व संतांचे चमत्कार विज्ञानाच्या निकषावर पडताळून पाहिले जात आहेत. बुवाबाजीच्या दृष्टीने ते आवश्यक ठरते. तथापि बुद्धीप्रामाण्यवादी, थोर, ज्ञानी, विचारवंत संतांच्या कार्याशी व जीवनासी समरस न होता वर वर प्रतिकूल विचाराने बुद्धीभेद करून श्रद्धेवर आघात करतात तेव्हा आपले मन दुःखी होते. जीवनात श्रद्धा नसेल तर जीवनाचा पाया कसा उभा राहील! मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्य देवोभव यांत श्रद्धेचीच शिकवण आहे. ईश्वर तर सर्वधर्मीय मानतातच. सर्व संत अत्यंत ज्ञानी बुद्धीमान होते, त्यांनी जनन, मरण यांचा विचार करून मनुष्याला दुःखमुक्त, जीवनमुक्त करण्याचा प्रयत्न केला. श्री साईबाबा देह विसर्जनानंतर सुद्धा या क्षणी साईभक्तांची काळजी वहात आहेत याचे प्रत्यंतर साईभक्त श्रद्धेने घेत आहेत. श्रद्धा डोळस असावी याबद्दल दुमत नाही. श्री साईबाबांनी समाजाला ज्ञानाची खरी दिशा दाखवून एकाच परमेश्वराचे अस्तित्व साऱ्या जीवमात्रात असून कुणी कुणाचा मत्सर, द्वेष न करिता अखिल मानव समाज सुखी व्हावा म्हणून तळमळीचे कार्य करून अवतार समाप्ती केली. काळाच्या बदलत्या घटनेनुसार समाजात नवचैतन्य, प्रेम निर्माण करून जाती व्यवस्थेवर आधारित असलेला समाज मानवतावादाने जागृत करून, बंधुभाव निर्माण करून बुद्धी व ज्ञान यांच्या सहाय्याने एकसंघ करण्याकरिता 'ज्ञानेश्वर माऊली योगेश्वर कृष्ण भगवान' श्री साईबाबा या नामरुपाने अवतीर्ण झाले. ते आपल्या रसाळ व गोड वाणीने, व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने, जशी ज्याची कुवत असेल त्याप्रमाणे त्याला पारमार्थिक ज्ञान अनुभवसिद्ध प्रात्यक्षिकासह दिले. अर्थात ते लेखी नव्हतेच कारण त्याचे स्वरूपच वेगवेगळ्या तऱ्हेचे होते. त्यांत उच्च अध्यात्मिक मूल्ये समाविष्ट होती. हे सारे प्रसंग काही जिज्ञासूंनी वेळोवेळी संग्रहीत केले. त्यांचे संशोधन श्री साईबाबांचे लाडके भक्त कै. श्रीसंत दासगणू महाराज यांनी स्वानुभवावर आधारित वैयक्तिक अनुभव सुद्धा प्रकाशित केले. ते त्यांच्या संतलीलामृत व भक्तसारामृत ग्रंथांत समाविष्ट आहेत. पुढे दफ्तर ठेवा अशी अनुज्ञा झालेले कै. अण्णासाहेब दाभोळकर उर्फ संत श्री हेमाडपंत, श्री साईबाबांनी स्वतः नामाभिधान केलेले यावत चंद्र दिवाकरौ अमर असलेले श्री साईसत्चरित्र लेखक, ज्यांच्या ग्रंथाद्वारे श्रीसाईबाबा प्रत्यक्ष चैतन्यमय प्रतिमारूप आहेत असा अद्वितीय ग्रंथ नित्य साईभक्तांच्या पठणात आहे. श्री साईसत्चरित्र साईभक्तांचा जीवनाधार आहे. श्री साईबाबांच्या सहवासात तत्कालीन असणारे निरक्षर, साक्षर, खेडूत जसे होते तसेच महाविद्वान, उच्चविद्याविभूषित परदेशगमन केलेले विचारवंत,

राजकीय, सामाजिक स्तरावर बहुमान पावलेले उच्च वर्णीयही होते. श्री साईबाबांनी प्रत्यक्ष वर्ण व्यवस्थेवर आघात न करता ज्याच्या त्याच्या कलाप्रमाणे आपआपले नित्यनैमित्तिक आचरत असता त्यांनाच एकप्रकारे उत्तेजन देऊन अती हळूवारपणे खऱ्या धर्माची दिशा दाखविली. म्हणून सर्व धर्मीय पंथीय एकाच व्यासपीठावर आले व गुण्यागोविंदाने आपआपले आचार धर्म पाळले. हे सारे होत असता मानवतावादाची जाणीव सर्वांना करून आपला धर्म व संस्कृती व्यक्तीगत मर्यादित ठेवून धर्म, जात व पंथ याच्या पलिकडे सारा मानव समाज नेण्याचे महान कार्य श्री साईबाबां इतके इतरत्र प्रभावी झाले असेल असे वाटत नाही. आजच्या संघर्षमय काळात त्यांचे कोट्यावधी उपासक प्रेमाने बंधुभावाने, एकत्र नांदत आहेत, ही किमया म्हणजेच साऱ्या जगाचा एकच देव अनेक नाम रूपाने असलेला 'सबका मालिक एक' श्री साईबाबा म्हणजेच 'मातापिता' त्यांच्या अलौकिकत्वाने तेजाने व्यापक चिरंतन तत्वाने अणुरेणूशी एकरूप आहेत. श्री साईबाबांचा जन्म कुठे झाला, आईबाप कोण, वय किती या गोष्टी समजण्यात काही अधिक फायदे संभवत नाहीत. ते कुठल्या शाळेत गेले, काय शिकले, त्यांना संस्कृत समजत होते का, ते ब्राह्मण की यवन या सर्व प्रश्नांची उत्तरे श्री साईसत्चरित्रात सापडतील. श्रद्धेने व अभ्यासू वृत्तीने जितकी पारायणे आपण करू तेवढे अनेक पैलू आपल्याला दिसतील. भक्ती, ज्ञान, वैराग्य हे सारे त्यात असून त्यात श्री साई सामावला आहे. श्री साईबाबा अयोनिज अनादी असे परब्रह्म असून ते केव्हाही कुठेही भक्ताकरिता प्रगट होतात. ते जरी आपल्याला चर्मचक्षूंना दिसत नसले तरी त्यांचे आस्तित्व जाणवते. श्रींच्या चरणी अनन्य श्रद्धा व सबूरी असणे आवश्यक आहे. त्यांना दुसरे काही नको भावभक्ती पाहिजे, आपण प्रेमाने पानफूल अर्पण करतो त्याचा ते स्वीकार करतात.

सर्वधर्मीय व सर्वभाषिक त्यांच्या त्यांच्या रिवाजाप्रमाणे श्री साईबाबांची भक्ती करतात व ती फलद्रूप होते. याचा अर्थ ते सर्व भाषा जाणतात. याचे कारण ते सर्वांचे हृदयस्थ आहेत. मनातील विचार शब्दरूप होण्याआधी ते जाणतात व त्याचे प्रत्युत्तर आपल्याला मिळते, याची जाणीव मला अनेक वेळा झाली आहे. श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणते 'तूं मन हे मीच करी'. भाषा हे त्या साईभगवंताचे गुण गाण्याचे, प्रार्थना करण्याचे साधन आहे. मौन हे सुद्धा साधन आहे. आपण जसेजसे मनाने त्या देवाशी एकरूप होऊ तसे तसे आपण देवाजवळ जाऊ. अशा रितीने भाषेचे बीज कुठलेही असो, सर्वांच्या उगमस्थानी तोच व आस्तित्वही त्याचेच. ज्याच्या सत्तेशिवाय झाडाचे पान हालत नाही, त्याच्याच सत्तेने आमची हालचाल होते, आम्ही बोलतो. अशा साईभगवंताला सर्व ज्ञात आहे, फक्त आम्हाला ते अज्ञात आहेत. ते बुद्धीगम्य नाहीत. साऱ्या अंतरिक्षाचा जसा शोध घेता येत नाही तसा त्यांच्या अस्तित्वाचा बोध होत नाही.

सोडुनी लाख चतुराई ॥ स्मरानित्य साई ॥ श्री साईसत्चरित्र नमो.

*****

# प्रेमरूप भगवान श्री साईनाथ

— श्री. पुरुषोत्तम एम. अवारे
अडगांव, बु॥ ४४४ १२६,
ता. तेल्हारा, जि. अकोला.

शिरडीत म्हाळसापती, आप्पा जागले व काशिराम शिंपी हे भक्त महाराजांची मोठ्या श्रद्धेने पूजा, सेवा करीत असत. यात काशीराम शिंपींना महाराजांचे अतिशय वेड लागले होते. ते इतके की, त्याचे वर्णन करणे अपरिहार्य! महाराजांकरिता चिलीम, तंबाखू व धुनी जाळण्याकरिता काड्यांची व्यवस्था हे सर्व काशीराम शिंपीच करीत असे व ते सुद्धा नियमीत. श्री साईनाथ कुणाही व्यक्तीकडून दक्षिणा वगैरे स्वीकार करीत नसत. हा प्रकार पाहून काशीरामने विचार केला, महाराज जर माझ्याकडून काही घ्यायला लागले तर फार बरे होईल. त्याने महाराजांना दक्षणा घेण्याकरिता पुष्कळ विनवणी केली. महाराज सुरुवातीपासूनच त्याच्यावर प्रसन्न होते, त्यांनी दक्षिणा घेणे सुरू केले. काशीरामने दिवसाची सर्व कमाई महाराजांच्या चरणी अर्पण करायची व महाराजांना इच्छा असेल त्याला हात लावायचे, असा नित्यक्रम चालू झाला. काही दिवसांतच काशीराम अभिमानाने फुगायला लागला. महाराज माझ्याच कडून दक्षिणा स्वीकार करतात, इतरांकडून नाही. महाराजांनी ते बरोबर ओळखले. परंतु काशीरामला काय माहित माणसाची काय ताकद जो देवाला दक्षिणा द्यायला निघाला. महाराजांनी काशीरामचे गर्वहरण करण्याचा विचार केला. काशीराम जे काही महाराजांच्या समोर ठेवायला लागला ते सर्व महाराज उचलायला लागले. आता काशीरामच्या डोळ्यावरून गर्वाच्या धुंदीची झापड उडाली व तो संकटात सापडला. महाराज दररोज दक्षिणा मागायला लागले. काशीराम जवळ शिलाई मशीन तेवढी बाकी होती. ती सुद्धा त्याने विकली, घरचे सर्व सामान विकले, कर्जबाजारी झाला. शेवटी महाराजांबरोबर मशिदी मध्ये राहायला लागला. परंतु देवाला गर्विष्ठ भक्ताचे पूर्ण गर्वहरण करायचे असते. महाराजांनी त्याच्याकडून दक्षिणा मागणे बंद केले नव्हते. शेवटी नतमस्तक होऊन काशीरामने महाराजांचे पाय पकडले व म्हणाला, 'महाराज, आता माझी सर्व संपत्ती नाश पावली, मी संपूर्ण दरिद्री झालो, आता माझ्यावर दया करा.' महाराजांनी आपल्या लीलेने त्याला दर्शन दिले व सर्व संपत्ती परत केली. व त्याला एक संदेश दिला, मुंग्यांना रोज साखर टाकावी, याचा अर्थ असा की, प्राणी प्राण्यालाच देवू शकतो देवाला नाही.

# सद्गुरु श्री साईबाबांचे सद्गुरु

श्री साईसत्‌चरितकार हेमाडपन्त उर्फ श्री. अण्णासाहेब दाभोळकर यांनी श्री साईसत्‌चरितात सद्गुरू श्री साईबाबांच्या सद्गुरु विषयी अतिशय मनोरंजक माहिती दिलेली आहे. कथा, उपकथा, आडकथा, अनुभव-कथन, दृष्टान्त, स्वप्न-निवेदन, आत्मानुभव याद्वारे त्यांनी श्रीबाबांच्या गुरुविषयी माहिती, त्यांचा उपदेश कथन केलेला आहे. या कथनात हेमाडपन्तांची उत्कृष्ट वर्णनशैली अंतर्भुत आहे. त्यामुळे वाचक तृप्त होतो. तात्त्विक, विलक्षण, तौलनिक विचार योग दर्शनामुळे, सहज स्पष्टीकरण वर्णनशैलीमुळे व उत्कृष्ट उपमा अलंकारांनी नटलेल्या शब्द सौंदर्यामुळे आध्यात्माचा अमृत वर्षाव वाचक-श्रोत्यांच्या तन मन हृदयात सहजपणे प्रवेश करीत असतो. चरितातील सुबोध वर्णन शैली मर्मस्पर्श करीत वाचकांना अन्तर्मुख बनविते. बाबांनी स्वतःच सांगितलेल्या अपरिमित आख्यायिका, गुरु उपदेश, व्यवहारपूर्ण अनुभव, पूर्व संचित कार्याचे बरे वाईट फळ, गुरूवर्म, गुरुकर्म इत्यादी विषयी मधुर भाषेत, अर्थपूर्ण कथा, अनुभव-दृष्टान्त ऐकताना, वाचताना श्रोते-वाचकांच्या अंतरीचे समाधान पूर्ण होते. श्रीबाबांनी दिलेल्या कृपा आशीर्वादामुळेच हेमाडपन्ताना सुन्दर, उत्कृष्ट, हृदयस्पर्शी गुरुचरित ग्रंथ निर्माण करता आला. सद्गुरु बाबांनी भक्त दाभोळकरांना कार्यप्रवण करून व कथा वार्तादि अनुभवांचा संग्रह ओवीबद्ध लिहवून घेऊन आपणा सर्व साईभक्तांवर अगणित उपकार केले आहेत. आपणा सर्वांना परम सुख, शान्ति, समाधानाचा भाग्य ठेवाच आपल्या हाती दिला आहे. आता या काव्य कलशातील अमृत पान केव्हा, कोठे, किती, कसे करावयाचे हे भक्ताने निष्ठापूर्वक ठरविले पाहिजे. भक्त-वाचक-श्रवणकारांनी अभ्यासू, चिकित्सक, संयमी वृत्तीने त्याचा बोध घेतला व चिन्तन-मनन केले तर आपणा सर्व भक्तांना या संसार-व्यवहारातील अनंत समस्यांवर उत्तम मार्गदर्शन मिळते. जशी 'बाबांची ऊदी' अनेक रोगांवर 'रामबाण' (साई-बाण) औषधी आहे, तद्वत् बाबांची चरित-वाणी देखील अनंत समस्यांवर साईराम-बाण आहे.

आता सांप्रत अध्यायात।
स्वयें बाबांच्या मुखें वर्णित।
ऐसा गोड कथितो वृत्तान्त।
श्रोतया अत्यंत हितकारी॥ ४॥

अ. — ३२.

चरित लेखक साईभक्त श्री. दाभोळकर खरोखरच पूर्वपुण्याई मुळेच बाबांच्या मुखे मधुर वाणीतील शब्द माधुर्याने कथा ऐकून परम भाग्यवान ठरले आहेत. या अमृत कथन सेवनाचा ठेवा त्यांनी परम सन्तोषाने वाचकांच्या हाती सोपविला आहे, मोठ्या उदार अंतःकरणाने!

या कथेचि परम नवलाई।
स्वमुखें साई वदले जी॥६॥

उपवास करून, उपाशी पोटी राहून सद्‌गुरूची सेवा करावी हा निश्चय अयोग्य आहे असे बाबांनी एका भक्त बाईला पटवून दिले. तिच्याकडून खमंग पुरण पोळ्या करवून घेतल्या, तिला खाण्यास सांगितल्या व इतरांनाही पोटभर खावयास दिल्या.

उपासाहून अनेक गुण।
कैसे तिजला दिले ठसवून।

गुरु उपदेश-कृपा मिळाल्याशिवाय कोणतेही पक्के 'ज्ञान' मिळत नाही —

गुरु कृपेवीण नाही ज्ञान।
इतर तो शीण केवळ ॥१७॥

रमणीय, लोभस, आकर्षक, रममाण करणारा संसार, धनधान्य-वस्त्र-निवारा-पुत्र-दार आदि वैभवाचा रमणीय मनमोहक संसार 'मृगजळ' आहे असे केव्हा वाटते? जेव्हा पक्क्या सद्‌गुरुशी भक्ताची भेट होते तेव्हाच! ज्यांना या मोह, माया वेष्टित संसार यातनांतून मुक्त राहावेसे वाटत असेल त्यांनी —

बांधुनिया मनाची मोट।
करूनि बुद्धीचा कडेलोट।
होऊनिया निःसंग निपट।
लक्षावें नीट गुरु चरणा॥ ३४॥ — अ. ३२

स्वतः सद्‌गुरु श्री साईबाबा सद्‌गुरुच्या शोधात निघालेले आहेत आणि स्वतः बाबाच म्हणतात — एकदा आम्ही चौघेजण पोथीपुस्तके, पुराणशास्त्रे यांचे अध्ययन करून ज्ञान संपन्न होऊन गुरु गृहातून बाहेर निघालो. बाह्य जगात आम्हा चौघांचा 'सद्‌गुरु शोध' प्रवास सुरू झाला. या चौघांपैकी पहिला भक्त-शिष्य म्हणतो, परावलंबन अयुक्त आहे. स्वतःचा उद्धार स्वतःच करा. दुसरा म्हणतो, संकल्प-विकल्प शून्य असावे. काही न आपणावीण याजगी. तिसरा म्हणतो, सर्व अनित्य आहे म्हणून नित्यानित्य विचार करा, निरंतर तिजा वदे.

चौथा म्हणतो,

मला पुस्तकी ज्ञान आवडत नाही, आदरपूर्वक योग्य गुरु चरणी काया वाचा मने पंचप्राण समर्पण करा. आता या चौघातील बाबांचे वाक्य कोणते आहे ते चाणाक्ष साईभक्ताने ओळखलेच आहे. कारण स्वतः बाबाच म्हणतात,

गुरु परमात्मा चराचर।
भरला असे सबाह्याभ्यंतर।
ऐसा व्हावया निज निर्धार।
निष्ठा अपार आवश्यक॥ ४२॥ — अ. ३२.

गुरुचे प्रेम संपादन करणारा भक्त कसा असावा? बाबा म्हणतात, तो शुद्ध भाविक पाहिजे. अशा प्रकारे सद्‌गुरुच्या शोधात आम्ही चौघेही चालत निघालो. स्वतंत्र, स्वबुद्धी, ज्ञान बळाने आम्हा चौघांना सद्‌गुरुला भेटायचे होते. पण फक्त तिघांनाच! बाबा त्याला

अपवाद होते. वनात आम्ही चौघेही खूप भटकलो. त्यावेळी मार्गात अेक अडाणी दिसणारा, वंजारी लमाण जातीचा अेक मनुष्य आम्हाला भेटला. त्याने उन्हाने तहानेलेल्या, तापलेल्या, त्रासलेल्या आम्हा चौघांनाही पाहिले व म्हणाला, या प्रखर उन्हात तुम्ही का भटकत आहात? कशाचा शोध तुम्ही लावायला निघालात? परंतु गुप्त गोष्ट कोणाला सांगू नये म्हणून आम्ही चौघेही गप्पच राहिलो. आम्हा चौघांच्या अनुत्तरीत, कोमेजलेल्या मुखांकडे पाहून त्या वंजाऱ्याचा जीव कळवळला. तो म्हणाला, बाळांनो, हे अरण्य अतिशय दाट दुर्गम आहे. भर दुपारी कोणीही मार्गदर्शक-वाटाडी न घेता तुम्ही या घोर वनात भटकणे निष्फळ आहे. तरी असे नाहक साहस करू नका. तुमच्या शोधाचा गुप्तार्थ सांगू नका. पण, येथे माझ्या झोपडीत थोडावेळ बसा. भाकर तुकडा खा. पाणी प्या आणि नंतर शोधाला बाहेर पडा. त्या वंजाऱ्याने अत्यंत काकुळतीने आम्हाला विंनती केली. पण आम्ही त्याला नकार दिला. आम्ही तसेच पुढे निघालो. आम्हा चौघांनाही बुद्धीमत्तेचा अभिमान होता. या अहंकारामुळेच त्या गरीब वंजाऱ्याच्या मार्गदर्शनाचा आम्ही धिक्कार केला. पण विस्तीर्ण, विशाल वृक्षांनी दाटलेल्या त्या रानावनात खूप खूप भटकलो आणि अखेरीस रस्ता चुकलो. पुन्हा त्या वंजाऱ्याच्या झोपडी जवळ आलो. भाग्यवान होतो म्हणूनच वंजाऱ्याच्या झोपडीजवळ आलो. वंजारी म्हणाला, आडमार्गाने गेल्यानेच तुम्हाला कार्यात यश मिळाले नाही.

कार्य सान अथवा मोठे।
मार्ग दावावया लागे बोटे।
शोध न लागे रित्या पोटे।
बुद्धीचे फाटे अफाट॥ ५६ ॥ — अ. ३२

असल्याविण ईश्वरी घाट
मार्गी न होई कोणाची गाठ
देऊ नये अन्नासी पाठ
वाढिले ताट डावलू नये॥ ५७ ॥

भाकर तुकडा देई कोण
घे खा म्हणे तयाचे वचन
मानावा शुभ शकून
कार्य निर्विघ्नकारक॥ ५८ ॥

करा आता अल्पाहार
धरा चित्ती किंचित धीर
परी त्या रूचेना हा सुविचार
पुनश्च निराहार निघाले॥ ५९ ॥

श्रीबाबा म्हणतात — त्या वंजाऱ्याने — सद्गुरूने आम्हाला वरील प्रमाणे उपदेश केला, विनवणी केली. भाकर तुकडा खावून विश्रांति घेण्यास सांगितले. मला त्या वंजाऱ्याचे

कौतुक वाटले कारण मला कडकडून भूक लागली होती. तहानेने माझ्या घशाला कोरड पडली होती. त्या वंजाऱ्याच्या अलौकिक प्रेमाने मी भारावून गेलो होतो. पण बाकीचे तिघेही जण माझे सोबती पढीक विद्वत्तेने पोटची दया माया विसरले होते. अहंकाराने ताठरले होते. त्या गरीब वंजाऱ्याची विनंती त्यांनी ठोकरली. भाकर तुकडा न खाताच पुन्हा ते प्रवासाला निघाले. तिघांच्या मनात त्या वंजाऱ्याबद्दल थोडाही आदर प्रेम नव्हते. कारण "हा (वंजारी) अविद्वान अनधिकारी नीच वर्ण ज्ञात वंजारी 'भाजी भाकर खा' धरा चित्ती किंचित धीर" हा सुविचार गुप्त शोधार्थ निघालेल्या माझ्या तीन विद्वान मित्रांना पटला नाही. भुकेल्या पोटी देव भेटत नाही. देव भेटायचा असेल तर मार्गदर्शक — वाटाड्या — सद्गुरु पाहिजे. अेकदा का गुरुशी भक्ति-भावना-प्रेमाचे नाते जुळले की भक्ताने गुरुशी संकोचाने, गुप्ततेने वागू नये. अध्यात्मात मार्गदर्शक हा पाहिजे. लहानपणी आई-वडील असतात. नंतर शाळेत गुरुजी मार्गदर्शन करतात. परमार्थ साधनेत सद्गुरु मार्गदर्शन करतात. लाभावीण प्रेम करणारा गुरु बाबांना लाभला.

ऐसे लाभावीण प्रेम
करी जो तोच सुबुद्ध परम
तयाचि आदर हाचि अप्रतिम
विद्योपक्रम वाटला ॥ ६४ ॥

भुकेपायीं म्हणा अगर प्रेमापायीं म्हणा, बाबांची दृढ श्रद्धा त्या वंजाऱ्याच्या अंतरी भिडली. वंजाऱ्याला देखील बाबांचा आज्ञाधारकपणा, वडिलकीची आदरबुद्धी आवडली आणि चमत्कार घडला —

चतकोर खावोनि प्यालो मी उदक
तों काय कौतुक वर्तले ॥ ६५ ॥ — अ. ३२

वंजारी वेषातील प्रत्यक्ष गुरुराज प्रगट झाले. श्रीबाबांनी हा वृत्तांत इतर तिघांना सांगितला. त्यांचा त्यावर विश्वासच बसला नाही. गुरुरायांनी ईश्वराचा ठाव-ठिकाणा शोधून देतो असे सांगितले.

येता काय मज समवेत
लावुनि देतो शोध त्वरीत
परी जो आदरील मद्वचनार्थ
तयाचाच स्वार्थ फळेल ॥ ६७ ॥ — अ. ३२

याठिकाणी गुरु आणि भक्त यातील दृढ नाते, प्रेमाचे संबंध बाबांनी वर्णिले आहेत. बाबांची प्रेमभक्ती पाहून गुरुरायांनी त्यांना जवळ ओढले, प्रेमाने गोंजारले आणि —

नेले एका विहीरीवर
वरती पायास बांधिलव दोर
वरती पाय खालती शीर
पाण्याबरोबर सोडिला ॥ ६९ ॥

ऐसे मज अलगत लोंबत
सोडिले विहीरीत गुरु राये ॥ ७० ॥

दहा बारा घटका गेल्या नंतर गुरुराय-सद्‌गुरु आले आणि मला झरझरा बाहेर काढले. त्यानंतर त्यांनी मला कुशल विचारले. मी म्हणालो —

होतो अत्यंत आनंद निर्भर
भोगिले जे सौख्य अपार
ते काय पामर मी वानू? ॥ ७३ ॥

या बाबांच्या — सद् भक्ताच्या उत्तराने सद्‌गुरु प्रसन्न झाले आणि त्यांनी प्रेमाने बाबांच्या अंगावरून हात फिरविला. आपल्या सद्‌गुरुच्या शाळेचे वर्णन करताना बाबा देहभान विसरुन गेले आहेत —

काय गोड गुरुची शाळा
सुटला जनक जननीचा लळा
तुटली मोह ममतेची शृंखला
लाधलो अवलीळा मुक्तता ॥ ७६ ॥

सुटला दुरापाश सगळा
भंगली प्रवृत्ति प्रतिबंध अर्गळा
वाटे या गुरुच्या गळ्यातंचि गळा
घालूनि त्या डोळा बसवावे ॥ ७७ ॥

तयाचे प्रतिबिंब नसता डोळा
तो काय शुद्ध मांसाचा गोळा
अथवा त्याहून बरा मी आंधळा
ऐसी ही शाळा मज झाली ॥ ७८ ॥

लागता या शाळेस पाय
कोण हतभागी माघारा जाय
माझे घरदार बापमाय
सर्वचि गुरुराय जाहले ॥ ७९ ॥

श्री बाबा तन-मन-धन वाचापूर्वक सद्‌गुरुमय झालेले आहेत. जळी, स्थळी, काष्ठी सर्वत्रच त्यांना सद्‌गुरुरूप दिसत आहे. जागृती-स्वप्नावस्थेत गुरुध्यान, गुरुरुप पाहणारे बाबा खरोखरच सद्‌भक्त पक्के शिष्य झाले आहेत —

गुरु अेक दृष्टीचे ध्यान
इतर सर्व गुरु समान
नाही गुरुविण दुजे आन
'अनन्य अवधान' या नाव ॥ ८१ ॥

पक्क्या गुरुचे बोल पक्क्या गुरुभक्त शिष्याला परमार्थ पथावर डोळसपणे नेत असतात.

प्रसंगी गुरु शिष्याला वर्मी बोलून नीट मार्गालाही लावत असतो —

जयाचा बोल झोंबेना वर्मी
साक्षी न पटे अंतर्यामी
तयाचे गुरुत्व काय कामी
व्यर्थ रिकामी वटवट ती ॥ ८७ ॥

अशा प्रकारे गुरुसेवा करून, बाबा रानीवनी न हिंडता, गुरुचा शोध न करता —

दाविला मज ज्ञानाचा ठेवा।
लागला न मज शोध करावा ॥ ८८ ॥

ज्ञानाचा ठेवा मिळविला. ज्या भक्तांना गुरु ज्ञान मिळवायचे आहे, त्यांनी मनाचा गर्विष्ठपणा, ज्ञानाचा तोरा, दुष्ट अभिमान यांचा त्याग करणे आवश्यक आहे.

टांगी जैं उफराटे गुरुराय
तैं मज आनंद कैसा होय
समर्थ गुरुमाय जाणाया ॥ ९० ॥
संतां (गुरु) घरची उलटीच खूण
हें तो अनुभवजन्य ज्ञान
एथें निष्ठाच अेक प्रमाण
एक साधन गुरुकृपा ॥ ९१ ॥

श्री. दाभोळकर म्हणतात, श्रीबाबा हे तर प्रत्यक्ष अवतारी ईशरुप असूनही त्यांनी वंजारीस गुरुपदी मानले, त्याने दिलेले अन्न ब्रह्म सेवन केले, त्याची सेवा चाकरी केली व स्वतःला धन्य करून घेतले. प्रत्यक्ष दत्तमाऊली, परब्रह्म श्रीकृष्ण यांनीही अनेक गुरु केल्याचे पुरावे, दाखले आपल्या प्राचीन ग्रंथांत आढळतात. विश्वातील प्रत्येक अणुरेणूत आपली गुरुमाय आहे असे ज्याक्षणी भक्ताला अनुभवास येते त्याक्षणी त्याला मनोमन साक्षात्कार घडतो. तो क्षण त्याच्या जीवनातील परमोच्च परमार्थ मिळविणारा भाग्यवान श्रीक्षण होय!

बाबांच्या दरबारात अनेक जात, पंथ व भिन्न व्यवसाय करणारे लोक असत. गारोडी, गोंधळी, जंगम, महार, गायक, नर्तक, कोल्हाटिणी इत्यादिही खेळ करण्यास येत असत. आणि याच दरबारात —

हा वणजारी प्रेमळ।
आत्मा की वेळ साधुनि ॥ १२० ॥

आणि प्रेमळ वणजारी गुरुने बाबांना शिकविले —

देव न लाभे रित्या पोटी
आधी आत्म्याची करा संतुष्टी।
अतिभोजन तेही न हितकर
मित भोजन खरे सूखकर

उपास अतिरेक भयंकर
असुख निरंतर भोगवी ॥ १२९ ॥

दादा केळकरांच्या घरी आलेल्या गोखले बाईंच्या उपवासाचा संकल्प बाबांनी एका क्षणात मोडून काढला व तिला पुरणाच्या पोळ्या करून सर्वांना पोटभर खायला दे असा उपदेश केला.

याच ३२ व्या अध्यायात आता बाबा गुरु भेटीची दुसरी गोष्ट सांगत आहेत. एकदा मी लहान असताना पोटाभोवती फडका बांधून पोटापुरता धंदा मिळावा म्हणून निघालो.

बीड गावात आलो, तेथे मला जरीकाम मिळाले. माझा फकीर, माझे सरकार माझा सद्गुरु मोठा भला कल्याणकारी साधु आहे, त्याच्याकडे अमाप संपत्ती आहे.

माझे सरकार (गुरु) न्या न्या वदे
मजलाच जो तो म्हणे दे दे
कोणी न माझ्या बोलासी लक्ष दे
एकही सुधे ऐकेना
मी म्हणे तो पैका खणावा
गाड्यावरी लुटून न्यावा
खरा माईचा पूत असावा
तेणेच भरावा भांडार ॥ १६३ ॥

११, १८, १९ या अध्यायांत देखील बाबांनी गुरु महिमा वर्णन केलेला आहे —

संगमनेर जिल्ह्यातील खाशाबा देशमुख यांची आई राधाबाई म्हातारी साईबाबांचा गुरुमंत्र मिळण्यासाठी शिर्डी येथे आली. कानमंत्र मिळाल्याशिवाय अन्न-पाणी सेवन करावयाचे नाही असा तिने निर्धार केला. तीन दिवस तिने पूर्ण उपोषण केले. साईभक्त माधवरावांना विचार पडला. म्हातारी मरणाला भिईना; पण त्यांना वाटले की बाबांवरच आळ येईल की, बाबांनी तिला उपदेश केला नाही, मारून टाकले. बाबा म्हणतात, देह नश्वर आहे, पण आत्मा अक्षर, अक्षय आहे. आणि म्हणूनच बाबा सर्व भक्तांना भक्ति आणि नामस्मरण याचाच उपदेश करीत. माधवरावांची मध्यस्ती फळाली आणि बाबांनी त्या म्हातारीला म्हटले, आई तू अशी मरणाला जवळ का करतेस?

"आई, तू का गे घेतले धरणे
कां तुज मरणें आठवलें" ॥ ४० ॥

बाबांचे अंतरंग जसे प्रेमळ, तसे बोलणेही मंजूळ!

असो तिजला हाक मारिली
आपुले सन्मुख बैसविली
निजगुरुत्वाची गुप्त किल्ली
प्रेमें दिधली निजहातें ॥ ४३ ॥ — अ. १९

सदगुरु बाबांनी तिला आपल्या सदगुरुची कथा सांगितली. माझा गुरु मोठा कृपा सागरु होता. प्रारंभी त्याने माझे मुंडन केले आणि दोन पैसे निष्ठा, सबूरी माझ्याकडे

मागितले. मी तात्काळ त्यांना दोन पैसे दिले —

माझ्याही मनी प्रबळ आस
कधी न सोडावी तया (गुरु) ची कांस
तया मुखेच घ्यावे मंत्रास
दीर्घ सायास करूनि ॥ ४८ ॥ — अ. १९

आरंभी तयाने मज मुंडिले
पैसे दोनचि याचिले
ते मी तात्काळ देऊनि टाकले
बहु मी प्रार्थिले मंत्राक्षर ॥ ४९ ॥ — अ. १९

पैसे मागणारा सद्‌गुरु अशी शंका माझ्या मनात बिलकूल आली नाही. मी ते दोन पैसे - श्रद्धा आणि सबुरी 'म्या ते तेव्हाच टाकिले देऊन। तेणे मज प्रसन्न गुरुमाय ॥ ५२ ॥ सबुरी म्हणजेच धैर्य, पुरुषाचे पौरुष तीच सबुरी! सबुरी म्हणजेच सद्‌गुणांची खाण आहे. निष्ठा म्हणजेच श्रद्धा, प्रेम! सबुरी आणि श्रद्धा या दोन्ही सख्ख्या बहिणी आहेत. सद्‌गुरु कितीही प्रबळ असला तरी भक्ताकडून तो श्रद्धा, सबुरी याच दोन तत्त्वांची अपेक्षा करीत असतो. बारा वर्षे मी गुरुची सेवा प्रेमभावे केली.

प्रेमें गुरुमुखावलोकन।
करावे म्यां रात्रंदिन
नाही मज भूक ना तहान
गुरुविण मन अस्वस्थ ॥ ६४ ॥

हीच माझ्या गुरुची अपेक्षा
काही न इच्छी तो यापेक्षा
केली न माझी केव्हाही उपेक्षा
संकटी रक्षा सदैव ॥ ६६ ॥अ. — १९

रात्रंदिवस गुरुध्यान हेच माझे अन्नपाणी होते. कासवी प्रमाणे मला गुरुने सांभाळले.

कासवी जैसी आपुले पोरा
घालिते निज दृष्टीचा चारा
तैसीच माझे गुरुची तऱ्हा
दृष्टीने लेकरा सांभाळी ॥ ६८ ॥ — अ. १९

आई, तुला मी खरेच सांगतो, गुरुने माझे कान केव्हाच फुंकले नाही. मला कान-मंत्र दिला नाही. मग तुला मी कसा कानमंत्र देवू? कासवी नदीच्या पैलतिरी असते पण केवळ प्रेम दृष्टीने ती आपल्या पोरांबाळांचा सांभाळ करते. सद्‌गुरु देखील प्रेमदृष्टीने आपल्या भक्तांकडे पहातात, मंत्रांच्या खटपटीत नसतात.

तरी तू जा अन्न खाई
नको हा घालू जीव अपायी

एक मजकडे लक्ष देई
परमार्थ येईल हातास ॥ ७२ ॥ — अ. १९

तू मजकडे अनन्य पाही
पाहीन तुजकडे तैसाच मीही
माझ्या तुजकडे तैसाच मीही
माझ्या गुरुने अन्य काही
शिकविले नाहीच मजलागी ॥ ७३ ॥

सद्‌गुरु साईबाबा त्यांच्या सद्‌गुरु विषयी अंत्यत निष्ठा बाळगून होते. ही निष्ठा प्रखर प्रेमभरीत होती —

नलगे साधन संपन्नता
नलगे षट्‌शास्त्र चातुर्यता
अेक विश्वास असावा पुरता
कर्ता हर्ता गुरु ऐसा ॥ ७४ ॥

सद्‌गुरुची महती गाणारे, आचरणात आणणारे श्रीसद्‌गुरु साईबाबा खरोखरच महान भक्त-शिष्य होत. सद्‌गुरु रुपाला त्यांनी क्षणभरही डोळ्यासमोरुन हलविले नाही. सद्‌गुरु विषयी अपरंपार प्रेमभाव, भक्ती-भाव, विश्वास तर त्यांच्या ह्रदयी अपार होता; पण 'गुरु' म्हणजेच साक्षात्‌ 'परब्रम्ह हरि' याची त्यांना पूर्ण खात्री पटलेली होती—

म्हणुनि गुरूची थोर महती
गुरु हरिहर ब्रम्हमूर्ति
जो कोण जाणे तयाची गति
तो एक त्रिजगती धन्य गा ॥ ७५ ॥

ज्याला गुरुची महती कळली, त्याची या तिन्ही जगात कीर्ति पसरली, असेच बाबा आपणा सर्व साई भक्तांना कळकळीने सांगत आहेत. उपदेश श्रवण करणे सोपे आहे पण आचरणात आणण्याचा जो धैयनि प्रयत्न करील; तो साईभक्त असो, दत्तभक्त असो, कोणत्याही देव-देवता ठायी सद्‌गुरु मानून त्यापायी दृढ निष्ठा ज्याची आहे तो खरोखरच या त्रिलोकात धन्य आहे याची ग्वाही आपणा सर्वांचे सद्‌गुरु बाबा खात्रीपूर्वक देत आहेत. म्हातारीने बाबांचा उपदेश कळकळीने ऐकला व साई महाराजांच्या पायी डोके ठेवले आणि आमरण उपोषणापासून परावृत्त झाली.

सद्‌गुरुची निवड करताना बाबांनी सद्‌गुरु कसे असावेत हेही थोडक्यात सांगितले आहे. अ — १९, ओ — ६२ यात भक्ताने देखील कसे असले पाहिजे याचे मर्म आपोआप कळते —

भक्ति प्रेमाचा केवळ पुतळा
जयास शिष्याचा खरा जिव्हाळा
माझ्या गुरुसम गुरु विरळा

सुख सोहळा न वर्णवे ॥ ६२ ॥ — अ. १९

गुरु हा निराकार असावा की आकारी, सगुण की निर्गुण असावा हे तत्व भक्ताच्या मनावर ठसलेले असावे —

पूजक जेथवर साकारू
देहधारीच आवश्यक गुरु
निराकारास निराकारू
हा निर्धार शास्त्राचा ॥ १० ॥ — अ. ११

भक्त ध्रुव बाळ ईश्वराला पहायला अरण्यात गेला. तेजस्वी तपोबलाने त्याने ईश्वरालाच गुरु मानले. एकलव्याने तर मातीच्या पुतळ्याला गुरु मानले व अखिल विश्वात तो धन्य झाला. आपण जरी बाबांचा प्रत्यक्ष देहधारी सहवास अनुभवला नाही तरी त्यांच्या विषयीचे अनुभव, कथा, दृष्टान्त व स्वप्न अनुभव सांप्रत जीवन्त, देहधारी भक्तांकडून ऐकलेले आहेत. ज्यांनी बाबांना गुरु मानले अशा भक्तांना आपण वंदन, स्पर्श केला आहे. याचा सोपा अर्थ असा की, ज्यांनी बाबांना पाहिले नाही; त्यांनी कथा, कीर्तने वाचून, ऐकून मनात दृढ भक्तीभावाने बाबांना सद्‌गुरु स्थानी आदराने पाहावे. पारमार्थिक, आध्यात्मिक अभ्यासात गुरुपायी निष्ठा, प्रेम अढळ पाहिजे म्हणजे मार्ग आपोआप सापडतात.

श्री. तात्यासाहेब नूलकरांचे स्नेही डॉक्टर पंडीत बाबांच्या दर्शनाला गेले. तेथे बाबांनी त्यांना दादा केळकरांकडे जायला सांगितले. नंतर दादा केळकर यांनी बाबांची पूजा केली. त्यावेळी या डॉ. पंडीत यांनी श्रीसाईंच्या मस्तकावर त्यांना 'सद्‌गुरु' मानून सुरेख त्रिपुंडू रेखिला. दादा मनात घाबरले, बाबां रागावतील म्हणून! पण बाबा प्रसन्न दिसले कारण पंडीत यांची दृढ गुरुनिष्ठा धोपेश्वरीचे रघुनाथ उर्फ काका पुराणिक यांच्या पायी होती. बाबांच्या देही त्यांना काका पुराणिक यांचे, त्यांच्या सद्‌गुरुचे दर्शन झाले म्हणून बाबा त्यांच्या गुरुभक्तीवर प्रसन्न दिसले —

दादा तयाचा गुरु बामण
मी जातीचा मुसलमान
तरी मी तोचि ऐसें मानून
केलें गुरु पूजन तयाने ॥ ६२ ॥ — अ. ११

आपण मोठे पवित्र ब्राम्हण
हा जातीचा अपवित्र यवन
कैसे करूं त्याचे पूजन
ऐसे न तन्मन शंकले ॥ ६३ ॥

ऐसे मज त्याने फसविले
तेथे माझे उपाय हरले
नको म्हणणे जागीच राहिले
आधीन केले मज तेणे ॥ ६४ ॥ — अ.११

दादा केळकरांची भक्ती दृढ झाली ती सद्‌गुरु साईबाबांच्या पायी, ती या घटनेमुळेच!

दादा केळकरांची श्री सद्गुरु साई चरणी भक्ती, प्रीति दृढ व्हावी म्हणून देखील बाबांनी ही घटना मुद्दाम घडवून आणली असावी. श्रीसाईबाबा साक्षात् परमेश्वरी अवतार! त्यांना कोणतीच गोष्ट, घटना घडविणे अशक्य नाही.

श्री साईबाबांचे चरित्र व चरित्र्य यावर मानवी बुद्धीने विचार करणे अशक्य आहे. कारण त्यांनी 'सद्गुरु' म्हणून भक्तांना जे अनुभव, दृष्टान्त, प्रात्यक्षिके, प्रमाणे, कथा इत्यादी माध्यमाद्वारे जी शिकवण दिली आहे ती दिव्य भव्य आणि मानवी मनाला थक्क करणारी 'गुरु किल्ली' आहे. बाबा स्वतःच म्हणत —

माझ्या सद्गुरुने कोणालाही मंत्र किंवा उपदेश दिला नाही. कासवीण ज्याप्रमाणे पिल्लांचे पोषण केवळ प्रेम दृष्टीने करते; त्याप्रमाणे माझ्या 'सद्गुरुने' माझे पोषण केले. त्यांच्या केवळ प्रेमळ दृष्टीने माझे तन, मन तृप्त होत असे. भक्ताच्या योग्यते प्रमाणे सद्गुरु भक्ताला ब्रम्हानंद मिळवून देत असतात. श्री साईभक्त बाबांचा लाडका 'गणू' उर्फ श्री. ह. भ. प. दासगणू महाराज उर्फ श्री. गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे यांना एकदा पंढरपूरास जाण्याची खूप इच्छा झाली. त्यावेळी पंढरपूरास जाण्याची आवश्यकता नाही; प्रत्यक्ष 'सद्गुरु' हाच श्रीपांडुरंग आहे; असे दर्शन बाबांनी त्यांना दिले व सद्गुरु प्रेमनिष्ठा दृढ केली. साईभक्त जोग यांनाही श्री साईबाबांनी शिर्डीतच अक्कलकोट निवासी श्रीसमर्थ सद्गुरु श्री अक्कलकोट स्वामींचे दर्शन दिले. तेथे हजर असलेल्या सर्वांनाच श्रीसमर्थांचे दर्शनाचा लाभ झाला. या घटनांतून बाबांना असे सुचवायचे आहे की, भक्त, साधक, उपासक, मुमुक्षु कोणीही असो त्याने आपल्या गुरुवर (हयात असो अगर नसो) सत्य प्रेम ठेवून स्वतंत्र बुद्धीने विचार, अभ्यास, निदिध्यास, स्मरण केल्यास त्या साधक-भक्ताला त्याच्या योग्यतेप्रमाणे त्यांच्या भक्ती-वर्मानुसार त्यांच्यावर 'सद्गुरुची कृपा' होत असते.

साईबाबा स्वतःच 'सद्गुरु' योग्यतेचे होते तरी सुद्धा ते कोणताच अधिकार किंवा मोठेपणा मिरवित नसत. बोलताना ते स्वतःला परमेश्वराचा 'सद्गुरुचा' बंदा सेवक म्हणवून घेत. अल्ला-मालिक-सरकार-सद्गुरुच सर्वांचे कल्याण करीत आहेत असे ते म्हणत. आपल्या गुरु- सरकार-मालीक- अल्लाचा आशीर्वाद आपल्याला पूर्ण आहे व त्याचेच कृपेने भक्तांची सर्व संकटे दूर होतात, त्यांचे कल्याण होते असे साईबाबा म्हणत. भक्तांना आशीर्वाद देताना ते नेहमी म्हणत- 'अल्ला (सद्गुरु) भला करेगा!' मीच परमेश्वर असे ते कधीच म्हणत नसत. मी परमेश्वराचा - सद्गुरुचा सेवक आहे व त्याचे स्मरण करतो असे ते म्हणत. साईभक्त - बाबांचे लाडके लेकरु श्री. हरि सिताराम दीक्षित (सॉलिसिटर) यांचेकडे साईबाबा म्हणत — मी पूर्वी लोकांना औषध देत असे. पुढे औषध देणे सोडले आणि माझ्या गुरुला 'हरी हरी' म्हणून हाका मारू लागलो, त्याचे स्मरण करू लागलो आणि खरोखरच 'हरी हरी' म्हणता मला 'हरी-सद्गुरु - परमेश्वर' यांची भेट झाली.

श्री साईबाबांना सर्व धर्मीय सन्त महात्म्यांविषयी परम आदर होता. शिर्डीतील गांवकुसा जवळील निंबाच्या झाडाखाली साईबाबा कधी कधी बसत असत. तेथेच एका पीराची

तुरबत आहे असे बाबांनी एकदा म्हटले व तेथे भक्त-गणांनी खणून पाहिले, तो तेथे खरोखरच तुरबत निघाली. बाबा म्हणाले की, ही तुरबत माझ्या 'सद्‌गुरु' ची (वडिलांची) आहे. येथे दर गुरुवारी व शुक्रवारी ऊद जाळीत जा, म्हणजे त्यात सर्व भक्तांचे कल्याण आहे. आता येथे सुंदर समाधी मंदिर बांधलेले आहे. या निंबवृक्षाची पाने गोड लागतात.

संगमनेर तालुक्यातील निमोण गावचे ऑनररी मॅजिस्ट्रेट श्री. नानासाहेब निमोणकर बाबांचे सच्चे अस्सल भक्त होते. त्यांना सर्वठायी 'श्रीसद्‌गुरु' साईबाबाच दिसत. ते स्वतःच्या पत्नीलाही (मरण समयी तीन दिवस अगोदर) म्हणत, तू, बाबाच (सद्‌गुरु) आहेस. तुझ्यात बाबाच (सद्‌गुरु) आहेत. उच्च सद्‌गुरु-भक्तीचे हे उत्तम आदर्श उदाहरण आहे. श्रीसाईबाबा हे उच्च प्रतीचे, श्रेष्ठ भक्त साधक होते. यामुळेच ते उत्तम, श्रेष्ठ, अस्सल प्रतीचे भक्त-साधक निर्माण करू शकले. श्रीसद्‌गुरु साईबाबांच्या ठायी नितांत श्रद्धा असलेले भक्त अनंत होते व आहेत यांत प्रमुख भक्त मंडळी पुढील प्रमाणे - (१) नागपूरचे श्रीमंत गोपाळराव उर्फ बापूसाहेब बुटी (२) सुन्दराबाई क्षीरसागर उर्फ राधाकृष्णाआई (३) हरि विनायक साठे (डेप्युटी कलेक्टर) (४) गणेश दामोदर केळकर (५) निबंगावचे सिताराम डेंगळे (६) गणेश दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे उर्फ दासगणू महाराज (७) कोपरगावचे मुलकी सर्कल इन्स्पेक्टर गोपाळराव गुंड (८) शिर्डी खंडोबाचे भक्त म्हाळसापती (९) चांदभाई (धुपखेडे गावचा पाटील) (१०) काशिराम शिंपी (११) आप्पा जागले (१२) माधवराव बळवंत देशपांडे (१३) साधु जानकीदास (१४) साधु गंगागीर बाबा (१५) अक्कलकोट येथील आनंदनाथ महाराज (१६) दगडू भाऊ गायके (१७) नंदराम शिवराम मारवाडी (१८) भागचंद मारवाडी (१९) राहता गावचे चंद्रभान शेट मारवाडी (२०) राहताचे खुशाल चंद शेठ (२१) अहमदनगर जिल्ह्याचे कलेक्टरचे चिटणीस चिदंबर केशव ऊर्फ अण्णासाहेब गाडगीळ (२२) शिर्डी गावचे तात्या गणपती पाटील (२३) दामोदर सावळाराम उर्फ दामूशेट कासार (२४) माधवराव देशपांडे यांचे सासरे गोविंदराव सापकर (२५) नारायण गोविंद उर्फ नानासाहेब चांदोरकर (कल्याण येथे राहणारे, नगर कलेक्टरचे चिटणीस) (२६) नानासाहेब चांदोरकरांचा धाकटा मुलगा बापू चांदोरकर (२७) भागोजी शिन्दे (२८) सॉलिसिटर हरी सिताराम दीक्षित (पार्ले येथे राहणारे) (२९) श्री साईसत्चरितकार कै. भक्तवर्य श्री. गोविंद रघुनाथ ऊर्फ अण्णासाहेब दाभोळकर ऊर्फ बाबांचे हेमाडपन्त (वांद्रे येथे राहणारे) (३०) श्री बाबांचे बाळ उर्फ कै. बाळकृष्ण विश्वनाथ देव इत्यादि श्रीबाबांच्या चरणस्पर्शाने पुण्यपावन झालेले अनंत भक्त आजच्या आधुनिक भक्त मंडळींचे सद्‌गुरुच आहेत. श्रीसाईबाबा स्वतःच्या सद्‌गुरु स्थानाविषयी अत्यंत विनयशील व जागृत होते ज्यावेळी शिर्डीतील भक्त मंडळींनी म्हाळसापतीच्या अंगात आलेल्या खंडोबाला बाल वयातील बाबांविषयी माहिती विचारली असता, त्यांनी निंबवृक्षाच्या तळी खणायला सांगितले. तेव्हा त्यांना भुयारात चार समया जळताना दिसल्या —

जात्याची तळी सारिता दूर
दृष्टीस पडले एक भुयार
समया चार जळती जैं ॥ १२ ॥ — अ. ४

चुने गच्ची ते तळघर, गोमुखी पाट माळ सुन्दर
देव म्हणे बारा वर्षे हा पोर, तप आचरला ये स्थळी ॥ १२९ ॥ — अ. ४

नंतर शिर्डीकर भक्तांनी या बारा मुलखाच्या गमती करणाऱ्या पोराला, श्री साईबाबांना विचारले असता ते म्हणाले —

म्हणे माझ्या हे गुरुचे स्थान, अति पवित्र हे माझे वतन
आहे तैसेचि करा हें जतन, माना मद्वचन एवढे ॥ १३१ ॥ — अ. ४

श्री साईबाबांना आपल्या गुरुबद्दल अति प्रेमभाव, आदर होता आणि यामुळेच बाबांची भक्त मंडळी 'बाबांच्या गुरुचे हे समाधिस्थान' म्हणून वंदन करीत. म्हणूनच साईसत्चरितकार आणि स्वतः सद्गुरु साईबाबाही ग्वाही देतात —

"गुरुवार आणि शुक्रवारी
सूर्यास्ती सारवूनिया वरी
ऊद जाळील जो क्षणभरी
देईल श्रीहरि (सद्गुरु) सुख तया" ॥ १४३ ॥ — अ. ४

वाचकांची-श्रोत्यांची खात्री पटविण्यासाठी पुढे साईभक्त दाभोळकर म्हणतात —

परी ही साईमुखींची (सद्गुरुंची)
श्रवण द्वारे परिसिली ॥ १४४ ॥ — अ. ४
नाही माझिया पदरचे विधान
शंका न धरा अणुप्रमाण
प्रत्यक्ष ज्यानी केले हें श्रवण
ते आज विद्यमान असती की ॥ १४५ ॥ — अ. ४

श्रीसद्गुरु साईबाबांच्या भक्तमंडळींत अनेक पशु-प्राण्यांचाही समावेश असे. गुरुच्या प्रेमदर्शनाने भक्त तात्काळ भयमुक्त होतो आणि ब्रम्ह आनंदात मग्न होत असतो.

शेळी, पाल, वाघ, बेडूक, सर्प इत्यादींना श्री साईबाबांचे दर्शन घडले व त्यांना गुरु आनंद भेटीतून मुक्ती मिळाली —

पूर्व जन्मी यांचे सुदैव
तेव्हा हे जीव होते मानव
मजपाशीच बसावया ठाव
कर्म प्रभाव यानाही ॥ १२१ ॥ — अ. ४६
या ज्या शेळ्या दिसती तुम्हा
होते हे बंधु पूर्वजन्मा
भांडता परस्पर झाली सीमा
ते या परिणामा पावले ॥ १२२ ॥ — अ. ४६

सद्गुरु साईनाथ हेमाडपन्तांच्या मुखातून वदवितात—

परस्पर वैराचा परिणाम
उत्तमाचा जन्मे अधम
ऋण-वैर -हत्यांचा धर्म
फिटे तो जन्म परंपरा ॥ ३२ ॥ — अ. ४७

४८ वा अध्याय आपणा सर्वांना सच्चा सद्गुरुची आणि सच्चा भक्ताची लक्षणे सांगतो —

असोनि संपूर्ण शब्दज्ञानी
पूर्णानुभवी अपरोक्षदानी
त्याचाचि अधिकार शिष्य प्रबोधनी
म्हणावे त्यालागोनि सद्गुरु ॥ ८ ॥ — अ. ४८

उलट शिष्यार्थ निजदेह लागावा
इच्छी तो जाणा सद्गुरु ॥ १० ॥ — अ. ४८
अहंभावाविरहित तोचि सद्गुरु हितकारी ॥ ११ ॥ — अ. ४८

बाबांनी अत्युत्तम, उच्च शिष्य-भक्ताची भूमिका-कार्य कसे घडविले ते आपण वरील विवेचनात पाहिले. आता श्री. बडे बाबांची कथा पाहू. अध्याय २३, ओवी १७० ते१८१ यांत श्री साईभक्त, बाबांचे लेकरू दीक्षित लंगडे काकांनी उत्तम शिष्य कसा असावा हे सांगितले आहे —

आम्ही नेणू दुजा धर्म
आम्हा नाहीं लाज शरम
गुरु वचन पालन हेच वर्म
हाचि आगम आम्हाते ॥ १७१ ॥

गुर्वाज्ञा परिपालन
हेचि शिष्याचे शिष्यपण
हिंसा अहिंसा आम्ही नेणू
आम्हासी तारक सद्गुरु चरणू.... इ. इ.

बडेबाबांना बाबा त्यांचा गुरुच मानत आणि त्यांचे आतिथ्य-पाहुणचार करीत. त्यांना बरोबर घेतल्याशिवाय बाबा केव्हाही भोजन घेत नसत —

बडेबाबांची काय महती
बसाया स्थान उजवे हाती
बडेबाबानी ओढिल्यावरती
चिलीम सेविती मग बाबा ॥ ११२ ॥ — अ. २३

वास्तविक पाहता, बाबा स्वतःच परमोच्च आध्यात्मिक अधिकारी ईशरूप असताना देखील बडेबाबांचा आदर ते राखीत असत. भक्तांना 'सद्गुरु' सेवा कशी करावी हे स्वतःच्याच कृतीतून ते शिकवित असत. बडेबाबांना गुरुस्थानी मानून त्यांना आपल्या जवळ बसवित, दक्षिणा देत, सन्मान करीत. बडेबाबा अहंकारी होते तरी सुद्धा बाबांनी त्यांचा अनादर केला नाही.

रोहिला पठाणाची सुद्धा अशीच कथा आहे. हा रोहिला पठाण स्वतःला बाबांचा सद्गुरु म्हणवून घेत असे. बाबांना 'पोरा, पोरा' म्हणवून त्यांचेकडून भरपूर सेवा करून घेत असे. कुराणाची कलमे मोठमोठ्याने म्हणत असे. बाबांनी सद्गुरु स्थानी मानलेल्या या रोहिला पठाणाने समस्त शिर्डीकरांना हैराण केले होते. एकेदिवशी हा रेड्यासारखा गलेलठ्ठ रोहिला पठाण बाबांकडे आला आणि बाबांच्या संगतीत मशिदीत ठाण मांडून बसला. मध्यरात्री देखील हा रोहिला पठाण कुराणाची कलमे कर्कश आवाजाने मोटमोठ्याने म्हणत असे. शिर्डीतील ग्रामस्थांची झोप उडाली. त्यांना या रोहिल्याचा संताप आला. पण बाबांचा त्याला बळकट आधार असल्यामुळे ग्रामस्थांना त्याचे विषयी तक्रार करता येईना. बाबाची त्याला साथ असल्यामुळे तो वढेल आणि ताठर झाला. लोकांशी कठोरपणे बोलू लागला, बेफाम झाला. गावकऱ्यांना त्याचा त्रास होऊ लागला पण श्री सुद्गुरु साई माऊली त्याचे पाठीशी असल्यामुळे गावकऱ्यांना तक्रार करता येईना. पण बाबाच लोकांना म्हणायचे —

नका सतावू रोहिल्याप्रती<br>
तो मज अति प्रिय वाटे ॥ ११९ ॥ — अ. ३

बाबा स्वयंभू साक्षात्कारी सन्त विभूति असता देखील ते लोकांना म्हणत —

जावे न कोणी त्याच्या वाटे<br>
ओरडू द्या मुक्त कंठे<br>
तयावीण मज रात्र न कंठे<br>
सौख्य मोठे त्याचेनि ॥ १२३ ॥ — अ. ३

बाबांच्या या बोलण्यामुळे तो रोहीला अधिकच उद्धट झाला.
जणुकाय बाबांनी त्याला आपला 'सद्गुरु' मानला व म्हणाले —

रोहिल्याची आवडे मज संगती<br>
नामी प्रीती तयाते ॥ १४० ॥<br>
लक्ष लावी जो मजकडे<br>
नाही तयासी कैंचेंही सांकडे ॥ १४७ ॥

अध्याय ५ वा, ओ. ११६ यात बाबांनी त्यांचे सद्गुरु 'जव्हारअल्ली' याच्यावर अत्यंत प्रीति बहाल केलेली आहे. अहमदनगरचा हा जव्हारअल्ली फकीर वीरभद्र देवळाजवळ शिष्यासह राहू लागला. फकीर जव्हारअल्ली मोठा सबळ दैवाचा होता. त्याचे भजनी अनेक लोक लागले. आणि साक्षात् श्री भगवन्त साईबाबांनी त्याचे शिष्यत्व पत्करले. वीरभद्रदेव बाटविला असा आरोप झाल्याने हा फकीर तेथून शिर्डीस आला व बाबांच्या मशिदीत राहिला. बाबांना म्हणाला,

हो म्हणे तू माझा चेला<br>
स्वभाव बाबांचा बहु रंगेला<br>
हूं म्हणता फकीर संतोषला

घेऊनि निघाला बाबांसी ॥ ११४ ॥ — अ. ५

बाबां सारिखां शिष्य सधरू
जव्हार अल्ली जाहले गुरु
मग दोघांचा जाहला विचारू
रहिवास करू रहात्यात ॥ १२५ ॥ — अ. ५

श्रीसद्‌गुरु साईनाथ महाराज परमोच्च, परमार्थाचे महामेरू असताना देखील त्यांनी जव्हारअल्लीचे शिष्यत्व पत्करले आणि या फकीराच्या नादाने रहात्यास राहू लागले —

गुरु नेणे शिष्याची कळा
शिष्य (बाबा) जाणे गुरुच्या अवकळा
परी न केव्हाही अनादर केला
स्वधर्म रखिला शिष्याचा ॥ १२६ ॥ — अ. ५

शिरडीस्थ बाबांच्या प्रेमी भक्तांना या फकीराच्या नादी बाबा लागलेले पाहून उद्विग्नता आली. शिरडीचे सर्व भक्त मंडळ बाबांना नेण्यासाठी राहत्यास आले तेव्हा बाबा अति आदराने म्हणाले,

फकीर आहे महा क्रोधी
लागू नका तयाचे नादी
धरा की सडक शिरडीची ॥ १३८ ॥ — अ. ५

इतक्यात फकीर — बाबांचा सद्‌गुरु — तेथे आला. शिर्डी ग्रामस्थांना पाहून तो कचरला, म्हणाला —

म्हणे मलाही घेऊनि चला
सवे मुलाला (बाबांना) नेऊं की ॥ १४१ ॥ — अ. ५

सन्त देविदासाने या बाबांच्या 'सद्‌गुरु' फकीराचा वादविवादात पराजय केला व त्याला शिर्डीतून हाकलून लावले. नंतर हा फकीर जव्हारअली वैजापूरास जाऊन राहिला. कांही वर्षांनी तो शिर्डीस आला व बाबांना शरण गेला. बाबांची त्याने क्षमा मागितली.

आपण गुरु साई चेला
हा सर्व त्याचा (जव्हारअलीचा) भ्रम निरसला
बाबानीही पूर्ववत सत्कारिला
शुद्ध जाहला पश्चात्तापे ॥ १५२ ॥ — अ. ५

बाबांनी येथे या घटनेने गुरुवर कशी प्रीती करावी हेच सर्व भक्तजनांना स्वतःच्या शुद्ध आचरणाने दाखविले आहे —

जेणे देहाचा जाळिला अभिमान
तेणेचि हा देह सार्थ की लाविला
तो मग कोणाचाही होईल चेला
साधावयाला परमार्थ ॥ १५८ ॥

हें गुरुशिष्याचे आचरित
साईनाथांचे परम भक्त
म्हाळसापतीनी करविले श्रुत
तैसेचि साद्यंत कथियेले ॥ १६२ ॥ — अ. ५

श्रीसद्गुरु साईबाबांच्या चरित्राचे मनःपूर्वक चिन्तन, मनन विचारपूर्वक केले तर असे दृष्टीस पडते की, बाबांनी 'गुरु' मानताना त्याची जात-पात, पंथ-भेद, धर्म, शिक्षण, वय, अनुभव पाहिला नाही. अत्यंत प्रेमभावनेने ज्याला गुरु मानले त्यावर पूर्ण श्रद्धेने सेवाधर्माचे आचरण केले व भक्तांना आदर्श भक्त कसे असावेत, आदर्श भक्तांनी कसे आचरण करावे, सेवाधर्म कसा पालन करावा याचेच उत्कृष्ट उदाहरण भक्त मंडळींपुढे ठेवले. आपण साईभक्तांनी श्रीसाईंना 'सद्गुरु स्थानी' मानून त्यांचेच अनुकरण करण्याचा अल्पसा जरी प्रयत्न केला तरी आपण श्रीसाई गुरुकृपेने त्यात यशस्वी होवू असे आपणा सर्व साईभक्तांना वाटावयास हरकत नाही.

**श्री. प्रभाकर कोळमकर**
बोरीवली.

# आणि मुग्धा बोलू लागली

**— सौ. मृणालिनी प्रभाकर भुर्के**
११७/३८२९, नेहरूनगर,
कुर्ला (पूर्व), मुंबई-४०० ०२४.

"ॐ श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज की जय!" हा जयघोष आम्हा सर्वांचाच नव्हे तर छोट्या मुग्धाचा सुद्धा जणू महामंत्र आहे. माझी मोठी मुलगी कु. वैशाली जी आज प.पू. बाबांच्या कृपाप्रसादाने MBBS च्या दुसऱ्या वर्षाला शिकत आहे. १९८२ सालच्या मे महिन्यात श्री साईबाबांनी कृपा केली व आम्हाला शिर्डीला बोलावून घेतले. आजपर्यंत माझ्याप्रमाणेच इतर साईभक्तांना पण हा अनुभव असेल की श्री साईंची कृपा झाल्याशिवाय आपण शिर्डीला जाऊच शकत नाही.

आमची छोटी मुग्धा दोन वर्षे उलटून गेली तरी बोलत नव्हती. खुणेने सांगायची. तोंडाने विचित्र आवाज करायची. मोठी मुले वर्ष होण्यापूर्वीच बोलायला लागली होती. तिच्या त्या खुणा पाहून आम्ही फार व्यथित होत असू. आमचा शिर्डीला पाय लागायचा तो पहिलाच योग असल्याने, अभिषेक, दर्शन व लोकांची अलोट गर्दी यांची काहीच माहिती नव्हती. सकाळपासून रांगेत खूप ताटकळल्यावर श्री साईंपर्यंत फक्त जाता आले, परंतु पादुकांवर डोके ठेऊन लगेच पुढे जावे लागले. आम्ही उभयता मुग्धाला घेऊन बाहेर पडलो. मनात रुखरुख होती की दर्शन चांगले झाले नाही. मुग्धाला श्रींच्या चरणांवर घालायला मिळावयास हवे होते. आम्ही मंदिराभोवती एक फेरी मारली व मागील बाजूस आलो. आता मंदिरामधील गर्दी बरीच कमी झाली होती. मुख्य दरवाजातून प्रवेश बंद केला होता. माध्याह्न आरतीची वेळ होत होती. उजव्या बाजूच्या द्वारापाशी

एक दरवान उभा होता. मुग्धा माझ्या कडेवर होती. आम्हाला तिथे घुटमळताना पाहून त्यानेच विचारले, "अंदर आना है? दर्शन करना है तो अंदर आवो !" आमच्या पायात चपला तर तोच म्हणतो, "इधर रखो, हम देखते हैं।" आम्हाला त्याने आत सोडले. आत पाहिले तर शेवटचे काही लोक रांगेत होते. रांग मोठी होती, आम्ही पण रांगेत उभे राहिलो. आमच्याकडे फुले, प्रसाद वगैरे काही नव्हते, अगोदरच वाहून गेलो होतो ना! रांगेतून पुढे गेल्यावर परत आपले पादुकांवर डोके ठेवले व बाहेर आलो. समाधान झाले नव्हतेच. मुग्धाला श्रींच्या चरणावर घालायला मिळाले नाहीच. आम्ही पाठीमागच्या बाजूला दरवाजाजवळ थबकलो. तिथल्या दरवानाने उलट्या बाजूने आत जाऊ दिले. तिथे तेव्हा अजिबात गर्दी नव्हती. तिथून भटजीच्या हातात मुग्धाला दिले व चरणावर घालण्यास सांगितले. त्याने तिला चरणावर ठेवून बाजूला करताना दुसऱ्या कुणा भक्ताने वाहिलेल्या २१ नारळांचे तोरण दुसरा भटजी श्रींच्या गळ्यातून काढताना त्यातील एक नारळ सुटला व मुग्धाच्या अंगावर पडला. भटजीने तो उचलला व माझ्या हातात दिला, शिवाय प्रसाद व फुलांचा एक हार पण दिला. आम्ही त्या प्रसन्न मूर्तीकडे पहात मंत्रमुग्ध झालो. मनोमन प्रार्थना केली 'आमच्या मुग्धाला लवकर बोलायला येऊ दे'. तिथून बऱ्याच वेळाने आम्ही चावडीवर गेलो तिथे एका साधूने साईबाबांच्या अभिषेकाचे तीर्थ बाटलीत भरून दिले व मुग्धाला रोज पाजायला सांगितले. शिर्डीहून आम्ही घरी परतलो. मुग्धाला ते तीर्थ दररोज पाजू लागलो. ज्या दिवशी ते तीर्थ संपल्याबरोबर त्या दिवशी मुग्धा प्रथम बोलली "चाऽबा! चाऽबा!!" (साई बाबा, साई बाबा) खरोखर साईमाऊलीची कृपा! मुग्धा नंतर भरभर बोलू लागली.

"श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय!"

# सर्वधर्म समभाव
# आणि साईबाबा

— श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, मु. पो. ता. नवापूर,
जिल्हा-धुळे, नवापूर-४२५४१८.

गेल्या दोन हजार वर्षांच्या काळात भारतात व भारताबाहेर अनेक धर्मसंस्थापक जन्माला आले व त्यांनी त्या त्या काळाची परिस्थिती लक्षात घेऊन जनतेच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या नावाने अनेक धर्मांची स्थापना केली; मनाला शांती मिळविण्याचे व जे काही आपण मिळविले ते सुखाने उपभोगण्याचे व चिरंतन काळ सांभाळण्याचे सामर्थ्य धर्मात व धार्मिक आचरणात आहे. सर्व मानवसमाजांची भाषा भिन्न असली... पेहराव भिन्न असले... चालीरिती भिन्न असल्या तरी आपापल्या धर्मानुसार ईश्वराच्या अस्तित्वाविषयीच्या त्यांच्या मुलभूत कल्पना एकच आहेत.

बुद्धाने आपल्या धर्माची उभारणी समतेच्या पायावर केली. त्यांनी जातीभेदावर कठोर प्रहार केले; वास्तविक बुद्धधर्माची तत्वे अत्यंत उच्च आहेत परंतु कालांतराने मूलभूत तत्वांचा लोभ होत असल्याचे दिसते. असे असले तरी बुद्धाच्या थोरपणाला व त्याच्या उदात्त कामगिरीला त्यामुळे कमीपणा येत नाही.

इस्लाम धर्माचे संस्थापक महंमद पैगंबर यांनी सांगितले ते कुराणात आहे. माणसाने माणसाशी कसे वागावे, स्त्रियांशी व मुलांशी कसे वागावे, माणसाचे रोजचे कर्तव्य काय, रोज कसे आचरण ठेवावे, समाजात व कुटुंबात कसे वावरावे, मनावर ताबा कसा मिळवावा, दुर्गुणांचा त्याग करून कोणते सद्गुण कसे आत्मसात करावे, पापकर्मापासून कसे दूर रहावे, ईश्वर सर्वसाक्षी कसा आहे. येथून तेथून सर्व मुसलमान भाईभाई आहेत व त्यांनी परस्परांशी त्याप्रमाणे वागले पाहिजे हा महंमदाचा दंडक आहे; तर-

शीख धर्माचे संस्थापक गुरूनानक यांनी सत्याचरण, अन्यायाचा प्रतिकार व सर्वांभूती समभाव या तत्वांचा प्रचार केला. कोणी कोणावर चढाई करू नये; हिंदू असो वा मुसलमान असो प्रत्येकाने दुसऱ्या धर्माचा द्वेष न करता आपापल्या धर्माप्रमाणे वागावे व कल्याण साधावे, ईश्वर सर्वत्र आहे हे ओळखण्याचे शीक. सत्यनिष्ठ, सदा आनंदी व सर्वांशी दयेची वागणूक ठेवणे हे शीख धर्माचे तत्व. या तत्वांचा पालन करणारा तोच खरा शीख. परंतु शीख बांधव या तत्वांचे कितपत पालन करताहेत हे आपण आज पहात आहोतच.

पारशी समाजाचे आद्य धर्मसंस्थापक झरतुष्ट्र यांनी अग्नीदेवतेची उपासना हेच पारशीयांचे मुख्य अंग आहे हे सांगितले. या धर्माच्या सर्व क्रियाकर्मात अग्नी देवतेला अत्यंत मोठे स्थान आहे. अग्नी म्हणजे प्राण सर्व प्राणीमात्रांचे, वनस्पतींचे व जगातील सर्व प्रमुख व्यवहार चालू ठेवण्याचे साधन म्हणजे अग्नी. उत्पत्ती आणि लय अग्नीच्याच द्वारे होतो. अग्नी म्हणजे प्रतिपावित्र्य. मनुष्याला जीवन देणारा व भस्म करणाराही अग्नीच. प्रत्येक पारशी अग्नीत परमेश्वरी स्वरूपाचा अंश पाहात असतो व त्याच्यापुढे आपापल्या सुखदुःखाची कहाणी सांगत असतो.

जैन धर्मात नवचैतन्य निर्माण करणारे महान तपस्वी महावीर होत. अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य, अस्तेय व अपरिग्रह यांच्या सहाय्याने मोक्षप्राप्ती होते. मोक्षप्राप्तीची ही मुख्य साधने आहेत हा त्यांनी जनतेला दिलेला पहिला उपदेश. अहिंसेसारखा परमश्रेष्ठ धर्म नाही. अहिंसा परमो धर्मः असे महावीर मानतात.

वीरशैव धर्माला अभिनव व उज्ज्वल स्वरूप प्राप्त करून देणाऱ्या महात्मा बसवेश्वर यांनी सांगितले, "प्रत्येकाने काही ना काही उद्योग करावा. आळसात एक क्षणही फुकट दवडू नये. दुसऱ्यावर केव्हांही अवलंबून राहू नये. कोणताही व्यवसाय वा धंदा नीच किंवा हलक्या दर्जाचा नाही. मनुष्याचा दर्जा त्याच्या गुणावर, विद्वतेवर, त्यागभावनेवर व कर्तृत्वावर ठरविण्यात यावा. जातपात ही दर्जा ठरविण्याची कसोटी मुळीच नव्हे. प्रत्येकाने परस्पराशी बंधुभावाने वागावे. स्त्रियांस कमी लेखण्यास येऊ नये. स्त्रियांची योग्यता पुरुषांच्या बरोबरीने आहे. त्यांना समाजात पुरुषांच्या बरोबरीने मान असावा" अशी

बसवेश्वरांची शिकवण होती.

हिंदू धर्माने व्यास नावाचा पुरुष सर्वविश्रुत केलेला आहे. व्यास हा धर्मग्रंथ लिहिणारा व लोकोपयोगासाठी धर्माची मांडणी करणारा. हिंदूधर्माच्या इतिहासाची पहाट होण्याच्या समयी उद्भवलेला हा पुरुष अचाट सामर्थ्याचा होता. व्यास हा पहिला जगद्गुरू होय. अगदी अलीकडे स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्माची पताका सातासमुद्रापार नेली. ते म्हणतात- हिंदू धर्म शेंडीत नाही, बंडीत नाही; हिंदू धर्म जातीत नाही, मूर्तीत नाही, तो संस्कारात नाही वा नमस्कारात नाही, तसाच तो भोजनात नाही किंवा वर्जनात नाही, तर हिंदू धर्म कृतीत, अन्तःशुद्धीत, विश्वप्रीतित, समत्वात व जाज्वल्य सत्याभिमानात आहे. एकाच वाक्यात वैशिष्ट्ये सांगणारे सांगतात ते म्हणजे "ब्रह्म सत्यम् जगत मिथ्या" याचा अर्थ फक्त एकटे ब्रह्म हेच सत्य व शाश्वत आहे व हे सर्व विश्व मिथ्या म्हणजे खोटे होय. नितिनिष्ठा हा ब्रम्हविद्येचा पाया आहे. धर्मपालन करतांना आपले शरीर सुदृढ बनविणे हे प्रथमचे कृत्य आहे. पारलौकिक कल्याण व या लोकी अभ्युदय जो करतो तो धर्म अशी सर्वसाधारण स्पष्टता या धर्माबाबत आहे आणि शेवटी सांगितले आहे. सर्वेऽ सुखिनःसन्तु। सर्वे ऽ सन्तु निरामयः। सर्वे भद्राणि पश्यंतु। मा कश्चित दुःखभाग भवेत।

आता ख्रिस्त धर्म आणि संस्थापक येशू ख्रिस्त काय म्हणतो ते पाहू या. "आपण एकाच बापाची लेकरे असून तो सर्वश्रेष्ठ आहे." प्रेमाने वागावे ही एक महान शिकवण ख्रिस्त धर्माची होय.

आता पावेतो बौद्ध, शीख, पारशी, जैन, वीरशैव, ख्रिस्त व हिन्दु या धर्मांचा अतिसंक्षिप्तरित्या परिचय दिला आहे. या ठिकाणी ज्या धर्मांचा उल्लेख केला आहे अथवा ज्यांचा राहिला आहे, अशा कोणत्याही धर्माची तुलना करावयाची नाही. हा श्रेष्ठ तो कनिष्ठ हा सांगण्याचाही हेतू नाही; उलट ज्याने त्याने आपल्या धर्माचा यथार्थ अभिमान बाळगावा व त्याप्रमाणेच आचरण करावे. कोणत्याही धर्मातील बहुजन समाज जो असतो त्याला धर्माचा आधारच हवा असतो. आपापला धर्म कसा सत्यं, शिवं, सुंदरम आहे असेच सर्वांनी मानले आहे.

वेदातल्या ऋषीमहर्षींनी जे सांगितले, गीतेतल्या श्री भगवंतांनी जे सांगितले, महाभारत, रामायण रचणाऱ्या व्यास, वाल्मिकींनी जे सांगितले, शंकराचार्य, गौतमबुद्ध, महावीर, येशूख्रिस्त, महंमद पैगंबर, इतरतुष्ट्र, बसवेश्वर इत्यादींनी जे सांगितले तेच-

शिरडीच्या साईबाबांनी आपल्याकडे येणाऱ्यांना आणि आपल्याकडे न येणाऱ्यांनाही सांगितले. तसे पाहता श्री साईबाबांनी नवीन असे काहीच सांगितले नाही. साईबाबांनी कुठल्याही नवीन धर्माची अथवा पंथाचीही स्थापना केली नाही असे असतांना आजपर्यंत पृथ्वीवर होऊन गेलेल्या लोकोत्तर साधुसंतांनी जे सांगितले ते आपल्या मोडक्या तोडक्या शब्दांत सांगितले पण त्यांच्या सांगण्यात व वागण्यात वेगळेपण आहे ते म्हणजे धर्मसमन्वयाच्या पुरस्कारात! धर्माचा अर्थ जर मानव्याचे परम कल्याण असाच असेल तर सर्व धर्म एकच आहेत असे साईबाबा म्हणत! धर्माधर्मात पडलेली ही भींत खोटी आहे. ती फोडून काढा असे ते हात जोडून सांगत असत.

सर्वधर्म समभावाची शिकवण आजही शिरडी येथील बाबांच्या समाधी मंदिरात, द्वारकामाईत दिसते. हिंदू, मुस्लीम, पारशी, ख्रिश्चन, जैन, बौद्ध तसेच गुजराथी, मारवाडी मद्रासी, बंगाली, महाराष्ट्रीय व भारतातील साऱ्या जातीचे आणि जमातीचे अनेक भाषा बोलणारे आणि साऱ्या थरातले बाबांचे भक्त आणि उपासक एका मनाने आणि एका दिलाने एकत्र येऊन त्या सर्वधर्माचा समन्वय करणाऱ्या तत्वज्ञानाची, साऱ्या मानवजातीचे मंगल व्हावे अशी चिंता वाहणाऱ्या साईबाबांची पूजा आणि आरती करीत आहेत. श्री साईबाबा हयात होते त्यावेळी त्यांचे जे भक्त होते त्यापेक्षा आजकाल त्यांच्या भक्तांची संख्या अनेकपटीत वाढलेली आहे. याबाबतीत कोणी कोणावर सक्ती केलेली नाही. हे सारे आपोआप व स्वयंस्फूर्तीने घडून येत आहे. हे व्हायला काय कारण असावे.

साईबाबांनी मानव जातीचे भले केले. सर्वांचे भले व्हावे म्हणून झटले. ज्याप्रमाणे अग्निनारायणाला जात नाही, हंडीतल्या अन्नपूर्णेला जात नाही, ब्राम्हणाचा अग्नि अन्न शिजवतो तद्वतच मुसलमानाचा अग्निही अन्नच शिजवितो. हंडीतल्या अन्नाने हिंदूच्या पोटात रक्त होते तद्वतच मुसलमानाच्या पोटातही रक्त होते. अन्न, अग्नि, माती यांना धर्म नाही. ते साऱ्यांना समान मानतात त्याप्रमाणेच साईबाबांही साऱ्यांना समान लेखीत. मुळातच त्यांचा अवतार मानवजातीच्या कल्याणासाठीच झालेला होता ते साऱ्यांना म्हणत-

"तुम्ही माझ्यावर आपला भार सोपवा. मी तो सहन करीन! तुमच्यांसाठी मी तो भार उचलीन!" साऱ्या जीवनभर त्यांनी दुसऱ्यांची दुःखे नाहीशी करून त्यांना सुखी करण्याचा अहर्निश प्रयत्न केला. एवढेच काय जगाचा निरोप घेतांनाही त्यांनी सांगितले.

"जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी! नवसास माझी पावेल समाधी, धरा दृढबुद्धी माझ्या ठायी। तुमचा मी भार वाहीन सर्वथा नव्हे हे अन्यथा वचन माझे..."

माझी समाधी तुमच्या प्रार्थनेला पावेल. केवढा हा दिलासा आणि म्हणून श्रीसाईबाबांच्या भक्तीभावाने असंख्य मानव्याच्या हृदयात एक विराट शक्ती निर्माण झाली आहे. या शक्तीने साईबाबांचे विश्वबंधूत्वाचे कार्य केले पाहिजे. भेदाभेदाची भिंत ढासळून जाऊन विश्वबंधुत्वाची एकमेव भावना निर्माण व्हावी हाच साईबाबांचा सर्वधर्म समभाव होय.

परस्परात प्रेमभाव, सलोखा निर्माण करणाऱ्या विश्वधर्माची आज फार जरूरी आहे, परस्पराबद्दल प्रेमभाव वाटला पाहिजे. विश्वधर्मांशिवाय तंटे, बखेडे, मत्सर व आपसातील चुरस नाहीशी होणार नाही. श्रीसाईबाबांनी विश्वधर्माला पोषक माणसात बधुभाव जागृत करण्याचे कार्य जीवनभर केले.

श्री साईबाबांनी गरीब श्रीमंत यांना जवळ केले. कुणी मोठा नाही, कुणी छोटा नाही. सारी परमेश्वराची लेकरे आहोत. सर्वांनी प्रेमाने व सहकार्याने वागले पाहिजे, अशी शिकवण दिली. जातीजमातीतील वैरभाव सर्व धर्मांच्या.... पंथांच्या... जातींच्या लोकांना जवळ करून त्यांनी नष्ट केला. धर्म भिन्न असले तरी या जगात परमेश्वर एकच आहे. म्हणूनच साईबाबा नेहमी सांगत असत. सबका मालिक एक! प्रत्येक धर्माच्या शिकवणीत

थोडाफार फरक असेल, तत्वे वेगळी असतील परंतु मनुष्यप्राणी हा इथून तिथून एकच आहे. प्रत्येकाने एकमेकांकडे मानवतेच्या दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे. म्हणूनच साईबाबा हे सर्वधर्माचे प्रतिक होत.

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

**अनुवादक — साईनंद**

**गुरूवार,दिनांक १८.१.१९१२**

आज नोंदण्यासारखे खूप आहे. मी सकाळी खूपच लौकर उठलो, प्रार्थना केली. पण अजूनही उजाडायला सुमारे तासाचा अवधी आहे असे दिसून आले म्हणून पुन्हा लवंडलो आणि मग वेळेवर उठलो. सूर्योदय झालेला पाहिला. मी, उपासनी, बापूसाहेब जोग आणि भीष्म यांनी 'परमामृत' वाचले. तहसिलदार साहेब प्रल्हाद अंबादास, श्री. पाटे आणि त्यांचा लिंगायत सोबती आपापल्या स्थळी पोचले. शेवटच्या दोघांना 'निघा' अशी परवानगी नुकतीच मिळाली होती. आम्ही साईबाबांना ते बाहेर जातांना आणि काही वेळानंतर ते परत मशिदीत आल्यावर पाहिले. त्यांनी मला खूप चांगल्या प्रकारे वागविले आणि मी त्यांची सेवा करतांना त्यांनी मला दोन-तीन गोष्टी सांगितल्या.

ते म्हणाले, बरेच लोक त्यांचेकडे पैसे घेण्यासाठी म्हणून आले. पण त्यांनी तेव्हा कुणालाही विरोध केला नाही. घेणाऱ्यांनी घेतले. त्यांनी फक्त पैसे घेतलेल्या माणसांची नोंद केली आणि मग त्यांचा पाठपुरावा केला. भोजनासाठी ही मंडळी जेव्हा खाली उतरली तेव्हा त्यांनी त्यांना मारले आणि आपणाकडून नेलेले पैसे परत मिळविले.

दुसरी गोष्ट अशी होती की, एक आंधळा होता. तो येथे 'तक्क्या' जवळ राहात असे. एका माणसाने लोभाने त्याच्या बायकोला पळविले. सरतेशेवटी पुढे त्या आंधळ्याचाही खून केला गेला. चांगली चारशे माणसांचा जमाव चावडीभोवती यावेळी जमला, आणि या घटनेचा निषेध केला गेला. ज्याने खून केला त्याचा शिरच्छेद करण्याची आज्ञा झाली. या हुकूमाची अंमलबजावणी गावातल्या मांगाकडे सोपविण्यात आली. त्याने कोणताही हेतू न बाळगता केवळ कर्तव्य कर्म म्हणून ती पाळली आणि खुन्याचा प्रतिअवतार म्हणून मांगाचा वंशज मुलगा जन्माला आला.

त्यांनी पुन्हा आणखीनच एक गोष्ट सांगायला सुरुवात केली. पण या दरम्यान एक अनोळखी फकीर आला आणि साईबाबांच्या पायांना स्पर्श करू लागला. साईबाबा तेव्हा मनातून संतापले असावेत किंवा त्यांनी आपल्या मनाची शांती आणि समतोलपणा राखून भरपूर चिकाटी दाखविणाऱ्या त्या फकिराला तेथून दूर केले. शेवटी तो तिथून निघाला आणि बाहेर येऊन आवाराच्या भिंतीवर उभा राहिला. साईबाबा इतके संतापले की त्यांनी आरतीची पात्रे, भांडी आणि भक्तांनी थाळी थाळी भरून आणलेले खाद्य पदार्थ फेकून दिले, उडवून लावले. त्यांनी राममारुती बुवांना वर उचलले. त्यांनीच नंतर जाहिर केले होते की आपणाला आता वरच्या श्रेणीला बाबांनी पोचविले त्याबद्दल आपण अगदी

खूष आहोत. भाग्या नावाच्या एका इसमाशी आणि एका खेडूत मुलाशी साईबाबा काहीसे फटकारून वागले. सितारामने आरती आणली आणि मग आम्ही नेहमीच्याच पद्धतीने पण काहीसे घाईघाईने ती पूर्ण केली. म्हाळसापतींचे चिरंजीव मार्तंड यांनी मात्र यावळी चांगलेच मनोधैर्य दाखवून आरतीच्या बाबतीत उडालेला गोंधळ टाळला, उत्तम मार्गदर्शन केले. आरती सुरू झाली नाही तोच ती आटोपती घेण्यात आली हे जे असे झाले त्याला कारण म्हणजे, साईबाबा आपल्या नित्याच्या ठिकाणाहून बाहेर पडले. आरती संपण्यापूर्वी साईबाबा आपल्या नेहमीच्या बैठकीच्या जागी पुन्हा जाऊन बसले आणि दर्शनानंतर भक्त नेहमीप्रमाणे घरोघरी गेले. फक्त आज उदी वैयक्तिक लाविली गेली नाही, ती बाहेर ठेऊन दिलेली होती. साईबाबा आज रागावलेले नव्हते पण या सर्व गोष्टी त्यांनी लीलया म्हणून केल्या. या सर्व गोष्टींमुळे आम्हास उशीर झाला. त्यामुळे तात्या पाटलांनी आपल्या वडिलांच्या निधनाबद्दल तेराव्या निमित्त दिलेल्या भोजनास आम्हास उशीरच झाला. ४-३० वाजेपर्यंत आम्ही आमचे भोजनच करू शकलो नाही. वेळ मिळाला नाही म्हणून म्हणा पण काहीसे उशिरानेच मी श्रीसाईंच्या दर्शनास गेलो पण एव्हाना ते नेहमीच्या फेरफटक्यासाठी बाहेर पडले होते. आम्ही नित्याप्रमाणे त्यांना प्रणाम केला. वाड्यात आरती नित्याप्रमाणे झाली. आज मेघाची प्रकृती खूपच बिघडली होती. त्याला धडपणे उभेही राहता येत नव्हते. आज रात्रीच त्याची जीवन ज्योत मालविली जाणार असे भाकित बाबांनी केले होते. आम्ही नंतर सायंकाळच्या चावडी मिरवणुकीला हजर राहिलो. मी मोरचेल नेहमीप्रमाणे घेतला होता आणि सायंकाळी सर्व काही ठीक होते. सीतारामने आरती केली. रात्री भिष्मांचे भजन आणि दिक्षितांचे रामायण असे कार्यक्रम झाले.

# साई नमस्कार

असो तुला साई माझा सदा नमस्कार
तुझ्या दया दातृत्वाला अंत नाही पार ।। धृ. ।।

तुझ्या कृपेने रे होतील, फुले फत्तराची ।
तुझ्या कृपेने रे होतील, मोती मृत्तिकेची ।।
तुझ्या कृपेने रे होईल, सर्प रम्य हार ।। १ ।।

तुझ्या कृपेने रे होईल, सुधा त्या विषाची ।
तुझ्या कृपेने रे होईल, उषा त्या निशाची ।। २ ।।

तुझ्या कृपेने सिंधु मधला, बिंदु जरी मिळेल ।
तरी प्रभो शतजन्माची, मम, तृषा शमेल ।।
तुझी म्हणोनी आले, बाबा बघत बघत द्वार ।। ३ ।।

— कु. आरती अनिल कालेवार
गणेश चौक, बदलापूर

# राष्ट्रीय एकात्मता आणि साईबाबांची शिरडी

— श्री. भास्कर गो. जोशी
साईप्रसाद, ४२ श्रीकृष्ण
नगर, बोरीवली (पूर्व),
मुंबई-४०००६६.

आजकाल आपल्या भारतात प्रत्येकाच्या तोंडी एकच विषय घोळतो आहे, तो म्हणजे राष्ट्रीय एकात्मता. सद्य परिस्थितीत नित्य घडणाऱ्या हिंसाचाराबद्दल चिंता लागून राहिली आहे. ह्या अशा अशांत वातावरणात खरी राष्ट्रीय एकात्मता पहावयाची असेल तर श्रीसाईबाबांच्या शिरडी शिवाय दुसरे स्थान नाही. येथे मनुष्य आपला धर्म, जात, भाषा, सर्व काही विसरतो, स्वतःला सुद्धा विसरतो. फक्त त्याचे एकच ध्यान असते ते बाबांचे, चिंतन असते ते बाबांच्या नावाचे. त्याचा धर्म एकच माणूस धर्म, जात एकच ती म्हणजे भक्त आणि भाषा एकच प्रेमाची. येथे एक विलोभनीय दृश्य दिसते. भक्त एकत्र जमून एकमेकांना बाबांचे अनुभव सांगण्यात दंग होतात, त्यांना त्यात भाषेची अडचण येत नाही. सर्व जाती जमातीचे लोक बाबांना अभिषेक करतात, त्यावेळी धर्माची अडचण येत नाही. हिंदू, मुसलमान, पार्शी, शीख, ख्रिश्चन सगळे एकमेकांच्या मांडीला मांडी लावून अभिषेकाला बसतात, सत्यनारायणाची पूजा सुद्धा करतात. त्यांच्या वागण्यात, बोलण्यात प्रांतीयतेचा वास नसतो, धर्माभिमान किंवा भाषाभिमान नसतो. त्यांना फक्त एकच माहीत असते, ते म्हणजे साईबाबांची आपण लेकरे आहोत. स्वतः साईबाबा धर्मभेदाच्या पलीकडे होते. ते हिंदू होते की मुसलमान हा एक संशोधनाचा विषय आहे.

आपले संत सत्पुरूष जाती, धर्म, पंथ असा कुठल्याच प्रकारचा भेदभाव मानीत नव्हते. सर्व धर्मसमभाव ही त्यांची शिकवणूक होती. त्याचाच परिणाम म्हणजे राज्यकर्ते धर्मसहिष्णू होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी मोगलांविरुद्ध मोहीम उघडून हिंदू पदपातशाहीची स्थापना केली ती मोगल परकीय होते म्हणून. महाराजांच्या सैन्यात हिंदूं बरोबर मुसलमानही अधिकारी होते. हीच परंपरा पुढे चालू राहिली. मुसलमानांनी येथेच वास्तव्य करून भारत देश हाच स्वतःचा देश मानला. बुद्ध व शीख ह्या दोन्ही धर्मांचा उगम हिंदू धर्मातूनच झाला आहे. मुसलमान व ख्रिश्चन ह्यांचे पूर्वजही हिंदूच होतें. धर्म बदलला म्हणजे संस्कृती बदलत नाही, राष्ट्रीयत्व बदलत नाही. पुढे इंग्रजांचे आक्रमण झाले व त्यांनी आपले राज्य स्थापन केले. त्यांच्या विरुद्ध भारतीय जनता सर्व भेद विसरून एक झाली व यशस्वीपणे इंग्रजांना तोंड देऊन भारतीयांनी आपले स्वातंत्र्य परत मिळविले. परंतु स्वराज्यात मात्र सर्व भेद पुन्हा उफाळून वर आले व राष्ट्रीय एकात्मतेला तडा गेला.

अशा कठीण परिस्थितीत आपल्याला तारणारा एकच अर्वाचीन संत सत्पुरूष आपल्या नजरेसमोर येतो, तो म्हणजे शिरडीचे श्रीसाईबाबा. त्यांची शिकवण म्हणजे सर्वधर्मसमभाव

त्यांच्या शिकवणुकीचा प्रचार सर्वत्र व्हावयास हवा. साईबाबांची नुसती देवळे उभारून व पूजा आरती करून हे काम होणार नाही तर ह्या देवळांतून त्यांच्या विचारसरणीचा जास्तीत जास्त प्रचार करावयास हवा. प्रत्येक भारतीयाच्या मनात सर्वधर्मसमभाव तसेच राष्ट्रीय एकात्मतेची भावना जागवली पाहिजे. राष्ट्रीय एकात्मतेचे एकच आशास्थान आहे, आणि ते म्हणजे शिरडीचे श्री. साईबाबा.

*******

# श्री साईबाबांच्या उदीचा चत्मकार

**— सौ. कमल बा. रेखी**
बी/१, लक्ष्मीसदन-रामगल्ली,
एस. व्ही. रोड, कांदिवली (प.)
मुंबई- ६७.

माझी थोरली मुलगी सौ. वृषाली काणे गेल्या मे महिन्याच्या सुट्टीत डोंबिवलीहून माझ्याकडे राहाण्यास तिच्या मुलीसह आली होती. ती सुद्धा निस्सीम साईभक्त आहे. सुट्टी असल्यामुळे तिने 'श्रीसाईसत्चरित' या पोथीचे सात दिवसांचे पारायण केले. समाप्तीच्या रात्री ११-११ ॥ च्या दरम्यान तिचे पोट एकाएकी मनस्वी दुखू लागले. तिला काही सुचेना. आम्ही सर्वजण घाबरून गेलो. आमचे फॅमिली डॉक्टर जोशी हे आमच्या समोरील इमारतींत ४ थ्या मजल्यावर राहात होते. परंतु माझ्या पतीला दम्याचा त्रास होत असल्याने त्यांनाही जिना चढणे शक्य नव्हते. डॉक्टरांकडे एवढ्या रात्री कोण जाणार हा प्रश्न पडला. मुलीच्या हातून पारायणाच्या बाबतीत काही चूक तर झाली नसेलना! असाही प्रश्न वारंवार मनात येऊ लागला. ती वेळ विचार करीत बसावयाची नव्हती. मी त्वरीत देवघरात गेले. बाबांच्या पोथीला, तसबिरीला नमस्कार केला, हळदी कुंकू वाहिले. देवघरातल्या डबीतून उदी घेतली व बाबांना म्हणाले, 'माझी मुलगी काही चुकली असल्यास तिला सांभाळून घ्या.' तिला पाण्यातून उदी दिली, कपाळी लावली व लगेच मी डॉक्टर दिलीप जोशी यांना बोलावण्यास निघाले. तोच माझी मुलगी म्हणाली, आई! जरा थांब मला ढेकर आला आहे, पांच मिनिटे आपण वाट पाहू. अन् काय चमत्कार! हळूहळू तिला सारखे ढेकर येत गेले व पोटाचे दुखणेही हळूहळू कमी होत गेले; आणि अर्ध्या तासातच ती शांत झोपी गेली.

# बाबांची किमया

— श्री. गुरुनाथ विष्णु पन्हाळकर
३१२ डी, रंकाळवेस,
कोल्हापूर.

तो गुरुवारचा दिवस होता. मी देवघरात देवाची पूजा करीत होतो. पूजा संपत आली होती. देवघरात समई जवळ श्री. गुरुदत्ताचा फोटो, त्याच्यावरील बाजूस श्रीबाबांचा फोटो! देवघरातील वरील मोकळ्या जागेत कपडे वाळत घालण्यासाठी काठ्या आडव्या लावल्या आहेत. त्यावरती कपडे वाळत घातले होते. माझा पुतण्या वाळलेले कपडे काढण्यासाठी तेथे आला आणि काठीने कपडे काढू लागला, कपडे खाली पडले. त्याच्या हातून काठी निसटली व ती काठी देवघरात लावलेल्या पेटत्या समईवर पडली. हे बघून माझ्या पोटात धस्स झाले. मला वाटले की पेटती समई खाली पडणार!

परंतु भक्त हो! म्हणतात ना बाबांची कृपा अथवा किमया फार थोर! ती काठी समईवर पडून बाजूला पडली आणि आश्चर्याची गोष्ट अशी की पेटती समई अजिबात खाली पडली नाही. (असे म्हणतात, पेटती समई अथवा निरांजन खाली पडू नये.) बाबांनी त्यावेळी एक प्रकारची किमया केली. आमचे संकट निवारण केले. मी बाबांचे मनोमन फार आभार मानले व त्यांना प्रार्थना केली की अशीच तुमची कृपा दृष्टी सर्व साईभक्तांवर सदोदित राहो.

# माया

— श्री. शाम जुवळे
जनार्दन भुवन, ९ छबिलदास मार्ग,
दादर (प.), मुंबई - २८.

मायेच्या बाबतीत युगानुयुगे मानवाचा विचार-प्रवाह सारखा वहात राहिलेला आहे. कालचक्राप्रमाणे मायेच्या विषयीचे हे विचार-चक्र अखंडपणे चालूच आहे. मानवाची शक्ती कितीही बलाढ्य मानली तरी या बाबतीत ती असमर्थच ठरलेली आहे. मानवाची बुद्धी परमेश्वराने उपलब्ध करुन दिलेल्या गोष्टींचा आधार घेवूनच या विश्वामध्ये नेहमी वावरत आलेली आहे. मानवाला सर्वस्वी स्वतःची अशी स्वतंत्र कृती दाखविता येणार नाही. परमेश्वराचे या बाबतीत कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

"माया" या संस्कृत शब्दात "मां" म्हणजे नाही व "या" म्हणजे "जी" असे हे दोनच शब्द आहेत. या विश्वातील सर्व अनर्थाला, सर्व अज्ञानाला तसेच सर्व अविद्येला मूळ कारण म्हणजे ही मायाच होय. जिचे मुळात अस्तित्व नाही ती एवढी बलाढ्य

ठरली आहे, तर तिने स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व धारण केले असता अखिल विश्वाची केवढी दुर्दशा उडेल याची कल्पना करणेही कोणाला शक्य होणार नाही. या बाबतीत सत्य हे आहे की ज्या दयाधन विधात्याने ही विश्व-निर्मिती केली आहे, त्याचा त्रिकालाबाधित शुद्ध हेतू सर्वांचे कल्याण असावे हाच आहे. त्याने आजतागायत अकल्याण कोणाचेच केलेले नाही व पुढेही तसे करणे सर्वथा असंभवनीय आहे. विधात्याने संपूर्णतया अभेदवृत्ती धारण करून विश्वात निर्मिलेल्या विविधतेत जेव्हा जेव्हा मानव भेदाचा त्यावर घाव मारतो तेव्हा वैयक्तिकरित्या तो मानव स्वतः तर दुःखी होतोच परंतु या बिघाडपणात जे इतर लोक त्याचे साथी बनतात त्यांनाही त्या दुःखाची झळ लागल्याशिवाय रहात नाही. विश्वातीत कार्य-कारण मीमांसा इतकी गुंतागुंतीची आहे की तिचा संपूर्णतया उलगडा माणसास होणे केवळ अशक्यप्राय आहे. म्हणून माया तरून जाण्यास परमेश्वराचीच मानवाला गरज लागते, हे त्रिवार सत्य आहे.

भर दुपारी सूर्यनारायणाच्या तळपत्या उन्हात डोळ्यांना मृगजळाचा भास होतो तद्वतच मानवाच्या स्वार्थी नजरेला मायेचा उपसर्ग होत असतो. स्वार्थ हा भेद-निदर्शक असल्यामुळे स्वार्थी माणसाच्या सुखाची शकले उडवीत असतो. परिणामी माणूस सतत भयाच्या व दुःखाच्या छायेखाली वावरत असतो.

मायेच्या भ्रमिक उत्पत्तीस देवाची शक्ती कारणीभूत होत असल्यामुळे शिवाची शक्ती म्हणून मानलेल्या देवी पार्वतीस "आदि-माया" म्हणून संबोधिले जाते. देवाने स्वतःच्या शक्तीद्वारा हे सारे विश्व निर्माण केलेले असल्यामुळे विश्वातील यच्चयावत हालचाली हा त्याचा मायिक-खेळ [क्रीडा] म्हणून सर्व संतपुरूष मानीत आलेले आहेत. याच कारणास्तव संतांना सुख दुःखादि द्वंद्वाची बाधा असत नाही. देव खेळ खेळून खेळावेगळा रहात असतो. देवाची अंतःकरणपूर्वक आराधना करणाऱ्या प्रिय भक्तालाही देव आपल्यामध्ये सामावून घेवून या मायिक खेळाची बाधा होऊ देत नाही. देव आणि भक्त यांचे नाते अतूट असले तरच या खेळातील हार-जीत भक्ताला आपल्या ध्येयापासून वंचित होऊ देत नाही वा करू शकत नाही. देवाची भक्तावरील कृपा ती हीच होय. देवाची कृपा व भक्ताची देवाविषयी कृतज्ञता या दोन सख्या बहिणींचे सख्य जमले म्हणजे पृथ्वीतलावरील कोणतीही शक्ती त्यांना अलग करण्यास यशस्वी होत नाही. दैवी शक्तीपुढे असुरी शक्तीचा पराजय हा ठरलेलाच असतो.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आपल्या हरिपाठात म्हणतात — "निजवृत्ति हे काढी। सर्व माया तोडी। इंद्रियासवडी लपू नको ॥" मायेच्या आश्रयाने भवसागर तरुन जाणे शक्य होत नसल्यामुळे ज्ञानेश्वर माऊलीला माया तोडून टाकण्याचा उपदेश लोक कल्याणास्तव करावा लागला.

समर्थ रामदास आपल्या श्री दासबोधात उपदेश करतात — "साधु निश्चय करिती एक, आत्मा सर्वत्र व्यापक। येर हे अवघेची माइक, सचराचर॥ चित्रीं लिहिली सेना, त्यात कोण थोर, कोण साना। हे तुम्ही विचाराना, आपुले ठाई॥" मायेचा हा लटका संसार पाहून जनहितासाठी समर्थांनी कळकळीचा उपदेश येथे केला आहे.

कलियुगात आणि त्यातल्या त्यात आजच्या विज्ञान-युगात मायेच्या विळख्यात सापडून सर्वत्र विनाश घडून येत असता मानव अजून मायेच्या बाबतीत एवढा गाफील राहिलेला आहे, याचे कारण ज्याचे पूर्व सुकृत धड आहे तोच भाग्यवान भक्त मायेच्या अतीत राहू शकतो. जात्यात घातलेल्या धान्याच्या प्रत्येक कणाचे जसे भरडून पीठ होते तसेच मायेच्या पीठाच्या गिरणीत सर्व लोक स्वतःचा नाश स्वतःच ओढवून घेत असतात. अपवादात्मक काही थोडेसे धान्याचे कण पीठ न होता धडधाकट रहात असतात; तद्वतच काही थोडेसे भाविक भक्त मायेच्या जाळ्यात न सापडता परमेश्वर कृपेने पैलतिरी सुखरुप जावून पोहोचतात. भगवान श्री सूर्यनारायणाच्या कल्याणकारी प्रकाशाप्रमाणेच परमेश्वरी कृपा उपलब्ध आहेच आहे, अंतःकरणाची कवाडे उघडी ठेवण्याचीच तेथे खोटी आहे, हेच येथील त्रिकालाबाधीत सत्य आहे.

विश्वाच्या संदर्भात जशी माया तशी प्रत्येक जीवाच्या बाबतीतील वासना होय. मायेचा पाश तोडणे जसे कठीण आहे तसेच वासनेवर विजय मिळवणे दुरापास्त आहे. मूळ दैवी शक्तीचा अविवेकाने गैरवापर केला असता माणूस वासनेच्या आहारी जावून स्वतःचा नाश स्वतःच ओढवून घेत असतो. वासनेवर नियंत्रण न ठेवल्यामुळे आजची ही बिकट परिस्थिती माणसावर गुदरलेली आहे. विवेकाचा जेथे अभाव दिसून येतो तेथेच वासना आपला प्रभाव दाखविण्यासाठी पुढे सरसावत असते. देह बुद्धी ही वासना बळावण्यास कारणीभूत होत असते. वाळवी जशी घर पोखरुन काढते तशी वासना बुद्धीला विपरित बनवित असते. बुद्धी विपरीत होणे म्हणजे विनाशाला निमंत्रित करणे होय. सद्‌बुद्धीपासून वासना नेहमी दूर रहात असते. जगाविषयीची आसक्ती ती माया होय व देवाविषयी भक्ती ते प्रेम होय.

जागतिक विद्येमध्ये माणूस कितीही प्रवीण बनला तरी मायेच्या अंधःकारातून स्वतःची सुटका करून घेण्यास असमर्थ ठरतो. उलट अशा विद्येने माणूस हुरळला जावून व्यसनी व दुःखी-कपटी बनला जातो, असेच संत -पुरूष सांगत असतात. आत्मियतेचा सद्‌गुण त्याच्या अंगी असत नाही. परिणामी तो साध्या माणुसकीला देखील पारखा बनला जातो. एवढ्याचसाठी अध्यात्म-विद्या जी सर्वश्रेष्ठ मानली गेली आहे, तिचा अंगिकार करण्यास संतपुरुष कळकळीने बजावित असतात. अध्यात्म -विद्या ही बुद्धीमध्ये ज्ञानाचा प्रकाश पाडीत असते. या ज्ञानाच्या प्रकाशाने मायेचा पडदा दूर सारला जावून माणसाला आत्मदर्शनाचा लाभ होत असतो. आत्मदर्शनानेच मानवी जीवन प्रकाशित केले जाते. प्रकाशमान जीवन जीवाला आनंद व शांती प्रदान करीत असते. कृत्रिम सुखाने माणसाच्या मनाला कधीच शांती मिळत नाही. बाह्य सुधारणा घडवून आणल्याने माणूस सुखी होत असल्याचा नुसता भास होत असतो. अंतरंगात तो अशांत व अतृप्तच असतो. अशांत व अतृप्त मन उगाचच इतरांचा हेवा तसेच द्वेष करीत असते. अशाने माणसाचा विकास घडून येण्याऐवजी माणूस अधिकाधिक विकारी बनत असतो. विकृत बनलेल्या मनावर माया नेहमी झडप घालीत असते. अज्ञान, अविद्या वगैरे मायेचेच प्रकार होत. क्षणाक्षणाला माणसाला जे जागृत ठेवीत असते तेच खरे शिक्षण होय. अशा शिक्षणानेच माणूस

खऱ्या अर्थाने सुशिक्षित होऊन मायेच्या अतीत राखला जातो. जो चैनी जीवन जगत असतो तो उच्च शिक्षण घेवूनही अशिक्षित राहतो. या उलट भक्तीची डोळस दृष्टी प्राप्त झालेला माणूस गरीब परिस्थितीतही संतुष्ट व आनंदी असतो. खरे म्हणजे माणसाचे जीवन हृदयाच्या श्रीमंतीने विकास पावत असते. विकासाने मायेचे धुके नाहीसे होत असते व जीवनात ज्ञानाचा प्रकाश पाडला जातो. जीवनात मानवी मूल्ये जतन करुन ठेवावयाची झाल्यास माया मावळली पाहिजे. तरच ज्ञानसूर्य उदयास येईल व माणसाला सुखी जीवन जगता येईल. या संदर्भात श्री साईबाबांचे पुढील अमोलीक बोल किती बोधप्रद आहेत, याची प्रचिती येते. —

"अरे जरी मी झालो फकीर। घर ना दार बेफिकीर। बसलो एका ठायी स्थिर। सारी किरकिर त्यागुनी॥४॥ तरी ती माया अनिवार। मलाही गांजी वरचेवर । मी विसरे परी तिजला न विसर। मजही निरंतर कवटाळी॥५॥ आदिमायाच ते हरीची। त्रेधा उडविते ब्रम्हादिकांची। तेथ मज दुबळ्या फकीराची। वार्ता कैंची तिजपुढे॥६॥ हरीच होईल जेव्हा प्रसन्न। तेव्हाच होईल ते विच्छिन्न। विना अविच्छिन्न हरिभजन । मायानिरसन नोहे पां॥७॥

— श्रीसाईसच्चरित, अध्याय १३ वा.

# 'माणूस' हाच खरा धर्म

**— श्री. प्रशांत प्रल्हाद संन्याशिव**
१८/५६४, शास्त्रीनगर,
गोरेगाव (प.), मुंबई-४०० १०४.

चांगला उपदेश करण्यासाठी व दुष्टांचा नाश करण्यासाठी भगवंताने वारंवार ह्या पृथ्वीतलावर जन्म घेतला. श्रीकृष्णाने जन्म घेतला तो कंसाचा नाश करण्यासाठी तर पांडवांनी जन्म घेतला तो कौरवांचा नाश करण्यासाठी. अशा एक ना अनेक गोष्टींसाठी भगवंताने वारंवार जन्म घेतला आहे.

बाबांनी कलियुगात जन्म घेतला तो धर्माचे आचरण पाळण्यासाठी, हिंदू व मुसलमान या धर्मातील माणसांमध्ये एकता आणण्यासाठी.

बाबांच्या दारी आलेला प्रत्येक मनुष्य रिकाम्या हाताने येतो व ज्यावेळेस तो बाबांच्या दरबारातून जातो त्यावेळेस त्याची झोळी बाबांच्या आशीर्वादाने पूर्णपणे भरलेली असते. शिर्डीत असताना साईबाबांनी पहिल्या प्रथम अनेक त्रास सोसले. परंतु बाबांनी त्याची

कधीच पर्वा केली नाही. उलट ते मनोभावे गरीबांची सेवा करीत. आपल्या चमत्कारिक विभूतीने अनेक लोकांचे आजार दूर करीत, त्यांना अनेक संकटांतून मुक्त करीत. बाबा हयात असताना बाबांचे अनेक भक्त होऊन गेले. त्या भक्तांना बाबांनी चांगली शिकवण व चांगले उपदेश केले. धर्माचे आचरण कसे पाळावे ह्याची शिकवण त्यांना दिली. बाबा आपल्या भक्तांवर अगदी मुलांप्रमाणे माया करीत. त्यांच्या मनात चांगला विचार घडवून आणत. बाबांनी हिंदू व मुसलमानांना एकत्र आणण्याकरिता १८९७ साली दोन सण सुरू केले — रामनवमी व उरुस.

या काळातही बाबांच्या भक्तांना बाबांचे खूप अनुभव येत आहेत. त्यामुळे बाबांचे भक्त दिवसेंदिवस वाढत आहेत व आजही शिर्डीला भक्तांची गर्दी वाढत आहे. रामनवमी व उरुस ह्या सणांच्या दिवशी भक्तांची गर्दी खूप असते. विशेषकरून निरनिराळ्या धर्मांचे, पंथांचे लोक सुद्धा ह्या सोहळ्याला हजर असतात. तरीही हा सोहळा अगदी शांततेने पार पडतो. कोणत्याही भक्ताला कसलाच त्रास होत नाही. 'सबका मालिक एक है।' सगळ्या माणसांचा धर्म सारखा आहे. ही बाबांची शिकवण किती सार्थ आहे हे यावरून दिसून येते.

बाबांनी प्राणिमात्रांवर देखील दया केली. बाबांना मिळालेल्या भिक्षेतून अर्धा हिस्सा बाबा भुकेलेल्या प्राण्यांना देत व त्यांचा अतृप्त आत्मा तृप्त करीत. त्यांना (बाबांना) ह्या उदाहरणावरून असे सूचवायचे होते की, 'प्राणीमात्रांवर दया करा, त्यांना माणसांप्रमाणे वागवा, अतृप्त असलेल्या माणसाला किंवा प्राण्याला तृप्त करा, भुकेलेल्यांना अन्न द्या. सगळ्यांचा आत्मा एकच आहे व प्रत्येक आत्म्यामध्ये देव साठवलेला असतो. बाबा वाट चुकलेल्या माणसाला वाट दाखवित व त्याला भक्तिमार्गाचा मार्ग दाखवित.

बाबा आपल्या भक्तांना म्हणत :—

जो जो मज भजे, जैसा जैसा भावे।
तैसा तैसा पावे मीही त्यासी ।।

# धुनिमाई आणि प्रदूषण

**— सौ. उषा प्रभाकर मुळे**
१६०, नारायण पेठ,
पेटकर वाडा, पुणे-३०.

ग्रीष्म, शरद वा हेमंत। ऋतु असो वर्षा वा वसंत।
अष्टौप्रहर मशीदीत। धुनी तेवत बाबांची।
काय बाबांचा निर्धार विचित्र। अग्निहोत्र्याचे अग्निहोत्र।
तैसी प्रज्वलीत अहोरात्र। धुनी ती पवित्र बाबांची।

(साई सत्चरित, अध्याय २३/८४, ८५)

विज्ञान युगात प्रदूषण हा एक मानवाला शापच ठरला आहे. जीवन जगणे कठीण झाले आहे. नाक, घसा, मेंदू या सर्वांवर प्रदूषणाचा परिणाम होत आहे.

श्री साईबाबा द्रष्टे होते का? त्यांनी आपल्या हयातीत -अग्निहोत्र-धुनीमाईची स्थापना केली. त्यात चंदन, तूप, तांदूळ, नारळ इत्यादी सुगंधी द्रव्याचे हवन होते व त्यातून शुद्ध असे वायू तयार होतात. ते सर्व प्रदूषण नष्ट करण्याला उपयोगी आहेत. शिर्डी क्षेत्राच्या आजूबाजूला साखर कारखाने वाढत आहेत, चहुबाजूने प्रदूषण रूपी वातावरण पसरले जात आहे, माणसाला श्वास घेणे कठीण झाले आहे. हे श्री साईबाबांनी जाणले होते. विज्ञानाचे महत्त्व त्यांनी हेरले होते. आज ही पवित्र धुनि प्रदूषण नष्ट करण्याचे कार्य करीत आहे.

सायंकाळी साडे आठ वाजता द्वारकामाईतून घंटेचे टोल ऐकू येतात, द्वारकामाई बंद होण्याची वेळ येते आणि त्यात टाकलेल्या गोवऱ्या, लाकूड, चंदन इत्यादि हवनातून प्रचंड धूर आकाशातून फिरत घराघरातून-झोपड्यांतून, आजूबाजूच्या खेड्यांतून श्री साईबाबांचा संदेश घेऊन जात असतो, भाविक लोक त्या वेळेला नमस्कार करतात, तो सुगंधित धूर घरात आला की मन पवित्र व प्रसन्न होते, जणुकाही साईबाबाच भेटीला आले असे वाटते. हा अनुभव मी अनेक वेळा घेतला आणि म्हणूनच त्याचे महत्त्व काय आहे ते समजले. सर्व प्रचलित धर्मात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात वातावरण शुद्धी हेतु-अग्नि उपासना- तेजाची उपासना पहावयास मिळते. किंबहुना हिन्दु, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध,जैन, पारशी, शीख, ज्यू इ. सर्व धर्मांचे लोक या अग्निहोत्र तत्त्वाला मान देतात.

हजरत मुसा पैगंबरांना झालेले पवित्र अग्निचे दर्शन, त्या अग्नीतून ऐकू आलेला ध्वनी,'मीच तुझा मार्गदर्शक गुरु आहे,' या प्रसंगाचे वर्णन कुराणात तीन वेळा आले आहे.

भगवान बुद्धाला अग्निहोत्राचे अर्थात अग्निउपासनेचे महत्त्व माहीत होते. म्हणूनच ते म्हणाले, सर्व यज्ञांत 'अग्निहोत्र' श्रेष्ठ होय!

पारशी लोकांचा झरतुष्ट्री धर्म अग्नि उपासनेचेच महत्त्व सांगतो.

या सर्व उदाहरणांवरून श्री साईबाबांनी एकता, सर्वधर्मसमभाव हे लोकांना समजावले व शिर्डी क्षेत्रात आजही सर्व धर्माच्या लोकांची अलोट गर्दी दिसत असते. श्री साईबाबांनी संदेश दिला आहे.-

तेही स्ववर्णा श्रमोचित। यथोक्तानुष्ठानसहित।
अग्निहोत्रादी नित्य विहीत। चित्त अकलंकीत होई तो।
हा एक चित्त शुद्धीचा मार्ग। दुजा सर्व संग परित्याग।
हे न आक्रमिता ज्ञानयोग। कर्म भोगची केवळ॥

(श्री साईसच्चरित - अ.२०, १[illegible], १२३)

यावरून असे स्पष्ट होते की,श्री साईबाबा हे गूढ संदेश देणारे महान प्रभूच होते, द्रष्टे होते.

★★★★★

# "श्रद्धा आणि सबुरी"

— श्री. शिवाजी परशुराम घोलप
मु.पो. धसई,
ता. मुरबाड,
जि. ठाणे.

मी एक प्राथमिक शिक्षक आहे. माझी माधुरी नावाची मुलगी ११ वर्षे वयाची आहे. ती वयाच्या २ ऱ्या वर्षापासून नेहमी आजारी असायची. सतत १०-११ वर्षे अनेक डॉक्टरांना, स्पेशालिस्टांना तिची प्रकृति दाखविली; परंतु तब्येतीत सुधारणा नाही म्हणून आमच्या भागातील डॉ. अग्रवाल यांचेकडे त्यांचा बोलबाला झाला म्हणून त्यांच्या दवाखान्यात तिला घेऊन गेलो. हे डॉ. साईभक्त आहेत. त्यांच्या दवाखान्यात बाबांची प्रतिमा आहे. त्यांनी मुलीला हृदयाचा आजार आहे असे निदान केले आणि माझ्या काळजीला सुरूवात झाली. त्यांनी आम्हाला कल्याण येथील सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. सुरेश ठक्कर यांचेकडे पाठविले. त्यांच्याही दवाखान्यात मला श्री बाबांच्या प्रतिमेचे दर्शन घडले. त्यांनी डॉ. अग्रवाल यांचे निदान बरोबर आहे, मुलीला ऑपरेशनने अगर औषधोपचाराने गुण येईल हे ठरविण्यासाठी जे.जे. हॉस्पिटल येथे जावे लागेल असे सांगितले. तो वार होता गुरूवार! त्यांनी लिहून दिलेली औषधे घेण्यासाठी मी एका मेडिकल स्टोअर मध्ये गेलो तर, दर्शनी भागी श्री बाबांची प्रतिमा दिसली. औषधाबरोबर अेक कॅलेंडर दिले. घरी येऊन कॅलेंडरची सुरनळी उघडून पाहतो तर बाबांची प्रतिमा!

एका गुरुवारी मुलीला जे.जे. हॉस्पिटल, मुंबई येथे ऑपरेशनसाठी दाखल केले. एका मंगळवारी ऑपरेशन होणार म्हणून सांगितले पण मंगळवारी सकाळी प्रमुख डॉक्टरकडून सांगण्यात आले, ऑपरेशन गुरुवारी होईल!! ॲडमिट केले गुरुवारी, ऑपरेशन झाले गुरुवारी आणि डिस्चार्जही दिला गेला गुरुवारीच. ऑपरेशनच्या कामी ज्या व्यक्तिची मला बहुमोल मदत झाली ती म्हणजे ठाणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मा. जयवंतराव पवार यांनी आर्थिक बाजू सांभाळली. ते सुद्धा दरवर्षी शिर्डी यात्रा करणारे.

केवळ बाबांची प्रतिमा पाहून मी मनात श्री बाबांचे बद्दल श्रद्धा ठेऊन हृदयासारख्या नाजुक अवयवाची शस्त्रक्रिया करवून घेऊन मुलीला श्री बाबांचे पायी नुकताच दर्शन घेऊन आलो.

सोबत श्री बाबांचे चरित्रात असलेला महत्वाचा संदेशही घेऊन आलो की, बाबा म्हणत "माझ्या सारखा फकिर तुम्हाला काय देणार फक्त समाधान!" आणि मी श्रद्धा ठेवल्यानेच हे समाधान लाभत आहे.

# —साईबाबा —

सौ. सुधाताई चैतन्य
१४, गजस्व ग्राम, इंदोर

माझं लग्न झालं, आम्ही दोघे बंधनात बांधलो गेलो. माझ्या माहेरची शिकवण 'पती हाच परमेश्वर'. त्यांच्या प्रत्येक शब्दाला मी झटत असे. पण त्यांना साई बाबांच्या भक्ती कडे पाहून मला नवल वाटे. हौस-मौजेकडे त्यांचे मुळीच लक्ष नसे. अशा प्रकारे त्यांची राहणी मनाला खात होती.

पगारवाढ, स्वतःचे घर झाले. ते स्वतःच्या घरात बाबांची छबी लावत होते. अशावेळी मी विचारलं, "तुम्ही नेहमी साईबाबांची भक्ती करता, तर त्यांच्यात असं काय मोठं आहे. अहो, पूर्वी अनेक अवतार झाले, त्यांपेक्षा यांना श्रेष्ठ मानावं कां?"

तू विचारतेच आहेस तर ऐक, "महाराष्ट्र भूमि जशी विद्वानांची व पराक्रमी पुरुषांची भूमि आहे, तशीच ती साधुसंतांचीही आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, विठ्ठल भक्त वारकऱ्यांना श्री पंढरपूर, दत्त भक्तांना श्री क्षेत्र गाणगापूर तसेच साईभक्तांना श्री क्षेत्र शिरडी अत्यंत प्रिय आहे. त्यांनी सामान्य जनतेच्या उद्धारासाठी आपले आयुष्य वेचून सर्वांना जीवनाचा सर्वांगिण विकासाचा मार्ग दाखविला आहे.

श्रीकृष्ण काय म्हणतातः-

य मैद्यांसि समद्धोऽग्निर्भस्म सात्कुरु तेऽर्जुन। ज्ञानाग्नि कर्मकर्माणि भस्मातत्करु ते तथा

[गी. ४ ओ.३७]


अर्जुन-। यथासमिद्धः अग्निः एधासि भस्मसात कुरुते तथा ज्ञानाग्निः सर्व कर्माणि भस्मसात कुरुते।

यावर ज्ञानेश्वरांनी म्हटलं —

सांगे भुवनत्रयाची काजळी। जे गगनामाजि उधवळी। तिये प्रलयींचे वाहुटुळी।
काय अभ्रपुरे की पावनाचेनि कोपें। पाणियेचि जो पलिये। तो प्रलयानळु दडपे। तृणे काष्टे काई।

अग! त्रैलोक्य पेटल्यावर आकाशात पसरलेल्या त्याच्या धुराळा पार उडवून देणारी जी प्रलय काळाची वावटळ तिला ढग नाही तसे करणे अवघड आहे का? किंवा वाऱ्याच्या सहाय्याने अग्नी भडकला असता जो पाणीही जाळून टाकतो, तो प्रलयकाळाचा अग्नी गवत आणि काष्टे ह्यांनी विझेल का? या श्लोकात जीवात्मा व परमात्मा आणि त्यांचे संबंध त्याच्या संपूर्ण ज्ञानाची तुलना अग्नीशी केली आहे. अशुद्ध कर्म बंधनाचे भस्म करतो, इतकेच नव्हे तर ते ज्ञान सर्व बंधनांना जाळून टाकते. त्याच्या संचित केलेल्या कर्मांची सर्व बंधने भस्मसात होतात. सांगण्याचा भावार्थ असा की, शुभ आणि अशुभ दोन्ही स्वरूपाच्या कर्म बंधनातून साईबाबांनी लोकांना मुक्त केले आहे.

हे तत्व, ज्ञान प्रसाराकरिता साक्षात भगवंताने या भूतलावर अवतार घेतला आहे असे म्हटलं तर ते चुकीचे ठरणार नाही. शिरडीत श्री साई शरीर रुपाने नाहीत तरी त्यांची प्रगती जगात होत आहे. त्यांचे कार्य शिरडीत अखंड तेवत राहणाऱ्या नंदादिपा प्रमाणे



अक्षय आहे. यात मला तर बिलकूल संदेह वाटत नाही.

त्यांच्या सान्निध्यात राहून ज्या लोकांना ज्ञान मिळाले, ते खरच महान होत.

मानवी जीवनास उपकारक असलेले कार्य श्री साईबाबांनी केले. 'साई' हा शब्द ऐकल्याबरोबर मनुष्याच्या मनात पूज्यभाव उत्पन्न होतो. त्यांचा महिमा त्या काळापासून आजपर्यंत अबाधित असून तो पुढेही राहणार यात विवाद नाही. त्यांचे सामर्थ्य असामान्य आहे. त्यांची शक्ती अगाध आहे. त्यांच्या उपदेशाचा अलभ्य लाभ ज्यांना झाला ते खरच धन्य होत. कारण गुरुचा उपदेश सहसा मिळत नाही. या करिता आपल्या जवळ पुण्य असावे लागते. ज्यांना साईबाबांचा दुर्लभ उपदेश मिळाला, ते थोर होत.

बाबा म्हणत, "माझ्या गुरुने दोन पैसे दिले, श्रद्धा व सबूरी. यालाच भक्ती हे नाव दिले तर वावगे होणार नाही. कर्म आणि ज्ञान हे आत्मानुभवाकडे नेतात. त्या पैकी ज्ञान हे इतके अथांग आहे की आसक्तीतून स्वतःला सोडून घेणे, ही बोलण्याएवढी सोपी गोष्ट नाही. तेव्हा सामान्य माणूस आजच्या अणुयुगातही श्रद्धेनेच तरून जात आहे. श्रद्धेमुळे त्याला गुरु शक्ती पूर्णपणे प्राप्त होत आहे.

साईंचे मुखातील शब्द, "मी अल्लाचा गुलाम आहे, मी अल्ला नव्हे." मी ईश्वर आहे असे त्यांनी कधीच सांगितले नाही. प्रथम श्री बुट्टींनी यांना ओळखलं, नंतर दास गणूंनी! श्री. दाभोलकर यांनी त्यांचे चरित्र जिवंत असताना लिहिलं. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात, खरं काय आणि खोटं काय ही जगाची पाहण्याची रीत असते. परंतु आतापर्यंत बाबांवर टिकात्मक लेखन अद्याप अजिबात प्रसिद्ध झालेलं नाही. या करिता मी म्हणतो की, हे परमेश्वराचे अवतार होते.

आता तुला पटलं की नाही की मी बाबांना का चाहतो ते. 'खरच माझं चुकलं. आता शंका पूर्णपणे तुम्ही नाहीशी केली' मी उद्गारले. आता रोज भक्तीभावाने, श्रद्धेने मी श्रीबाबांची प्रार्थना करते. ही प्रार्थना करण्यात माझा हेतू जरूर आहे. पण तो कधीही काही न मागण्याचा, उलट मनात एवढेच म्हणायचं की असाच श्रीबाबांचा नित्य सहवास लाभू दे, आणि असेच प्रेम आम्हास मिळावे ही मागणी करते.

हे अगदी सत्य आहे की ज्यांच्यावर त्यांचे प्रेम होते, त्यांना त्यांनी अपूर्व प्रेमाने सतत आपल्या सानिध्यात ठेऊन परमेश्वराचा अखंड सहवास दिला. त्यांच्यावर अकृत्रिम प्रेम केले आणि त्यांना भक्तश्रेष्ठ मंडळींत वरच्या दर्जावर नेऊन बसविले व आपले शब्द खरे केले, "माझा जो जाहला काया वाचा मनी तयाचा मी ऋणी सर्व काळ". ही उक्ती देवच अवतार घेऊन सार्थ करू शकतो. असे माझे मत हे सर्व ऐकल्या पासून झाले आहे.

# संत महिमा

— श्री. रामचंद्र नागेश घोडखांदे
४२० सी, हनुमाननगर, नागपूर.

देव, देऊळ आणि संत यांवर भारतीय जनमाणसात अपार श्रद्धा आहे. भारताचा पूर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण कोठेही प्रवास करा, भरपूर पूजास्थानं पाहावयास मिळतील. लोक या ना त्या कोणत्या तरी देवाचे भक्त असलेले अथवा संतांच्या आसमंतात भ्रमण करीत असलेले दिसतील. देव दयेने किंवा संत कृपेने दुःख निवारण व्हावं, जीवन सुखमय व्हावं, हाच त्यांचा हेतु असतो. ज्यांना भगवंत प्राप्तीसाठी मार्गदर्शन हवे असते, अशाही काही सज्जनांचा त्यात समावेश असतो. पण देव धर्मावर आणि संतांवर अपार श्रद्धा असणाऱ्या अनेक जीवांची बहुधा फसवणूकच होते. भक्तांच्या सात्विक वृत्तीचं आणि उत्कट श्रद्धेचं भांडवल करून त्यावर जगणारेच अनेक साधु जागोजाग आहेत. त्यामुळे डोळस दृष्टीने परिक्षण करून जनतेने आपले श्रद्धास्थान निवडणे अगत्याचे झाले आहे. याबाबत संत तुकारामाचे मार्गदर्शन विचारात घेण्यासारखे आहे.

संत तुकाराम म्हणतात —

जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले।
तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा।।

संत कोणाला म्हणावे आणि देव कोठे पाहावा ह्या दोन्ही गोष्टी तुकोबारायाने एकाच ठिकाणी अगदी सोप्या भाषेत सांगितल्या आहेत. या निस्पृही संताचा संदेश पुनःपुन्हा सांगून सामान्य जनाला जागे करणे, हे संत संप्रदायाचे कर्तव्य ठरते, असे म्हणता येईल.

एकदा गजानन महाराजांना त्यांच्या एका भक्ताने किंमती पितांबर नेसवून त्यांच्या अंगावर भरजरी शाल पांघरली. गळ्यात सोन्याचा गोफ अन् हातात अंगठ्या घातल्या. त्यावर गजानन महाराज म्हणाले, "अरे, तुम्ही हा पोळ्याचा नंदी छान सजवला पण ह्या सोन्या नाण्यांचा मला काय उपयोग? तुम्हा, प्रापंचिकांनाच त्याची खरी गरज आहे. शिवाय मी मागितल्यास माझा पांडुरंग मला कमी देईल काय?" त्यांनी ते सगळे तेथेच टाकून ते निघून गेले. सारांश — पैसा, धन याचे खऱ्या संताला वावडे असते.

बुडताहे जन देखवेना डोळा।
म्हणूनी कळवळा येत असे।।

या अभंगात तुकोबाराय खऱ्या संताची ओळख पटवीत आहेत. लोकांच्या दुःखी जीवनावर फुंकर घालायची आणि त्यांना सन्मार्गाने जगायला लावायचं हाच अर्थ यात अभिप्रेत आहे असे दिसून येईल.

संत एकनाथांनी तहानेनं व्याकूळ झालेल्या गाढवास गंगेचं तीर्थ पाजले. उन्हात तळमळणाऱ्या अंतजाच्या मुलास कडेवर घेऊन त्याच्या आईकडे पोचविले आणि नंतरच ते गंगा स्नानाला गेले. नाथांची ही भूतदया, हा सेवाधर्म, हे सर्वांभूती ईश्वराचे दर्शन

घेणं, भक्तांच्या मनाचा ठाव घेतल्या वाचून राहत नाही. भक्तीने ओलं झालेलं प्रेमळ मन नाथांच्या जवळ होते म्हणूनच पांडुरंगाने श्रीखंड्या बनून त्यांच्या घरी पाणी भरले. गोड भक्ताचा सहवास देवाला आवडतो हेच खरं. भूतांची निरपेक्षसेवा हेच संतांचे भांडवल असते हे नाथांच्या जीवनातून शिकण्या सारखे आहे.

एकदा मोठा दुष्काळ पडला. लोकांवर उपासमारीने मरण्याचा प्रसंग ओढवला. संत दामाजीपंतांचं हृदय द्रवलं, पिळवटून निघालं, मंगळवेढ्यास बेदरच्या राजाचं राज्य होतं. सरकारी गोदामात धान्य भरलेलं होतं. दामाजीपंत तेथे कारभारी होते. त्यांना लोकांचे हाल पाहावले नाही. त्यांनी धान्याचं कोठार लुटून दिलं. दामाजी पांडुरंगाचे परमभक्त होते. बेदर राजाने दामाजींस पकडून आणण्याचा हुकूम सोडला. इकडे पांडुरंगाला चिंता पडली. विठू कोतवाल बनून पांडुरंगाने बेदर सरकारला धान्याची रक्कम चुकती केली. देवाला आपल्या भक्ताची चिंता असते पण त्यासाठी दामाजीपंत व्हायला हवं. उगीच कुणासाठी देव धावत नाही. हाती काम अन् मुखी राम घेत दामाजी पांडुरंगमय झाले होते म्हणूनच पांडुरंग त्यांच्यासाठी धावले.

नारायण, नारायण नामाचा अखंड जप करणाऱ्या प्रल्हादाचा त्याच्याच पित्याने खूप छळ केला. पणे 'देव तारी त्याला कोण मारी' नरसिंह अवतार घेऊन भक्त रक्षणासाठी देवाने हिरण्य कश्यपूचा वध केला, जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी देव बघणाऱ्या प्रल्हादाचे रक्षण केले. नामजपाचा हा महिमा अगम्यच नाही का!

जनीसंगे दळण दळणारा, सखूसाठी तिच्या सासरी सासुरवास सोसणारा पांडुरंग आपल्या भक्तासाठी कोणतेही कष्ट सहन करायला तयार असतो, ही भक्ताच्या असीम प्रेमाची साक्ष आहे.

भक्तहो! भक्तीचं साधन 'मन' त्या मनाला भक्तीचं वेड लागणं हेच महत्वाचे आहे. भक्तीत निमग्न होणारी महाराष्ट्रातील संतांची प्रभावळ, भाविकांची मनं पुलकित करून जाते, भक्तीचं लोण मना-मनापर्यंत पोचविते.

ज्यानं सारी विदर्भ भूमी पायाखाली तुडवून भक्तीचं लोण अन् प्रेमाची शिकवण लोकांना दिली, त्यागाची पराकाष्ठा आणि वैराग्याची परिसिमा ज्याच्या जीवनात बघायला मिळाली, ज्यानं लोकांचा छळ आणि उपहास सोसला त्या परमपूज्य संत गाडगे महाराजांच्या जीवनाचे ओझरते दर्शन घेऊ या.

लोकांची जुनी फाटकी वस्त्र मागून ते त्याला अनंत ठिगळांनी सांधत आणि अंगात घालत. जणू अनेकांची मनं एका सूत्रात बांधत. पाणी पिण्यासाठी मातीचे गाडगे जवळ बाळगत. भाकरीचा तुकडा हातावर घेऊन खात. अन् जनसेवेच्या अखंड उपासनेत पांडुरंगाचे दर्शन घेत.

दलितांच्या उद्धारासाठी त्यांनी जीवाचं रान केलं. माणुसकी हाच खरा धर्म आणि देव. अहिंसा ही साधना असे त्यांचे गणित होते. बकऱ्यांना देवासमोर बळी देऊन त्याची पूजा बांधणाऱ्या अज्ञ जनांना देवपूजेचा, भक्तीचा खरा मार्ग सांगून त्यांनी समाजाला योग्य वळण लावलं. ते विशेषत: यात्रेच्या ठिकाणी जात, कीर्तन करीत आणि ते संपत

आले की, जनसमुदायात अदृश्य होत. हेतु हा की, कोणी आपली पूजा करू नये की मस्तक लववून नमस्कार करू नये.

गाडगे महाराज म्हणजे प्रसिद्धी पराङ्मुखतेचा आदर्श नमुना. निगर्वी, नम्र आणि भक्तीच्या धुंदीत धुंद असलेला हा संत, खराटा घेऊन ग्रामसफाईसाठी तयार असलेला पाहिला की, त्याच्या उपासनेच्या तंत्राने लोक अचंबित होऊन जात. त्यांनी पैसा गोळा केला. धर्मशाळा बांधल्या. शैक्षणिक संस्था काढल्या. त्यांचा चोख हिशेब देऊन त्या समाजाला परत केल्या. ठिगळ लावलेले कपडे आणि मातीचे गाडगे हीच काय ती त्यांची संपदा. विरक्त जीवन जगत समाज सेवेत त्यांनी आपली जीवन यात्रा संपवली. ह्या थोर संताची स्मृती जनमानसात ठाण देऊन बसली आहे.

आध्यात्माचं लोण जनसामान्यांपर्यंत नेण्याचं कार्य ज्ञानेश्वर महाराजांनी आधीच केलं. त्यांनी मराठीतून अनेक ग्रंथांची रचना केली. ज्ञानेश्वरी सामान्यांना समजायला कठीण जाते असं पाहून त्यांनी शेवटी 'हरिपाठ' लिहिला. परमेश्वर प्राप्तीचा सोपा मार्ग प्रतिपादिला.

'हरि हरि' म्हणा. अखंड म्हणा. अगदी जिव्हाळ्याने भावपूर्ण म्हणा, असा तो उपदेश आहे.

'भावेवीण भक्ती भक्तीवीण मुक्ती कैसी' ह्या ओवीत त्यांच्या उपदेशाचं सार ग्रथित आहे. मुखाने हरी हरी म्हणताना मनालाही हरीचा ध्यास लागू द्या. तरच मुक्ती मिळू शकते, आत्मज्ञानाचा लाभ होऊ शकतो असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ आहे. नाम जपाने वाल्याचा वाल्मिक ऋषी बनला हे मनी आणा असाहि बोध ते करून जातात. अखंड नामस्मरण हा मुक्तीचा सहज सोपा मार्ग ज्ञानदेवानं सुचविला तो मनी आणून 'हरी हरी' म्हणत येथेच थांबू या.

## साईदरबारातील नवरत्ने...९

# साईभक्त डेप्युटी कलेक्टर हरी विनायक साठे

श्रीसाईदरबारात ज्ञान-भक्ती-वैराग्य यामुळे रत्नाप्रमाणे तळपणाऱ्या दोन व्यक्तींमुळे-श्री. नानासाहेब चांदोरकर आणि श्रीदासगणू यांजमुळे शिरडीकडे भक्तांची रीघ लागली. त्यांत मोठमोठे अंमलदारही होते. ही सर्व मंडळी शिरडीसारख्या खेड्यातील सर्व गैरसोयी सोसून राहात. जुन्या चावडीत, जुने भक्त श्री. गणेश दामोदर उर्फ दादा केळकर यांच्या किंवा माधवराव देशपांडे उर्फ श्यामराव यांच्या घरी उतरत. स्नान, जेवणखाण वगैरे तेथेच करीत. परतु ही व्यवस्था पुढे अत्यंत अपुरी पडू लागली. अशा वेळी पुण्याचे एक भक्त रावबहादूर हरी विनायक साठे यांना शिरडीस भक्तांना उतरण्यासाठी एक वाडा बांधण्याची श्रीबाबांची आज्ञा झाली. श्री. साठेसाहेब नगर जिल्ह्यात त्यावेळी डेप्युटी कलेक्टर होते.

श्री. साठेसाहेब श्रीबाबांच्या दर्शनासाठी शिरडीस १९०४ साली प्रथम आले तेव्हा विधुर होते. कुटुंब निवर्तल्यासही पुष्कळ दिवस होऊन गेले होते. फिरून लग्न करण्याची इच्छा नव्हती. तरीही त्यांच्या प्रेमळ स्नेह्यांचा त्यांनी विवाह करावा म्हणून आग्रह पडला. याला एक महत्त्वाचे कारण होते. ते म्हणजे श्री. साठेसाहेबांना पुत्रसंतती नव्हती.

श्री. साठेसाहेब धर्मनिष्ठ, कुळाचारावर श्रद्धा असलेले, पुत्राविना कुळाचार खन्डित होणार; श्री. साठेसाहेबांची मनःस्थिती द्विधा झाली. शेवटी या पेचातून एक मार्ग निघाला. तो असा, की शिरडीस जावे. तेथे श्रीबाबांची आज्ञा होईल, त्याप्रमाणे करावे.

पुढे श्रीबाबांच्या आज्ञेवरून श्री. दादा केळकर यांची कन्या श्री. साठेसाहेबांसाठी नियोजित झाली. तिला श्रीबाबांनी स्वतःच्या हाताने कुंकू लावले. एक खर्बुज तिच्या ओटीत घातले. म्हणाले,

"जा. तुला मुलगा होईल."

१९०५ साली विवाह झाला व त्यांना एक पुत्र व एक कन्या झाली.

पुढे काही दिवसांनी श्रीबाबांच्या सुचनेवरून श्री. बाबासाहेब यांनी उखरीची जागा निंबासकट खरेदी केली. निंबवृक्षातली श्रीबाबांची जुनी बैठक, श्रीबाबांच्या गुरुंचे हे स्थान म्हणून या पवित्र निंबवृक्षास पारकट्टा बांधून घेतला. मग त्या जागी भक्तांना निवांतपणे राहाता येईल, असा प्रशस्त वाडा बांधला.

मुळातली उखरीची ही जागा. या जागी एक बाग होती. ती स्वतः बाबांनी दगडगोटे वेचून, वामन तात्यांच्या मातीच्या घागरींनी दिवसभर पाणी ओतून, खपून केली होती. त्या बागेतील फुलझाडांऐवजी तेथे आता एक सुंदर वास्तू उभी राहिली.

परंतु या वाड्यास वास्तू म्हणण्याऐवजी मठ म्हणणेच अधिक शोभून दिसेल. या वाड्यात हरिनाम, हरिगुणगान याविना अन्य काहीच उरले नाही. कारण श्रीज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, श्रीभावार्थ रामायण, श्रीहरिवरदा, श्रीगुरुचरित्र हे नेमून दिलेले ग्रंथ भक्तांनी तेथे दुपारी वाचण्याची आणि त्यांचे निरूपण करण्याची श्रीबाबांची सक्त आज्ञाच असे.

श्री. अण्णासाहेब दाभोलकर या साठेवाड्यास भक्तांचा 'आखाडा' या नावाने गौरवतात. भक्तांनी श्रीबाबांच्या कार्याच्या सर्व योजना या वाड्यात बसूनच आखल्या. खेडा जिल्ह्यात डेप्यूटी कलेक्टर असताना श्री. साठेसाहेब यांना नोकर म्हणून लाभलेला व पुढे परम साईभक्त म्हणून गौरविण्यात आलेला मेघा या साठे वाड्यातच राहात असे. तेथेच श्रीबाबांनी निष्पाप मेघावर बहुमोल कृपाप्रसाद केला.

गुरुस्थानाच्या आणि निंबवृक्षाच्या रूपाने साक्षात श्रीबाबाच श्री. साठेसाहेब यांच्या वास्तूत कायमचे राहायला आले. श्रीद्वारकामाईने, श्रीसमाधिमंदिर यांच्या इतकेच पावित्र्य साठेवाड्याच्या परिसरात लाभले.

श्री. साठेसाहेबाच्या बेचाळीस कुळातील गुरुभक्तांनी जे तप केले, ते श्रीबाबांच्या या कृपाप्रसादामुळे श्री. साठेसाहेब यांच्या पिढीस लाभले. श्री. साठेसाहेबांच्या लौकिक चरित्रावरील ही दिव्य पताका होय.

साठे यांचे सासरे केळकर हे पण साईभक्त होते.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ६-५० |
| २. | —''— | इंग्रजी | १४-५० | ५-२५ |
| ३. | —''— | हिंदी | ८-५० | ५-२५ |
| ४. | —''— | गुजराथी | १९-०० | ५-२५ |
| ५. | —''— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ६. | —''— | तेलगु | — | — |
| ७. | —''— | तामीळ | — | — |
| ८. | —''— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | — | — |
| ११. | —''— | हिंदी | १०-५० | ४-०० |
| १२. | —''— | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६-०० | ४-०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | —''— | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | —''— | गुजराथी | — | — |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | —''— | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | —''— | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | —''— | तेलगु | — | — |
| २१. | —''— | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | — | — |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-६५ | ३-५० |
| २५. | —''— | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | —''— | हिंदी | १-६५ | ३-५० |
| २७. | —''— | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | —''— | तेलगु | २-०० | ३-५० |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | १-५० | ३-५० |
| ३१. | —''— | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| ३२. | —''— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-' |

**Regd: No. MH/BYE/26**
**LICENCE No. 19**

Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14.

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | द्वारकामाई फोटो (प्लॅस्टिक कोटेड) | १७″ × २२″ | ३-५० | ३-५० |
| २. | —"— | १४″ × २०″ | १-५० | ३-५० |
| ३. | —"— | ७″ × १०″ | ०-६० | ३-५० |
| ४. | दगडावर बसलेले साईबाबा (काळा/पांढरा) | १४″ × २०″ | ०-८० | ३-५० |
| ५. | मूर्ती फोटो | १४″ × २०″ | १-५० | ३-५० |
| ६. | —"— | १०″ × १४″ | ०-९० | ३-५० |
| ७. | —"— | ७″ × १०″ | ०-६० | ३-५० |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :—**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान,
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि.- अहमदनगर.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

मुद्रक : श्री. एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी - २३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,
नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.
[illegible] साई निकेतन
दादर, मुंबई - ४०० ०१४.